Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ७८, अंक ८९, ५ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १२+ सहदैनिक ★

मुंबई, मंगळवार, २९ एप्रिल २०२५ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

अग्रलेख

## १०० दिवसांतील शंभरी!

ऊटपटांग निर्णय, प्रशासकीय हडेलहप्पी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवरील धरसोड यांमुळे ट्रम्प यांची लोकप्रियता अन्य अध्यक्षांपेक्षाही अधिक घसरली...



आतील पान

## मुख्यमंत्री म्हणून कमी पडलो!




विले पार्ले (पू) । ठाणे (प) । कल्याण (प) । बोरिवली (प) । पनवेल (प) । डोंबिवली (पू) । वाशी । अलिबाग । घोडबंदर रोड (ठाणे) । भांडुप (प) । गोरेगांव (प) । विरार (प)

UP TO ₹5,000 CASHBACK# SBI card

#Min. Trxn.: ₹40,000; Max. Cashback: ₹5,000 per card account; Validity: 25 Apr - 30 Apr 2025. T&C Apply.

टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com I info@pngadgil.com

INDIA I USA




## अपघातात १७ वर्षीय मुलीचा मृत्यू

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील सीपी टँक परिसरात ट्रकच्या मागील चाकाखाली येऊन १७ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. प्राथमिक माहितीनुसार, दुचाकी दुसरी तरुणी चालवत होती. तर मृत मुलगी दुचाकीवर मागे बसली होती. या वेळी ट्रकच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करत असताना दुचाकीवरील नियंत्रण सुटले व त्या दोघीही खाली पडल्या. यात १७ वर्षीय मुलीचे डोके ट्रकच्या मागच्या चाकाखाली आले. अपघाताचा हा प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, व्ही. पी. रोड पोलिसांनी अपघाताची नोंद केली आहे.

## दिनदर्शिका

मंगळवार, २९ एप्रिल २०२५
भारतीय सौर ०९ वैशाख शके १९४७
मिती वैशाख शुक्लपक्ष
द्वितीया १७ : ३२ पर्यंत.
नक्षत्र : कृत्तिका १८ : ४७ पर्यंत .
चंद्र : वृषभ
सूर्योदय : ०६ : १३, सूर्यास्त : १८ : ५९

- **मेष :** आर्थिक लाभ होईल.
- **वृषभ :** शुभ दिवस.
- **मिथुन :** संयम ठेवा.
- **कर्क :** नवी ओळख होईल.
- **सिंह :** महत्त्वाचे निर्णय घ्याल.
- **कन्या :** भेटीगाठीचा आनंद होईल.
- **तूळ :** वादग्रस्त प्रकरण टाळा.
- **वृश्चिक :** जोडीदार मदत करेल.
- **धनू :** वाद टाळा.
- **मकर :** अनेक क्षेत्रात यश.
- **कुंभ :** व्यस्त दिनचर्या राहील.
- **मीन :** आत्मबल वाढेल.

शुभ राशी : कन्या, मकर

# भारतीय नौदलाच्या हवाई शक्तीत वाढ

## फ्रान्सबरोबर २६ राफेल-मरीन विमान खरेदीसाठी करार

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारताने फ्रान्सबरोबर** सोमवारी नौदलासाठी २६ राफेल-मरीन विमानांच्या खरेदीचा करार केला. ६४ हजार कोटी रुपयांचा हा करार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली तीन आठवड्यांपूर्वी झालेल्या कॅबिनेट सुरक्षेच्या बैठकीत या कराराला मंजुरी देण्यात आली होती. कंत्राटावर सही केल्यानंतर पाच वर्षांनी भारतात विमाने दाखल होण्यास सुरुवात होईल.

संरक्षण मंत्रालयाने याबाबत माहिती दिली. संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि फ्रान्सच्या संरक्षण दलांचे मंत्री सेबास्टीन लीकॉर्नू यांनी या करारावर स्वाक्षरी केल्या. या करारानुसार राफेल विमानांचा मुख्य सांगाडा आणि देखभाल दुरुस्तीसाठी उत्पादन प्रकल्प उभारण्याची तरतूद आहे. देखभाल दुरुस्तीमध्ये विमानांचे इंजिन, सेन्सर्स आणि इतर शस्त्रप्रणालींचाही समावेश आहे. स्वदेशी बनावटीच्या शस्त्रप्रणालींसाठी तंत्रज्ञान हस्तांतरही केले जाणार आहे. २०३० पर्यंत ही विमाने भारताला सुपूर्द केली जातील. त्यासाठी नौसैनिकांना फ्रान्स आणि भारतात प्रशिक्षण दिले जाणार आहे. स्वदेशी बनावटीच्या 'आयएनएस विक्रांत'वर ही विमाने तैनात केली जातील.

'दस्सू एव्हिएशन' या कंपनीने या विमानांची निर्मिती केली आहे. सागरी सुरक्षेसाठी राफेल-मरीन या विमानांनी आपली लढाऊ सज्जता सिद्ध केली आहे. संरक्षण मंत्रालयाने जुलै २०२३ मध्ये या मोठ्या प्रकल्पाला प्राथमिक स्तरावर मंजुरी दिली होती. या विमानांबरोबरच विमानाला पूरक साहित्य, शस्त्रप्रणाली आणि सुटे भागही दस्सू कंपनी पुरविणार आहे. सध्या हवाई दलामध्ये राफेल विमाने वापरली जात आहे. या विमानांशी नौदलाचे विमानही बरेचसे मिळतेजुळते आहे. या विमानांच्या खरेदीमुळे नौदलाची युद्धक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. नौदल तसेच हवाई दलासाठी प्रशिक्षण आणि रसदपुरवठ्याच्या बाबतीतही मोठा फरक पडणार आहे, असे संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे.



भारतीय नौदलाच्या विमानवाहू नौकांची ताकद कैक पटींनी वाढणार असून, समुद्रातील हवाई शक्तीमध्ये मोठी वाढ होणार आहे.
**- संरक्षण मंत्रालय**

### विविध महत्त्वाच्या बाबींचा समावेश

- राफेल विमानांचा मुख्य सांगाडा आणि देखभाल दुरुस्तीसाठी देशात उत्पादन प्रकल्प उभारणार
- देखभाल दुरुस्तीमध्ये विमानांचे इंजिन, सेन्सर्स आणि इतर शस्त्रप्रणालींचा समावेश
- स्वदेशी बनावटीच्या शस्त्रप्रणालींसाठी तंत्रज्ञान हस्तांतर
- २०३० पर्यंत विमाने भारताकडे
- नौसैनिकांना फ्रान्स आणि भारतात प्रशिक्षण
- आयएनएस विक्रांतवर विमाने तैनात होणार




# एल्फिन्स्टन पूलबाधित १९ इमारतींचा पुनर्विकास

## रहिवाशांना त्याच ठिकाणी घरे देण्याचा निर्णय

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** एल्फिन्स्टन पुलाच्या परिसरातील १९ इमारतींमधील सर्व रहिवाशांना त्याच ठिकाणी घरे देण्यात येणार आहेत. येथील इमारतींचा पुनर्विकास मुंबई प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचे मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशीष शेलार यांनी सोमवारी सांगितले.

एल्फिन्स्टन पुलाच्या कामात एकूण १९ इमारती बाधित होणार होत्या. परंतु सरकारने नवीन नियोजन केल्याने केवळ दोन इमारती बाधित होणार आहेत. आता या पुलाचे काम करताना १७ इमारतींनाही धोका निर्माण होईल, अशी भीती रहिवाशांना वाटत असल्याने त्यांचा विरोध आहे. त्यामुळे या सर्व १९ इमारतींचा पुनर्विकास कोणत्याही विकासकाची वाट न पाहता ३३ (९) अंतर्गत 'एमएमआरडीए'नेच करावा, अशी विनंती मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्य केल्याचे शेलार यांनी सांगितले.

### कुर्ला येथील संक्रमण शिबिरात तात्पुरती घरे

दोन इमारतीमधील रहिवाशांची घरे बाधित होणार आहेत, त्यांना कुर्ला येथे घरे अथवा मोबदला देण्याऐवजी त्याच ठिकाणी पुनर्विकसित घरे देण्यात यावीत, अशी मागणीही शेलार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. तीही मान्य करण्यात आली. या दोन इमारतींमधील रहिवाशांना कुर्ला येथे संक्रमण शिबीर म्हणून तात्पुरती घरे देण्यात येतील. अन्य १७ इमारतींचा पुनर्विकास करताना बाधित होणाऱ्या दोन इमारतींमधील रहिवाशांना त्याच ठिकाणीच घरे देण्यात येतील, असे शेलार यांनी नमूद केले.

# 'सीईटी'त गणिताच्या प्रश्नपत्रिकेत तांत्रिक चुका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य समाइक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) घेण्यात आलेल्या 'एमएचटी-सीईटी'त रविवारी झालेल्या गणिताच्या प्रश्नपत्रिकेत २० ते २५ प्रश्नांबाबत तांत्रिक चुका झाल्याचा आरोप विद्यार्थी, शिक्षक, पालकांनी केला आहे. विद्यार्थ्यांच्या दोन वर्षांच्या मेहनतीवर या चुकांचा परिणाम होण्याची भीती व्यक्त झाल्यानंतर आक्षेप नोंदवण्यासाठी 'ऑब्जेक्शन ट्रॅकर'ची सुविधा दिली जाणार असल्याचे स्पष्टीकरण सीईटी सेलकडून देण्यात आले.

अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'एमएचटी-सीईटी' ही समाइक प्रवेश परीक्षा सीईटी सेलमार्फत घेण्यात येते. दोन टप्प्यांतील या परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (पीसीबी) गटाच्या परीक्षेचा पहिला टप्पा ९ ते १७ एप्रिल या कालावधीत घेण्यात आला. या परीक्षेसाठी देशभरातून ३ लाख १ हजार ७२३ अर्ज केले होते. तर दुसऱ्या टप्प्यात १९ ते २७ एप्रिल या कालावधीत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) गटासाठी ४ लाख ६४ हजार २६३ विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केली होती. गणिताच्या प्रश्नपत्रिकेत २० ते २५ प्रश्नांमध्ये चुका असल्याचे काही विद्यार्थी, पालक, शिक्षकांचे म्हणणे आहे. त्याबाबत समाजमाध्यमामध्ये संदेश प्रसारित करण्यात आले.

ऐन परीक्षेत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. २०० गुणांच्या प्रश्नपत्रिकेत ५० गुणांबाबतच्या चुका विद्यार्थ्यांची मानसिकता बिघडवण्यासाठी पुरेशा आहेत. विद्यार्थ्यांनी दोन वर्षे परिश्रम केले. त्यांना न्याय मिळाला पाहिजे, असे समाजमाध्यमांतील विविध संदेशांमध्ये नमूद करण्यात आले आहे. या संदर्भात सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांच्याशी संपर्क साधला असता 'दरवर्षी ऑब्जेक्शन ट्रॅकरची सुविधा दिली जाते. तशी ती या वर्षीही दिली जाईल' असे त्यांनी स्पष्ट केले.

**गोंधळाच्या चौकशीची मागणी**

विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान न करता त्यांना या प्रश्नांचे गुण द्यावेत आणि याप्रकाराची चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केली आहे.

### 'ऑब्जेक्शन ट्रॅकर' म्हणजे काय?

'ऑब्जेक्शन ट्रॅकर'मध्ये परीक्षांतील प्रश्न-उत्तरांबाबत आक्षेप नोंदवता येतात. त्यासाठी सीईटी सेलच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने संबंधित आक्षेप नोंदवावे लागतात. यासाठी शुल्क भरावे लागते. आक्षेपांत तथ्य आढळल्यास त्यानुसार गुण देणे, उत्तरतालिकेत सुधारणा असे बदल करण्यात येतात. शिवाय शुल्कही परत केले जाते. दरम्यान, विद्यार्थ्यांना मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आक्षेप नोंदविता येणार आहे.




टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
लोकसत्ता मार्ग यशाचा
१४

# फॅशन डिझाइन ग्लॅमर आणि संधी

**भारतीय फॅशन** उद्योगाला वेगळ्या उंचीवर नेण्याची कामगिरी गेल्या ३५ वर्षांत, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेच्या बॅचलर ऑफ डिझाइन इन फॅशन डिझाइन हा अभ्यासक्रम केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी केली आहे. हा अभ्यासक्रम बेंगळुरु, चेन्नई, गांधीनगर, हैद्राबाद, कानपूर, कोलकाता, मुंबई, नवी दिल्ली, पाटणा, रायबलेरी, शिलाँग, कांग्रा, जोधपूर, भुवनेश्वर, आणि श्रीनगर येथे शिकवला जातो. या कॅम्पसमध्ये ७१९ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

सध्याचे फॅशन प्रवाह आणि त्याअनुषंगाने भविष्यातील विविधांगी जागतिक फॅशन कल, प्रवाह आणि शक्यतांचा सर्जनशील विचार करण्याची क्षमता या अभ्यासक्रमातील विषय घटकांव्दारे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी अभ्यासक्रमात सातत्याने बदल, नव्या तंत्रज्ञानाचा वापर आणि या क्षेत्रातील उद्योगांसोबत सहकार्य या तीन बाबींचा अवलंब करण्यात येतो. सध्याचे फॅशन कल आणि प्रवाह, आयात-निर्यात आणि उद्योगाच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन विषय घटक निर्धारित केले जातात.

बॅचलर ऑफ फॅशन डिझायनिंग हा एनआयएफटीचा फ्लॅगशिप म्हणजेच सर्वात महत्त्वाचा अभ्यासक्रम समजला जातो. सतत नाविन्याचा ध्यास घेतलेल्या या क्षेत्रासाठी बहुआयामी सर्जनशीलता असलेल्या मनुष्यबळाचा पुरवठा गेली तीन दशकांपासून ही संस्था करत आहे. हा अभ्यासक्रम केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी देशासोबतच परदेशातही मोठे नाव कमावले आहे.

### काय शिकाल?

या अभ्यासक्रमात- (१) डिझाइन अॅण्ड इलस्ट्रेशन, (२) अॅपरल डेव्हलपमेंट विथ पॅटर्न मेकिंग, (३) ड्रेपिंग अॅण्ड गार्मेंट कन्स्ट्रक्शन या मुख्य विषयांचा समावेश आहे. याशिवाय फॅशनचा इतिहास आणि समकालीन फॅशन, समकालीन सांस्कृतिक सामाजिक विषयांचा फॅशन प्रवाहावर पडणारा परिणाम, उद्योगांच्या विविध गरजा आदी विषय घटकांचाही समावेश केला जातो. विविध स्तरातील ग्राहकांच्या गरजेनुसार फॅशन डिझाइन करता येणे शक्य व्हावे यासाठी तंत्रकुशलता वाढवली जाते. प्रात्यक्षिकांसाठी खास सॉफ्टवेअर प्रोग्रॅम तयार करण्यात आले असून त्यामुळे सर्जनशील कल्पनांचा विस्तार करणे आणि सादरीकरणाचे तंत्र हस्तगत करणे शक्य होते.

आंतरराष्ट्रीय फॅशन प्रवाह आणि कल यांचा सूक्ष्म अभ्यास विद्यार्थ्यांना या अभ्यासांतर्गत करायला मिळतो. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाची कक्षा वैश्विक स्वरुपाची होते. विद्यार्थ्यांना भारतीय पारंपरिक शिवणकाम कला, कौशल्य व तंत्राचेही ज्ञान प्राप्त करुन दिले जाते. त्यामुळे आधुनिकता आणि पारंपरिकता यांचा सुयोग्य संयोग साधणे सहजसुलभ ठरते.

या अभ्यासक्रमामध्ये - (१) अभिकल्प प्रक्रिया, (२) व्यावसायिक पध्दती, (३) फॅशन अभ्यास, (४) फॅशन आरेखन आणि अभिकल्प, (५) पोर्टफोलिओ डेव्हलपमेंट, (६) पॅटर्न मेकिंग, (७) मेन्सवेअर डिझाइन अॅण्ड डेव्हलपमेंट ड्रेपिंग, (८) आंत्रप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट, (९) गार्मेंट कन्स्ट्रक्शन, (११) सर्फेस डेव्हलमेंट टेक्निक, (१२) रिसर्च मेथड्स, (१३) एलिमेंट्स ऑफ टेक्सटाइल्स, (१४) क्राफ्ट क्लस्टर स्टडी, (१५) हिस्ट्री ऑफ डिझाइन अॅण्ड फॅशन कोट्युर(ग्राहकाच्या विशिष्ट आवश्यकता आणि मोजमापानुसार फॅशन कपड्यांची रचना), डिझाइन, (१६) डिजिटल इलस्ट्रेशन अॅण्ड प्रेझेंटेशन, (१७) थिएटर कॉस्चुम्स अॅण्ड डिझाइन, (१८) मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस, (१९) मार्केटिंग, (२०) डिझाइन कलेक्शन हे विषय घटक शिकवले जातात.

या संस्थेच्या सर्व कॅम्पसमध्ये पॅटर्न मेकिंग, ड्रेपिंग आणि गार्मेंट कन्स्ट्रक्शन या विषयांसाठी अत्याधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्ज अशा प्रयोगशाळांची सुविधा आहे. अंतिम सत्रात उद्योगांशी संबंधित व त्यांनी प्रायोजित केलेल्या प्रकल्पावर काम करावे लागते किंवा स्वतःच्या सर्जनशीलतेने विविध डिझाइनची निर्मिती करावी लागते. वस्त्रोद्योग मंत्रालयामार्फत दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनात पदवीधरांच्या डिझाइन्स ठळरित्या प्रदर्शित केल्या जातात.

या अभ्यासक्रमांतर्गत (१) लक्झरी अॅण्ड कोट्युर, २) फॅशनिंग इंटरसेक्शन, इमेज अॅण्ड स्टायलिंग, (३) ग्लोबल रिटेल फॅशन बिझनेस, (४) फॅशन इनोव्हेशन या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना (१) अॅथलेश्युअर डिझायनर,(२) डिझायनर्स फॉर स्पेशल नीड्स, (३) इंडस्ट्रिअल डिझायनर, (४) फॅशन मर्कंडायझर, (५) व्हिज्युएल मर्कंडायझर, (६) रिटेल/एक्स्पोर्ट आंत्रप्रिन्युर, (७) आर्टिसनल फॅशन डिझायनर, (७) कन्सलटंट, (८) पर्सनल शॉपर, (९) स्टायलिस्ट, (१०) कॉस्चुम डिझायनर, (११) वार्डरोब मॅनेजर, (१२) नवीन फॅशन प्रवाह भविष्यवक्ते, (१३) फॅशन रेखाटन तज्ज्ञ, अशा विविध संधी मिळू शकतात.

### प्लेसमेंट

हा अभ्यासक्रम केलेल्या बहुतेक सर्वच विद्यार्थ्यांना पुढील कंपन्यांमध्ये उत्तमोत्तम करिअर संधी मिळत असते. प्लेसमेंटची प्रकिया दिल्ली येथील कॅम्पसमध्ये राबवली जाते.

(१) रिटेल क्षेत्र- रिलायन्स रिटेल, रेमंड्स, तनैरा, टीसीएनएस, पँटलून्स, ब्लॅक बेरी, लँडमार्क, गूडअर्थ, आदित्य बिर्ला फॅशन अॅण्ड रिटेल, (२) टेक्स्टाईल मिल- अरविंद, रेमंडस, कलाकुसर क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्था, (३) ई कॉमर्स क्षेत्र- अॅमेझान, मायंत्रा, एजिओ, फर्स्ट सिटी, टाटा क्लिक, (४) फॅशन प्रवाह भविष्यवेत्या कंपन्या- डब्ल्यूजीएसएन, पॅटर्न बँक, (५) फॅशन डिझायनर्स- गौरव गुप्ता, सब्यासाची मुखर्जी, राजेश प्रताप सिंग, रितू बेरी, तरुण तहलियानी, संदीप खोसला, मनीष मल्होत्रा, अमित अग्रवाल, सुकेतू धीर, राहूल मिश्रा, अनिता डोंगरे, अबू जानी, (६) आयात निर्यात कंपनी- ओरिएंट क्रॅफ्ट, स्पॅन इंडिया, मॉडेलामा एक्स्पोर्टस, ली अॅण्ड फंग, टायबर्ग अॅण्ड इम्पल्स,

### उद्योजकतेला प्रोत्साहन

हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी उद्योजकतेची कास धरावी यासाठी संस्थेमार्फत प्रोत्साहन दिले जाते. हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी, स्वतःचा फॅशन बँड विकसित करुन, व्यवसायात उतरु शकतात. चित्रपटातील नट/नट्या, मोठे उद्योजक, इतर क्षेत्रातील वलयांकित व्यक्ती (सेलिब्रिटिज), इव्हेंट्स, फॅशन शोज आदीसांठी फॅशन स्टायलिस्ट म्हणून स्वतंत्ररित्या काम करण्याची संधी मिळू शकते. नाटक/ चित्रपट/ टीव्ही कार्यक्रम यातील शेकडो पात्रांसाठी लागणाऱ्या पोषांखाचे डिझाइन करण्याची फार मोठी संधी गेल्या काही वर्षात निर्माण झाली आहे. ऐतिहासिक/धार्मिक कार्यक्रमांच्या संख्येत वाढ झाल्याने यातील पात्रांसाठी बहुढंगी/बहुरंगी पोषांखाची मागणीही वाढली आहे.

### नवा अभ्यासक्रम

एनआयएफटीमध्ये बॅचलर ऑफ डिझाइन हा अभ्यासक्रम, फॅशन डिझायनिंग, निटवेअर डिझयनिंग, टेक्स्टाइल डिझायनिंग, डिझयनिंग, लेदर डिझायनिंग, फॅशन कम्युनिकेशन या विषयांमध्ये करता येतो. २०२५ च्या शैक्षणिक वर्षापासून, बॅचलर ऑफ डिझायनिंग इन फॅशन इंटेरिअर हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

या अभ्यासक्रमांतर्गत (१) लक्झरी डिझाइन, (२) एक्झिबिशन डिझाइन आणि (३) व्हर्न्याक्युलर डिझाइन या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते.

### काय शिकाल?

(१) फंडामेंटल्स ऑफ फॅशन, (२) फॅशन फिलॉसॉफी, (३) इंटेरिअर डिझाइन स्टुडिओ, (३) रेसिडेंशिअल, कमर्शिअल अॅण्ड पब्लिक स्पेसेस, (४) डिझाइन रिप्रेझेंटेशन, (५) डिजिटल कम्युनिकेशन, (६) ऑगमेंटेड रिअॅलिटी, व्हर्च्युअल रिअॅलिटी, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, (७) इनोव्हेटिव्ह मटेरिअल, (८) फिटिंग फर्निचर आणि फिक्चर, (९) एन्व्हिरॉन्मेंटल डिझाइन, (११) मटेरिअल स्किन अॅण्ड फर्निशेस, (१२) प्रोफेशनल प्रॅक्टिसेस, (१३) एस्टिमेशन अॅण्ड कॉस्टिंग, (१४) डिझाइन रिसर्च, (१५) पेपर मेकॅनिक्स, (१६) फॅब्रिक इन इंटेरिअर, (१७) कलर इन इंटेरिअर.

### करिअर संधी

हा अभ्यासक्रम केल्यावर पुढील करिअर संधी मिळू शकतात- (१) इंटिरिअर स्टायलिस्ट (कॉर्पोरेट /रिटेल/ हॉस्पिटॅलिटी/ हेल्थ केअर), (२) सेट डिझायनर, (३) इव्हेंट डिझायनर, (४) लक्झरी डिझायन, (५) क्रॅफ्ट डेकॉर डिझायनर, (६) लायटिंग स्टायलिस्ट, (७) फर्निचर स्टायलिस्ट, (८) इंटिरिअर लँडस्केप स्टायलिस्ट, (९) कलर कन्सलटंट, (१०) व्हिज्युअल मर्कंडायजिंग

हा अभ्यासक्रम यंदा श्रीनगर कॅम्पसमध्येच करता येईल.

संपर्क- https:// nift. ac. in/ admission

### शिष्यवृत्ती

एनआयएफटीमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारे साहाय्य केले जाते. आर्थिक विवंचनेमुळे विद्यार्थी एनआयएफटीच्या शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी, 'सार्थक' ही शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक संवर्गातील विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. यासाठी विहित नमुन्यात आणि आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा लागतो.

या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील उमेदवारांना, या संवर्गासाठी असलेली राष्ट्रिय शिष्यवृत्ती दिली जाते. याची विस्तृत माहिती, scholarship. gov. in या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर ठेवण्यात आली आहे. या पोर्टलच्या माध्यमातूनच दोन्ही संवर्गातील उमेदवारांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा लागेल. एनआयएफटीची सर्व १९ कॅम्पसेस या पोर्टलशी जोडली गेली आहेत.

**- सुरेश वांदिले**

Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57


# लोकसत्ता

मुंबई, मंगळवार, २९ एप्रिल २०२५ | WWW.LOKSATTA.COM

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !


**तापमान**

कमाल ३४.०° से | किमान २५.०° से

हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.



क्रीडा
सूर्यवंशीचा शतकी झंझावात




# मी कमी पडलो!

## पहलगाम हल्ल्याबाबत बोलताना ओमर अब्दुल्ला भावूक

**पीटीआय, जम्मू**

**जम्मू आणि** काश्मीर विधानसभेत सोमवारी पहलगाम हल्ल्याचा निषेध करणारा ठराव एकमताने मंजूर झाला. यावेळी केलेल्या भाषणात मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला अनेकदा भावूक झाले. यजमान राज्याचा मुख्यमंत्री आणि पर्यटनमंत्री म्हणून पाहुण्यांच्या सुरक्षेची जबाबदारी आपली होती... मात्र यात कमी पडलो, अशा शब्दांत त्यांनी भावनांना वाट मोकळी करून दिली. हल्ल्याविरोधात काश्मिरी जनतेमध्ये उमटलेला अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त संताप ही दहशतवादाच्या अंताची सुरुवात असल्याचा विश्वासही त्यांनी बोलून दाखवला.

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी विधानसभेचे एका दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले होते. यावेळी सर्वपक्षीय सदस्यांनी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि मृतांना श्रद्धांजली वाहिली. आपल्या २७ मिनिटांच्या भाषणात (पान ६ वर)



दहशतवादी हल्ल्याविरोधातील जनतेचा संताप पाहता, आपण योग्य पावले उचलली तर ही दहशतवादाच्या अंताची सुरुवात असेल. बंदुकीने दहशतवाद्यांवर नियंत्रण ठेवू शकत नाही, पण जनता आपल्याबरोबर असेल तर दहशतवाद संपवू शकतो. लोक त्या दिशेने जात आहेत. – **ओमर अब्दुल्ला**, मुख्यमंत्री, जम्मू-काश्मीर

- पाकिस्तानकडून शस्त्रसंधी उल्लंघन सुरूच
- जलद, निष्पक्ष चौकशीचे चीनचे आवाहन
- भारताकडून लष्करी कारवाई अटळ-पाकिस्तान
- यूट्यूबवरील १६ पाकिस्तानी वाहिन्यांवर बंदी
- नेत्यांच्या टिप्पण्यांमुळे काँग्रेस अडचणीत

पान ६

### विधानसभेत निषेधाचा ठराव

उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी यांनी निषेधाचा ठराव मांडला. 'सर्व नागरिकांसाठी शांतता, विकास आणि सर्वसमावेशक समृद्धीच्या वातावरणाला प्रोत्साहन देण्यासाठी जम्मू-काश्मीरची विधानसभा आपल्या अढळ कटिबद्धतेची पुष्टी करते. तसेच देश आणि जम्मू-काश्मीरमधील धार्मिक सौहार्द आणि प्रगतीमध्ये व्यत्यय आणणाऱ्यांचे दुष्ट मनसुबे पराभूत करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे स्पष्ट करते,' असे या ठरावात नमूद करण्यात आले आहे. विविध राज्यांमध्ये राहणाऱ्या किंवा प्रवास करणाऱ्या काश्मिरी विद्यार्थी आणि नागरिकांची सुरक्षा, प्रतिष्ठा आणि स्वास्थ्य यांची खबरदारी घेण्याचे आवाहन सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना ठरावाद्वारे करण्यात आले.


| | |
|---|---|
| N.CC नॅशनल एग कोऑर्डिनेशन कमिटी (बिगर-सरकारी सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट) | Vencobb — Vencobb No. 1 Indian Chicken |
| २९/०४/२०२५ | |
| ब्रॉयलर विकणचा दर* (पोल्ट्रीफार्मवर) | ८८ रु. प्रति किग्रॅ |
| किरकोळ विक्रीचा दर* जिवंत कोंबडी | ११६ रु. प्रति किग्रॅ |
| ड्रेस्ड कोंबडी (स्किनसह) दर* | १४२ रु. प्रति किग्रॅ |
| अंडी किरकोळ विक्री दर* | ६० रु. प्रति १२ अंडी |
| ग्राहकांच्या हितासाठी | *अटी लागू |


**काय चालल्यं काय!**

प्रशांत कुलकर्णी




नदी करार रद्द झाल्यानंतर तिथल्या शेतकऱ्यांची परिस्थिती अगदी इथल्यासारखी होईल बघ!!

रशियाकडून ८ ते १० मे युद्धविरामाची घोषणा - पान ६

## एसटीच्या कंत्राटी बस घोटाळा तपासाचा खेळखंडोबा

# संशयितांकडेच चौकशीची सूत्रे?

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** एसटी महामंडळाकडून कंत्राटी तत्त्वावर १३१० गाड्या घेण्याच्या घोटाळ्यातील सूत्रधाराचा शोध घेण्यात सरकारला अद्याप यश आलेले नाही. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार या प्रकरणाची चौकशी मंत्रालय स्तरावरून होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात ज्यांच्यावर संशय आहे, त्याच महामंडळातील अधिकाऱ्यांकडेच चौकशी सोपविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. चौकशीच्या या खेळखंडोबाची गंभीर दखल घेत आता त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

राज्य मार्ग परिवहन महामंडळात १३१० बस गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेताना ठेकेदाराला अवाजवी लाभ दिल्यामुळे महामंडळास सुमारे दोन हजार कोटींचे नुकसान झाल्याच्या प्रकरणाला (पान ६ वर)



### त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी -सरनाईक

चौकशीच्या या खेळखंडोबाची गंभीर दखल घेत त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशीचे संकेत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार ही चौकशी निःपक्षपातीपणे होणे अपेक्षित होते. आता मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## 'महारेरा'कडून आता प्राधान्यक्रमाने सुनावणी



मुंबई : विकासक, प्रकल्पाविरोधात ग्राहकांकडून 'महारेरा'त दाखल होणाऱ्या तक्रारींची सुनावणी तक्रारींच्या क्रमानुसार घेतली जाते. मात्र काही अपवादात्मक परिस्थितीत यापुढे ज्येष्ठता क्रमाशिवाय सुनावणी घेतली जाणार आहे. तक्रारदाराला जीवघेणा आजार असेल, दोन्ही पक्षांमध्ये सहमती झाली असेल, दुरुस्ती अर्ज दाखल झाला असेल किंवा वरिष्ठ न्यायिक यंत्रणेने आदेश दिले असल्यास प्रकरणाची सुनावणी प्राधान्याने घेतली जाईल. - पान २


- कोकणातील वंदे भारत, तेजस पावसाळ्यातही / ३
- 'बुलेट' २०२८पर्यंत रुळावर - मुख्यमंत्री / ७
- 'सेन्सेक्स' पुन्हा ८० हजारांवर / अर्थसत्ता




## भांडुप, विक्रोळी, कांजूरमार्ग परिसरात आज पाणीपुरवठा बंद

**मुंबई :** भांडुप पूर्व येथील चामुंडा नगरमध्ये ९०० मिमी x ९०० मिमी जलवाहिनीच्या जोडणीचे काम मंगळवार, २९ एप्रिल रोजी हाती घेण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. या दुरूस्ती कालावधीत भांडुप, विक्रोळी आणि कांजूरमार्ग आदी भागातील पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. तसेच, नियमित पाणीपुरवठ्याच्या वेळेनंतर (नियमित पाणीपुरवठा वेळ पहाटे ३.३० ते सकाळी ११.३०) पाणीपुरवठा बंद करण्यात येईल.

त्यामुळे नाहूर स्थानक (पूर्व), भांडुप (पूर्व), कांजूरमार्ग (पूर्व), विक्रोळी (पूर्व) परिसरातील पाणीपुरवठा बंद राहील. जल जोडणीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# ‘महारेरा’कडून प्राधान्यक्रमाने सुनावणी

## तक्रारदाराच्या स्थितीनुसार अर्जांची दखल; मार्गदर्शक तत्वे जारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** विकासक, प्रकल्पाविरोधात ग्राहकांकडून ‘महारेरा’त दाखल होणाऱ्या तक्रारींची सुनावणी तक्रारींच्या क्रमानुसार घेतली जाते. मात्र काही अपवादात्मक परिस्थितीत यापुढे ज्येष्ठता क्रमाशिवाय सुनावणी घेतली जाणार आहे.

ज्या तक्रारदाराला जीवघेणा आजार असेल, दोन्ही पक्षांमध्ये सहमती झाली असेल, ‘महारेरा’च्या आदेशाविरुद्ध पुनर्विलोकन (रिव्ह्यू) वा दुरुस्ती अर्ज दाखल झाला असेल किंवा वरिष्ठ न्यायिक यंत्रणेने विशिष्ट आदेश दिले असतील, अशा प्रकरणाची सुनावणी आता प्राधान्यक्रमाने घेण्याचा निर्णय ‘महारेरा’ने घेतला आहे. यासंबंधीची मार्गदर्शक तत्वेही जाहीर करण्यात आली.



बांधकाम व्यवसायात पारदर्शकता आणत विकासकांकडून ग्राहकांची होणारी फसवणूक रोखण्यासाठी ‘रेरा’ कायदा आणण्यात आला आहे. तर महाराष्ट्रात ‘महारेरा’च्या माध्यमातून ‘रेरा’ कायद्याची अंमलबजावणी होते. त्यानुसार महारेराकडे मोठ्या संख्येने विकासकांविरोधात तक्रारी दाखल होतात. या तक्रारींची संख्या खूप मोठी असल्याने अनेकदा सुनावणी होऊन न्याय होण्यास काहीसा विलंब होतो. त्यातही तक्रींरींच्या ज्येष्ठता क्रमानुसार अर्थात जशा तक्रारी दाखल होतात त्या क्रमाने तक्रारींची सुनावणी होते. त्यामुळे तक्रारींचे निवारण होण्यासाठी बराच काळ प्रतीक्षा करावी लागते. अशात काही तक्रारदारांना जीवणघेणा आजार असले वा काही प्रकरणात तातडीने सुनावणी होणे आवश्यक असले तेव्हा नियमानुसार महारेराला सुनावणी घेता येत नाही.

अपवादात्मक प्रकरणांतील तातडीने सुनावणीची आवश्यकता लक्षात घेत अखेर आता महारेराना काही बदल केले आहेत. त्यानुसार अपवादात्मक प्रकरणात ज्येष्ठता क्रमानुसार सुनावणी होणार आहे. यासंबंधीचे मार्गदर्शक तत्वे महारेराकडून प्रसिद्ध करण्यात आले आहेत. महारेराचा हा निर्णय अनेक तक्रारदारांना दिलाला देणारा ठरणार आहे. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणीही सुरू करण्यात आली आहे.

### डॉक्टरांचे प्रमाणपत्र बंधनकारक

तक्रारदारास जीवघेणा आजार असेल आणि त्यांनी तज्ज्ञ डॉक्टारांचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांच्या प्रकरणावर प्राधान्यक्रमाने सुनावणी घेतली जाणार आहे. याशिवाय इतर सर्व तक्रारींबाबतही पूरक आणि यथोचित कागदपत्रांसह तक्रार दाखल करावी लागेल. त्याशिवाय याबाबतची विनंती मान्य केली जाणार नाही, असेही महारेराने मार्गदर्शक तत्वात स्पष्ट केले आहे.

## समृद्धी महामार्गावर नवे औद्योगिक केंद्र

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** समृद्धी महामार्गावरील कल्याण- आमणे-भिवंडी क्षेत्राचा मुंबईतील वांद्रे- कुर्ला संकुलाच्या धर्तीवर विकास करण्यात येणार असून या परिसरात नवे औद्योगिक केंद्र उभारले जाणार आहे. या रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत या भागातून होणारी वाहतूक लक्षात घेता जवाहरलाल नेहरू बंदर आणि अहमदाबादकडे जाणाऱ्या मार्गासाठी पर्याय शोधण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी येथे दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समृद्धी महामार्गावरील आमने नोड कामाचा आढावा बैठक पार पडली. शिक्षणमंत्री दादा भुसे, मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी या वेळी उपस्थित होते.

ठाणे, रायगड, पालघर या भागाला आमने नोड जोडला जाणार असून भविष्यातील औद्योगिक क्षेत्र म्हणून ते विकसित होणार आहे. या भागाचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमएसआरडीएची नियुक्ती करण्यात आली आहे. आमने नोड १० हजार ७९१ हेक्टर क्षेत्र असून त्या ठिकाणी इंडस्ट्री पार्क, लॉजिस्टिक हब, कृषी हब, फूड प्रोसेसिंग पार्क आदी विकासकामे प्रस्तावित आहेत. आमने नोडमुळे भविष्यातील वाढणारी वाहतूक लक्षात घेता नियोजन करण्याचे आदेश शिंदे यांनी या वेळी दिले. या भागातून जाणाऱ्या नाशिक महामार्गाचे काम वेळेत आणि पावसाळ्यापूर्वी करण्याच्या सूचना देतानाच वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेण्याचे त्यांनी सांगितले.



### मिसिंग लिंकचे काम ९५ टक्के पूर्ण

मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकचे काम शेवटच्या टप्प्यात असून या प्रकल्पातील सर्वाधिक उंचीवरील पुलाचे काम कुठलीही तडजोड न करता काळजीपूर्वक करावी, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या. सुमारे १३.३० किलोमीटर लांबीच्या मिसिंग लिंकच्या दोन टप्प्यांचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. शेवटचा टप्पा म्हणून सर्वाधिक उंचीच्या पुलाचे काम सध्या सुरू आहे. मिसिंग लिंकमुळे मुंबई-पुणे प्रवासात अजून २० ते २५ मिनिटांची बचत होणार असून त्याचे काम करताना कुठलीही तडजोड करू नका. उंचीवरील काम करताना अधिक काळजीपूर्वक करा. कामाची प्रत्येक पातळीवर चाचणी करण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या.

## शालेय मुलांच्या सुरक्षेसाठीचा शासन निर्णय सादर

**मुंबई :** बदलापूर येथील लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शिफारशी सुचवणाऱ्या दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील विशेष समितीने दाखल केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने राज्य सरकारने शासन निर्णयाचा मसुदा तयार केला आहे. उच्च न्यायालयात सोमवारी हा मसुदा सादर केला गेला. तथापि, शालेय मुलांची सुरक्षितता ही महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करून अंतिम शासन निर्णयात काही त्रुटी राहू नयेत यासाठी शासन निर्णयाच्या मसुद्याची पडताळणी करण्याचे आदेश प्रकरणातील न्यायमित्राला दिले आहेत.

समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने तयार केलेला शासन निर्णयाचा मसुदा अतिरिक्त सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी न्यायालयात सादर केला. त्यानंतर, अंतिम शासन निर्णय सर्वंकष असण्याच्या दृष्टीने या शासन निर्णयाच्या मसुद्याची पडताळणी करण्यासाठी न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने वकील रेबेका गोन्साल्विस यांची ‘न्यायमित्र’ म्हणून नियुक्ती केली. गोन्साल्विस यांनी शासन निर्णयाचा मसुदा, समितीने केलेल्या शिफारशी आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेसंदर्भात यापूर्वी सरकारने काढलेले विविध शासन निर्णय यांचा एकत्रित अभ्यास करावा. तसेच, मसुद्यात काही त्रुटी राहिल्या असल्यास किंवा अतिरिक्त शिफारशी करायच्या असल्यास त्या सुचवण्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. यासाठी न्यायालयाने गोन्साल्विस यांना बुधवारपर्यंतची मुदत दिली.

# मोतीलाल नगरचा पुनर्विकास अदानीकडूनच

## राज्य सरकारची निविदेस मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गोरेगाव पश्चिम येथील मोतीलाल नगरचा पुनर्विकास अदानी समूहाच्याच माध्यमातून होणार यावर अखेर सोमवारी शिक्कामोर्तब झाले. पुनर्विकासाच्या निविदेला राज्य सरकारने मान्यता देत निविदा अंतिम केली आहे. त्यानुसार अदानी समूहाला निविदा देण्यात आली असून लवकरच मुंबई मंडळाकडून अदानी समूहाला आशयपत्र (एलओआय) दिले जाणार आहे.

अंदाजे १४२ एकरवर वसलेल्या मोतीलाल नगर म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास मुंबई मंडळाच्या माध्यमातून कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सीची (सी अँड डी) अर्थात खासगी विकासकाची नियुक्ती करत मार्गी लावला जाणार आहे. त्यानुसार या पुनर्विकासासाठी २०२१ मुंबई मंडळाने निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार तीन निविदा सादर झाल्या होत्या आणि तांत्रिक निविदेत तीन कंपन्यांच्या निविदा सादर झाल्या होत्या. छाननीत एक निविदा अपात्र ठरली. तांत्रिक निविदा खुल्या झाल्यानंतर मुंबई मंडाळाला आर्थिक निविदा २०२१ पासून मार्च २०२५ पर्यंत खुल्या करता आल्या नाहीत. मोतीलाल नगर पुनर्विकासाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने निविदा खुल्या करता येत नव्हत्या. पण अखेर मार्चमध्ये न्यायालयाने निविदा खुल्या करण्याचा मार्ग मोकळा केला आणि मुंबई मंडळाने आर्थिक निविदा खुल्या केल्या. या निविदेत अदानी समूहाने अखेर बाजी मारली. निविदेतील अटीनुसार एकूण क्षेत्राच्या १३.२९ टक्के क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रावर अर्थात ३ लाख ८३ हजार चौ.मीटर क्षेत्रावर घरे बांधून देणाऱ्या कंपनीस निविदा देण्यात येणार होती. त्यानुसार अदानी समूहाने १३.७८ टक्के क्षेत्रावर अर्थात ३ लाख ९७ हजार १०० चौ. मीटर क्षेत्रावर म्हाडास घरे बांधून देण्याची तयारी दर्शविली.



### आशयपत्र दिल्यानंतर करार...

राज्य सरकारने या प्रस्तावास म्हणजे अदानीच्या निविदेस मान्यता दिल्याची माहिती मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी दिली. निविदा अंतिम झाल्याने, त्यास राज्य सरकारची मान्यता मिळाल्याने आता लवकरच अदानी समूहाला आशयपत्र देण्यात येईल असेही बोरीकर यांनी सांगितले. आशयपत्र दिल्यानंतर मुंबई मंडळ आणि अदानी समूह यांच्यात करार होईल आणि त्यानंतर कायदिश जारी केले जातील, असे ते म्हणाले.

# शौचालयांअभावी प्रवाशांची परवड

## उच्च न्यायालयाची राज्य सरकारला नोटीस; भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील सर्व महामार्गांवरील सार्वजनिक शौचालयांच्या अभावाचा आणि त्यामुळे प्रवाशांना त्यातही महिला प्रवाशांना सहन कराव्या लागणाऱ्या त्रासाचा मुद्दा जनहित याचिकेद्वारे सोमवारी उच्च न्यायालयात उपस्थित करण्यात आला. न्यायालयानेही या याचिकेची दखल घेऊन राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) आणि राज्यातील प्रमुख द्रुतगती महामार्गांचे व्यवस्थापन करणाऱ्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) नोटीस बजावली व याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले,

राज्यातील बहुतेक महामार्गांवर शौचालये नाहीत. परिणामी लांबचा प्रवास करताना नागरिकांची परवड होते. त्यामुळे, महामार्गांवर विशिष्ट अंतरावर शौचालये बांधण्याची आणि ती सुस्थितीत ठेवण्याचे आदेश देण्याची मागणी वकील रूजू ठक्कर यांनी जनहित याचिकेद्वारे केली आहे. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठापुढे ही याचिका सोमवारी प्रथमच सुनावणीसाठी आली. त्यावेळी, राज्यातील सर्वच महामार्गांवर शौचालये नसणे हे प्रवाशांचे, विशेषतः महिला, मुले आणि वृद्ध प्रवाशांचे आरोग्य धोक्यात घालण्यासारखे आहे. त्यांच्या मूलभूत स्वच्छता सुविधा मिळण्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे, असे ठक्कर यांनी न्यायालयाला सांगितले. ठक्कर यांचे थोडक्यात म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने प्रतिवाद्यांना नोटीस बजावून उत्तर दाखल करण्यास सांगितले.

एमएसआरडीसी आणि पीडब्ल्यूडीकडून माहिती अधिकारात मिळालेल्या उत्तरांनुसार अनेक शौचालयांमध्ये सॅनिटरी नॅपकिन यंत्र, डायपर बदलण्याचे ठिकाण आणि नर्सिंग रूमसारख्या आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचे म्हटले आहे. या शौचालयांची सफाई करण्यासाठी कर्मचारी ठेवण्यात आल्याचा उल्लेख केला असला तरी माहिती अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीत त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण नाही. मुळात राज्य महामार्ग कायद्यानुसार महामार्गावर पायाभूत सुविधांसह स्वच्छ शौचालयांसारख्या मूलभूत सार्वजनिक सुविधा पुरवण्यास राज्य सरकार आणि एमएसआरडीसी कायदेशीररित्या बांधील आहे. तसेच, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या यंत्रणेच्या अभावामुळे उघड्यावर कचरा टाकला जातो आणि पर्यावरणाला धोका निर्माण होतो, असा दावाही याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे, शासनाच्या २०१८ च्या धोरणानुसार महामार्गांवर शौचालये बांधण्यात यावीत, त्यांची नियमित देखभाल करण्यात यावी, सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन आणि इन्सिनरेटर बसवण्यात यावे. त्याचप्रमाणे, प्रवाशांसाठी तक्रार निवारण यंत्रणा सुरू करण्याचे आदेश राज्य सरकार आणि एमएसआरडीसीला देण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली आहे.

### ४०० शौचालये बांधण्याचे धोरण कागदावरच

राज्यातील महामार्गांवर ४०० शौचालये बांधण्याचे धोरण २०१८ मध्ये आखण्यात आले होते. तथापि, सरकारच्या उदासीन व निष्क्रिय भूमिकेमुळे हे धोरण अद्यापही कागदावरच आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला. मूलभूत स्वच्छता, त्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे त्याची देखभाल करणे यात राज्य सरकार अपयशी ठरले असून हे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन असल्याचे याचिकेत म्हटले आहे. महामार्गावर स्वच्छ शौचालये आणि त्याच्याशी संबंधित सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या अस्वच्छतेमुळे महिलांसह अन्य प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे, असा दावाही याचिकाकर्त्यांनी केला आहे.



# मुंबईचे नवे पोलीस आयुक्त कोण?

## विवेक फणसळकर यांची उद्या निवृत्ती

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर ३० एप्रिल रोजी निवृत्त होणार आहेत. भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ तुकडीचे अधिकारी असलेल्या फणसळकर यांच्यानंतर मुंबईचे पुढील पोलीस आयुक्त कोण, याची चर्चा सुरू झाली आहे. सदानंद दाते, संजयकुमार वर्मा, रितेश कुमार, महिला पोलीस अधिकारी अर्चना त्यागी या वरिष्ठ अधिकारी यांच्या नावावर सध्या चर्चा सुरू आहे. याशिवाय मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्याकडेही या पदाची धुरा दिली जाऊ शकते.

विवेक फणसळकर यांनी ३० जून २०२२ मध्ये मुंबई पोलीस आयुक्तपदाची धुरा स्वीकारली होती. त्यांचा कार्यकाळ वाढवण्याची शक्यता धूसर असल्यामुळे ३० एप्रिलला ते निवृत्त होत आहेत. त्यांच्या निवृत्तीनंतर सदानंद दाते व संजयकुमार वर्मा दोघेही १९९० च्या तुकडीचे अधिकारी आहेत. फणसळकर यांच्यानंतर दाते व वर्मा वरिष्ठ अधिकारी आहेत. परंतु राष्ट्रीय तपास यंत्रणेत (एनआयए) सध्या महत्त्वाच्या प्रकरणांचा तपास सुरू असल्यामुळे दाते यांची मुंबई पोलीस आयुक्तपदी नियुक्ती होण्याची शक्यता कमी आहे.



दुसरीकडे वर्मा यांना गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली होती. पण त्यांची या पदावर नियुक्ती होण्याची शक्यताही फार कमी दिसत आहे. त्यांच्यानंतर रितेश कुमार, अमिताभ गुप्ता व संजीवकुमार सिंघल हे १९९२च्या तुकडीचे अधिकारीही या शर्यतीत आहेत. या तिघांमध्ये रितेश कुमार बाजी मारू शकतात. याशिवाय, सरकारला या पदावर महिला अधिकाऱ्याची नियुक्ती करायची असेल तर १९९३ तुकडीच्या अर्चना त्यागी हा एकमेव पर्याय आहे. त्याचप्रमाणे विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या नावाचाही विचार होऊ शकतो. फणसळकर यांच्या निवृत्तीपर्यंत मुंबई पोलीस आयुक्तपदाच्या नियुक्तीबाबत कोणताही निर्णय झाला नाही, तर अतिरिक्त कार्यभार देवेन भारती यांना सुपूर्द केला जाऊ शकतो.

## ईडी कार्यालयातील महत्त्वाचे दस्तऐवज सुरक्षित

**मुंबई :** बॅलार्ड इस्टेट येथील सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कार्यालयात रविवारी पहाटे लागलेल्या आगीत काही कागदपत्रे व फर्निचर जळून खाक झाली. मात्र तपासासाठी अत्यावश्यक असलेले सर्व पुरावे व गुन्ह्यांशी संबंधित कागदपत्रे डिजिटल स्वरूपात सुरक्षित असल्याची माहिती ईडीने सोमवारी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत निवेदनात दिली. त्यामुळे प्रकरणांचा तपास व खटल्यांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे ईडीने स्पष्ट केले.

‘कैसर-आय-हिंद’ इमारतीच्या चौथ्या मजल्यावर असलेल्या ‘ईडी’च्या मुंबई विभागीय कार्यलय-१ मध्ये रविवारी पहाटे सुमारे २.२५ वाजता आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल व पोलीस यंत्रणेला सतर्क करण्यात आले. सुमारे साडेतीन वाजता अग्निशमन दलाच्या ५० हून अधिक जवानांनी आणि अनेक अग्निशमन गाड्यांनी घटनास्थळी धाव घेत अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. आगीच्या घटनेनंतर विविध यंत्रणांकडून माहिती देण्यात आली. मात्र महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित असल्याचे समजते.

# वसईत एमडीचा कारखाना उद्ध्वस्त; ८ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** वसई येथील सिमेंटचे ब्लॉक बनविण्याच्या कंपनीतून सुरू असलेला मेफेड्रॉन (एमडी) बनविण्याचा कारखाना साकीनाका पोलिसांनी उद्ध्वस्त केला. या कारवाईत चार किलो ५३ ग्रॅम एमडी हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याची किंमत आठ कोटी चार लाख रुपये आहे. पोलिसांनी या कारवाईत सादिक सलीम शेख (२८) आणि सिराज सुलतान पंजवानी (५७) यांना अटक केली आहे.

साकीनाका पोलिसांचे अमली पदार्थविरोधी पथक २४ एप्रिल रोजी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना येथील काजुपाडा परिसरातील रेतीवाला कंपाऊंडमध्ये सार्वजनिक शौचालयाजवळ सादिक हा संशयास्पदरीत्या फिरताना सापडला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याजवळ १० लाख सात हजार रुपये किमतीचे ५३ ग्रॅम एमडी सापडले.

पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून सादिकला अटक केली. त्याच्या चौकशीत त्याने एका व्यक्तीकडे एमडी विक्रीचे काम करत असल्याचे आणि त्याला मिरा रोडमधील रहिवासी सिराज पंजवानी हा अमली पदार्थ पुरवत असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली. साकीनाका पोलिसांनी आरोपी पंजवानी याचा मिरा रोडमध्ये शोध घेऊन त्याला २६ एप्रिल रोजी अटक केली. वसईतील कामण गावातील काळुराम चौधरी हा एमडी बनवून विकत असल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार, साकीनाका पोलिसांनी चौधरी चालवत असलेल्या एम. के. ग्रीन एएसी ब्लॉक कंपनीवर छापा टाकला. सिमेंटचे ब्लॉक बनविणाऱ्या या कंपनीत चौधरी सापडला नाही. पण पोलिसांना येथील एका शेडमध्ये एमडी अमली पदार्थ बनवले जात असल्याचे दिसले. या शेडमधून चार किलो एमडी आणि एमडी बनवण्याचे साहित्य जप्त केले.

## नवी मुंबईत अमली पदार्थविरोधी विशेष तपास पथक

**नवी मुंबई :** पोलिसांनी अमली पदार्थविरोधी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. या पथकाने खारघर पोलीस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

नवी मुंबई पोलीस नशामुक्ती अभियान अनेक वर्षांपासून राबवत आहेत. सुमारे दोन महिन्यांपूर्वी एनसीबीने केलेल्या कारवाईत नवी मुंबईतील नवीन चिचकर याचे नाव समोर आले. या प्रकरणी त्याचे वडील गुरुनाथ यांनाही एनसीबीच्या चौकशीला सामोरे जावे लागले होते. त्या मनस्तापातून त्यांनी गुरुवारी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. या घटनेनंतर तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

तत्कालीन पोलीस आयुक्त संजीव कुमार यांनी नशामुक्त नवी मुंबई हा उपक्रम हाती घेतला. विद्यमान आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अधिक कार्यक्षमपणे उपक्रम राबवण्यासाठी पावले उचलली. सुमारे दोन महिन्यांपूर्वी एनसीबीने कोट्यवधी रुपयांचा अमली पदार्थ साठा जप्त केला. यात देशभरातून अनेकांना अटक करण्यात आली होती. याच कारवाईत नवी मुंबईतील प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिक गुरुनाथ चिचकर यांचा मुलगा नवीन चिचकर याचेही नाव समोर आले होते. या प्रकरणी गुरुनाथ चिचकर यांनी आत्महत्या केल्यानंतर आयुक्त मिलिंद भारंबे यांनी विशेष तपास पथक स्थापन केले. या पथकाने गेल्या दोन दिवसांच्या तपासात खारघर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या दोन कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे कळते.

# ‘इवल्या’ कपातही चहावाल्यांकडून ‘मापात पाप’

**निखिल अहिरे, लोकसत्ता**

**आधीच कटिंग असलेल्या चहामध्ये ठाणे ते चिपळूण रेल्वे स्थानकांदरम्यान विक्रेते आणखी कटिंग करत असल्याचे वैधमापनशास्त्र विभागाच्या कारवाईतून उघड झाले आहे.**

**ठाणे :** रेल्वे स्थानकावर मिळणारा चहा, हा प्रवासाचा शीण घालविण्याचा अनेकांचा आवडता मार्ग... अशा वेळी कितीही पानचट असला तरी तो ‘अमृततुल्य’ वगैरे भासतो. मात्र कोकण विभागातील बहुतांश स्थानकांमध्ये चहा विक्रेते कटिंग चहामध्ये आणखी ‘कटिंग’ करत असल्याचे उघड झाले आहे.

कोकण वैधमापनशास्त्र विभागाने केलेल्या कारवाईदरम्यान प्रशासनाने आखून दिलेल्या मापाच्या निम्माच चहा प्रवाशांना दिला जात असल्याचे समोर आले आहे. आता संबंधित कॅन्टीन मालकांविरोधात खटला दाखल करण्यात आला असला तरी गेली अनेक वर्षे ‘मापात पाप’ करून कॅन्टीन चालक आणि कर्मचाऱ्यांनी फसवणूक करत दुप्पट नफा कमावल्याचे यामुळे अधोरेखित झाले आहे. वैध अधिनियम २००९ आणि त्या अंतर्गत नियमांनुसार व्यापारी तसेच औद्योगिक आस्थापनांकडे वापरात असलेली वजने, मापे यांची पडताळणी केली जाते. ठाणे जिल्ह्यातील कल्याण, ठाणे; पालघर जिल्ह्यातील वसई; रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत; रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ रेल्वे स्थानकावर संबंधित जिल्हा उपनियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री करणाऱ्या आस्थापनांवर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैधमापनशास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांनी अचानक भेटी देऊन तपासणी केली. यामध्ये विक्रेते चहाच्या मापात घोळ करत असल्याचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. याबाबत अधिकाऱ्यांनी तातडीने संबंधित कॅन्टीन मालकांवर कारवाई केली आहे. चिपळूण, रत्नागिरी स्थानकांवरील आस्थापनेवर विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आवेष्टित वस्तूवर नियमातील तरतुदीन्वये आवेष्टनावर घोषवाक्य नमूद न केल्यामुळे प्रकरण दाखल करण्यात आले आहे.



### कुठे, किती कटिंग?

- स्थानकात विक्री केल्या जाणाऱ्या प्रत्येक वस्तूचे वजन शासनाकडून ठरवून देण्यात आले आहे. त्यानुसार १५०/१८० मिलि. चहा देणे बंधनकारक आहे.
- अनेक स्थानकांत १० ते १५ रुपयांना ८० मिलि. किंवा त्यापेक्षा कमी चहा दिला गेल्याचे आढळले.
- ठाणे स्थानकातील एका कॅन्टीनमध्ये चहा ३० मिलि. कमी दिला जात असल्याचे निदर्शनास आले.
- ही एक प्रकारे ग्राहकांची फसवणूकच असल्याचा ठपका ठेवून सदर विक्रेत्यांवर कारवाई सुरु करण्यात आली आहे.
- वापरात असलेली तोलन उपकरणे विहित मुदतीत फेरपडताळणी व मुद्रांकन करून न घेतल्याची चार प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत.

वाढीव किमतीबाबत ग्राहक तक्रार करतात. मात्र वजनांच्या बाबतीतही ग्राहकांनी सजग राहायला हवे. पाकीटबंद उत्पादनावरील वजन आणि इतर गोष्टी तसेच खुले पदार्थ, पेय आणि त्यांचे वजन याबाबत सजग राहावे. वैधमापनशास्त्र विभागाकडूनदेखील अशा पद्धतीची फसवणूक करणाऱ्या विक्रेत्यांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

**– शिवाजी काकडे,** सहनियंत्रक, वैधमापनशास्त्र, कोकण विभाग

# कोकणातील वंदे भारत, तेजस एक्सप्रेस पावसाळ्यातही धावणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** रेल्वे प्रशासनाने त्यांची आगाऊ आरक्षण प्रणाली अद्ययावत करून, वंदे भारत, तेजस एक्सप्रेस रेल्वेगाड्यांचे तिकीट उपलब्ध केले आहे. त्यामुळे कोकणातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रेल्वेने आगाऊ आरक्षण कालावधी ६० दिवस केला आहे. त्यामुळे कोणत्याही गाडीचे आगाऊ तिकीट ६० दिवसांच्या कालावधीमध्ये काढता येते. परंतु, कोकणातील वंदे भारत, तेजस एक्स्प्रेस आणि एलटीटी-मडगाव गाड्यांचे १५ जूननंतरचे तिकीट प्रवाशांना मिळत नव्हते. त्यामुळे या गाड्या पावसाळ्यात धावणार की नाहीत, असा प्रश्न पडला होता.

याबाबत 'लोकसत्ता'ने 'वंदे भारत, तेजस एक्स्प्रेसला ब्रेक ?' असे वृत्त प्रकाशित करून प्रवाशांना होणाऱ्या त्रासाला वाचा फोडली. त्यानंतर मध्य आणि कोकण रेल्वे प्रशासनाने सुविधा उपलब्ध करून दिली. त्यामुळे प्रवाशांना वंदे भारत, तेजस एक्स्प्रेस आणि एलटीटी-मडगाव रेल्वेगाड्यांचा प्रवास पावसाळ्यातही करता येणार आहे.

# भायखळ्यातील बेकरीला भीषण आग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** भायखळा येथील मोतीशाह लेन येथील सुपर बेकरीमध्ये सोमवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास अचानक आग लागली. या भीषण दुर्घटनेत बेकरी मालक, त्यांचा मुलगा आणि कामगार असे मिळून एकूण चारजण होरपळले. सद्यस्थितीत जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

भायखळ्यात सुपर बेकरीत सोमवारी सायंकाळी स्वयंपाकाच्या सिलिंडरमधून गॅस गळती सुरू झाली. संबंधित बाब दुकानातील कामगारांच्या पटकन लक्षात आली नाही. गॅसगळती होताच बेकरीत आगीचा भडका उसळला.

दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य हाती घेतले. आग आणि धुरामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना आग नियंत्रणात आणण्यात अडचणी येत होत्या.

आगीत जयेश पारेख (४६), जुबेर सिद्दीकी (२५), जावेद मोहम्मद (२३), शारीअर रैसी (३६) हे चारजण जखमी झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढून उपचारासाठी नजीकच्या मसीना रुग्णालयात दाखल केले. शर्थीचे प्रयत्न करून ६ वाजून ४० मिनिटांनी आग विझवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.


बँकिंग करा सहजतेने
स्मार्टपणे गुंतवणूक करा
रिवॉर्ड्ससह खरेदी करा
आत्मविश्वासाने विमा उतरवा
Cent eeZ Ab Life Aasaan

सेंट्रल बैंक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ

आपल्या सुरक्षिततेसाठी, फक्त येथूनच Cent eeZ अॅप डाऊनलोड करा.
Google Play App Store

अज्ञात लिंक्सवर क्लिक करू नका किंवा व्हॉट्सअॅप किंवा कोणत्याही अविश्वसनीय स्त्रोतावरून APK फाईल्स डाऊनलोड करू नका.
डेबिट/क्रेडिट कार्ड सीव्हीव्ही, पिन इत्यादी सारखी वैयक्तिक माहिती शेअर करू नका.

**दिनांक 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि वार्षिक लेखापरीक्षित स्टँडअलोन आणि एकत्रित आर्थिक परिणाम**

(रू. लाखांमध्ये)

| क्र. | तपशील | स्टँडअलोन | | | | | एकत्रित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | समाप्त तिमाही | | | समाप्त वर्ष | | समाप्त तिमाही | | | समाप्त वर्ष | |
| | | 31.03.2025 लेखापरीक्षित | 31.12.2024 अलेखापरीक्षित | 31.03.2024 लेखापरीक्षित | 31.03.2025 लेखापरीक्षित | 31.03.2024 लेखापरीक्षित | 31.03.2025 लेखापरीक्षित | 31.12.2024 अलेखापरीक्षित | 31.03.2024 लेखापरीक्षित | 31.03.2025 लेखापरीक्षित | 31.03.2024 लेखापरीक्षित |
| 1 | एकूण परिचालन उत्पन्न | 10,43,256 | 9,73,864 | 9,69,874 | 39,52,044 | 35,43,351 | 10,47,605 | 9,77,425 | 9,73,430 | 39,66,795 | 35,56,198 |
| 2 | या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर-पूर्व, विशेष तथा/ किंवा असाधारण वस्तू पूर्व) | 1,15,847 | 1,40,667 | 1,35,626 | 4,93,427 | 4,05,338 | 1,23,314 | 1,41,289 | 1,36,697 | 5,09,448 | 4,18,152 |
| 3 | या कालावधीसाठी कर-पूर्व निव्वळ लाभ /(तोटा) (विशेष तथा/किंवा असाधारण वस्तूंच्या पश्चात) | 1,15,847 | 1,40,667 | 1,35,626 | 4,93,427 | 4,05,338 | 1,23,314 | 1,41,289 | 1,36,697 | 5,09,448 | 4,18,152 |
| 4 | या कालावधीसाठी कर-पश्चात निव्वळ लाभ / (तोटा) (विशेष तथा/किंवा असाधारण वस्तूंच्या पश्चात) | 1,03,355 | 95,893 | 80,734 | 3,78,526 | 2,54,906 | 1,10,458 | 96,338 | 81,629 | 3,93,421 | 2,66,768 |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न संदर्भ [या कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर)] | संदर्भ सूचना 3 | | | | | संदर्भ सूचना 3 | | | | |
| 6 | भरलेला इक्विटी शेयर निधी (दर्शनी मूल्य रु. 10/- प्रति शेयर) | 9,05,140 | 8,68,094 | 8,68,094 | 9,05,140 | 8,68,094 | 9,05,140 | 8,68,094 | 8,68,094 | 9,05,140 | 8,68,094 |
| 7 | राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी सोडून) | – | – | – | 23,53,305 | 19,38,231 | – | – | – | 23,90,844 | 19,60,875 |
| 8 | प्रतिभूति प्रीमियम खाते | 8,59,617 | 7,46,663 | 7,46,663 | 8,59,617 | 7,46,663 | 8,59,617 | 7,46,663 | 7,46,663 | 8,59,617 | 7,46,663 |
| 9 | निव्वळ मूल्य | 32,57,454 | 29,98,259 | 28,05,333 | 32,57,454 | 28,05,333 | 32,94,104 | 30,27,806 | 28,27,089 | 32,94,104 | 28,27,089 |
| 10 | चुकता ऋण पूंजी/बकाया ऋण (%) | 9.26% | 7.35% | 15.15% | 9.26% | 15.15% | 9.17% | 7.29% | 14.99% | 9.17% | 14.99% |
| 11 | थकबाकी विमोचन प्राधान्य शेअर्स | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 12 | कर्ज इक्विटी गुणोत्तर | 0.16 | 0.19 | 0.26 | 0.16 | 0.26 | 0.16 | 0.19 | 0.27 | 0.16 | 0.27 |
| 13 | प्रति शेयर आय (₹ 10/- प्रति) (वार्षिकीकृत नहीं) (चालू आणि बंद केलेल्या केल्यानंतर ऑपरेशन्ससाठी) — 1. मूळ | 1.19 | 1.10 | 0.93 | 4.36 | 2.94 | 1.27 | 1.11 | 0.94 | 4.53 | 3.07 |
| | 2. डायल्यूटेड | 1.19 | 1.10 | 0.93 | 4.36 | 2.94 | 1.27 | 1.11 | 0.94 | 4.53 | 3.07 |
| 14 | भांडवल विमोचन राखीव | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 15 | डिबेंचर मोचन आरक्षित निधि | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| 16 | कर्ज सेवा व्याप्ती अनुपात | लागू नाही | | | | | लागू नाही | | | | |
| 17 | व्याज सेवा व्याप्ती अनुपात | | | | | | | | | | |

सूचना 1: वरील विवरण सेबी (सूची आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) नियमावली, 2015च्या नियमन 33 आणि 52 अंतर्गत स्टॉक एक्सचेंजमध्ये दाखल केलेल्या तिमाही/वार्षिक आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा एक उतारा आहे. तिमाही/वार्षिक आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजचे संकेतस्थळः www.bseindia.com, www.nseindia.com आणि बँकेचे संकेतस्थळः www.centralbankofindia.co.in वर उपलब्ध आहे.

सूचना 2: सूचीबद्ध नियमांच्या नियम 52(4) मध्ये संदर्भित बँकेला लागू असलेल्या इतर लाइन आयटमसाठी, समर्पक खुलासे स्टॉक एक्सचेंजेस (BSE लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड) मध्ये केले गेले आहेत आणि हे आपण यूआरएल [www.bseindia.com, www.nseindia.com] वर पाहू शकता.

सूचना 3: एकूण सर्वसमावेशक उत्पन्न आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्नाशी संबंधित माहिती सादर केलेली नाही कारण आयएनडीएएस अद्याप बँकेला लागू केलेली नाही.

सूचना 4: सध्याच्या कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत राहण्यासाठी आवश्यक वाटले असेल तेथे मागील कालखंडातील आकडेवारीचे पुनर्गठन/पुनः वर्गीकरण करण्यात आले आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 28 एप्रिल 2025

विवेक वाही, कार्यकारी निदेशक
एम व्ही मुरलीकृष्ण, कार्यकारी निदेशक
महेंद्र दोहरे, कार्यकारी निदेशक
एम व्ही राव, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

www.centralbankofindia.co.in | आम्हाला फॉलो करा: Centralbankofindia | टोल फ्री नंबर: 1800-30-30 | व्हॉट्सअॅप नं.: 7900 123 123













## लोकमानस

loksatta@expressindia.com

### विवेकशून्यता विनाशाकडे नेते

**'जाहल्या काही** चुका...' हा अग्रलेख (२८ एप्रिल) वाचला. धर्मावर आधारलेली राष्ट्रे लयाला गेल्याची उदाहरणे इतिहास देतो. घटनाकारांनी भारताला हिंदू राष्ट्र घोषित केले नाही. भारतातील मुस्लीम हे पाकिस्तानातील हिंदूंपेक्षा अधिक सुरक्षित आहेत. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य आहे.

पाकिस्तानात लोकशाही नावालाच असून लष्करशहा आणि मुल्लामौलवी सत्तेचे दोर आळीपाळीने ओढत असतात. भारतात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात संतुलन असल्याने कोणतेही टोकाचे निर्णय होत नाहीत. बहुसंख्य भारतीय नागरिक मध्यममार्गी असून ते कडव्या डाव्या किंवा जहाल उजव्या विचारांच्या आहारी जात नाहीत. सामान्य नागरिकांच्या समंजसपणामुळे देशातील लोकशाही टिकून आहे. भारताने विसाव्या शतकात अमेरिका विरुद्ध सोव्हिएत युनियन शीतयुद्धात स्वीकारलेले अलिप्तवादाचे धोरण एकविसाव्या शतकात अमेरिका-चीन यांच्यातील व्यापार संघर्षातही उपयोगी पडताना दिसते. पाकिस्तान विसाव्या शतकात अमेरिकेच्या कच्छपी लागला आणि आता पाकिस्तानवर चीनची सावली गडद होताना दिसते. विवेकशून्यता पाकिस्तानला विनाशाच्या वाटेकडे घेऊन चालली आहे.

■ **डॉ. वि. हे. इनामदार**, भूगाव (पुणे)

### मोदी केवळ 'यशाचेच धनी'?

**'पहलगाममुळे प्रतिमासंवर्धनाचीही** कोंडी?' हा महेश सरलष्कर यांचा 'लाल किल्ला' सदरातील लेख (२८ एप्रिल) वाचला. पहलगाम येथील नृशंस हल्ल्यानंतर विरोधी पक्ष विनाविलंब भक्कमपणे सरकारच्या पाठीशी उभा राहिला. अभेद्य एकी दर्शवण्यासाठी सर्व पक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले, पण मोदींनी बैठकीला हजर न राहता बिहारच्या दौऱ्यावर जाणे पसंत केले. परिणामी प्रतिमासंवर्धन तर दूरच राहिले पण सुरक्षा व्यवस्थेतील हलगर्जीची अप्रत्यक्ष कबुलीच दिल्यासारखे झाले. बैठकीत सुरक्षेचा विषय येणारच होता आणि तसा तो आलाही. पण अमित शहांना तोफेच्या तोंडी देण्यात आले. अशा वेळी सत्य स्वीकारून धीरोदात्तपणाची साक्ष देता आली असती, पण मोदींच्या स्वभावाला ते कसे मानवेल? ते पडले फक्त यशाचे धनी! एरवी मोदी विरोधी पक्षांना किती व कसे मोजतात, वेळोवेळी संसदेत अनुपस्थित राहून संसदीय चर्चेला नगण्य कसे लेखतात, असंवेदनशीलतेचे प्रदर्शन कसे करतात, हे आता जगजाहीर आहे, पण पहलगाम हल्ला ही बाब सामान्य नाही याचे त्यांनी भान राखणे गरजेचे होते.

■ **श्रीकृष्ण साठे**, नाशिक

### प्रतिमासंवर्धनासाठी प्रचार पुरेसा नाही

**'पहलगाममुळे प्रतिमासंवर्धनाचीही** कोंडी?' हा 'लाल किल्ला' सदरातील लेख (२८ एप्रिल) वाचला. पंतप्रधान मोदींचे नेतृत्व जागतिक व्यासपीठावर भारताची भूमिका बळकट करणारे आहे, यात शंका नाही. मात्र, देशांतर्गत घटना, विशेषतः काश्मीर व मणिपूरसारख्या संवेदनशील भागांतील हिंसाचार भारताच्या प्रतिमेला धक्का लावू शकतो. प्रतिमासंवर्धन फक्त बाह्यप्रचाराने साधता येत नाही, ते देशांतर्गत शांतता आणि स्थिरतेनेच टिकते. माझ्या मते, देशाने आंतरराष्ट्रीय स्तरावर ताकद दाखवतानाच अंतर्गत समस्याही गांभीर्याने हाताळल्या पाहिजेत. कारण प्रतिमा ही कृतीतूनच उभी राहते, जाहिरातीतून नाही. त्यामुळे देशातील सर्वसमावेशक विकास, शांतता आणि लोकशाही मूल्ये जोपासणे हेच भारताच्या दीर्घकालीन प्रतिमासंवर्धनाचे खरे शस्त्र ठरेल.

■ **सतीश घुले**, खरवंडी, ता. पाथर्डी (जि. अहिल्यानगर)

### ही भारतासाठी धोक्याची घंटा

**जाहल्या काही** चुका... हे लोकसत्ता संपादकीय (२८ एप्रिल) वाचले. देशाच्या पूर्वसुरींनी जागतिक राजकारणात तटस्थचे, अलिप्ततेचे धोरण यशस्वीपणे राबवले. परंतु विद्यमान राजकीय नेतृत्व- पंतप्रधानांपासून आमदारापर्यंत- मंदिरांमध्ये पूजा-अर्चा, धार्मिक उत्सव, सणसमारंभात जाहीरपणे सहभागी होण्यातच धन्यता मानते. कुंभमेळ्याचे ब्रँडिंग हे त्याचेच उदाहरण. त्याच वेळी ते भारत हा बहुधार्मिक देश आहे हेदेखील सोयीस्करपणे विसरते. बहुसंख्यांच्या धर्माचे सातत्याने तुष्टीकरण करणे भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशासाठी धोक्याची घंटा ठरू शकते.

■ **विवेक चव्हाण**, शहापूर (ठाणे)

### बिहारमधील सभा एवढी अपरिहार्य?

**'पहलगाममुळे प्रतिमासंवर्धनाचीही** कोंडी?' हा 'लाल किल्ला' सदरातील महेश सरलष्कर यांचा लेख वाचला. पंतप्रधान सौदी अरेबियाचा अर्धवट दौरा सोडून आल्यानंतर तात्काळ काश्मीरचा दौरा करतील. अशी अपेक्षा होती. 'मेलेल्याच्या टाळूवरचे लोणी खाणे' अशी म्हण आपल्याकडे प्रचलित आहे.

काश्मीरमध्ये हत्याकांड झाल्यानंतर बिहारमध्ये सभा घेऊन आगामी निवडणुकीत यश मिळविण्याचे प्रयत्न झाले. या सभेत उच्चारलेले 'पृथ्वीच्या अंतापर्यंत दहशतवादी शोधून काढू' हे वाक्य आत्मविश्वास नसल्याचे दर्शविते. सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित नसणे म्हणजे आपण सर्वांपेक्षा मोठे आहोत, असे दाखविणे होय. पठारावर एकही पोलीस किंवा सुरक्षारक्षक नव्हता ही गोष्ट सर्व भारतीयांच्या लक्षात आली. एवढे लोक तिथे जात असताना जागोजागी तपासणी होत होती. तर मग पठारावर सुरक्षारक्षक का नव्हते? बिहारमधील सभेची घाई का झाली होती? पुण्यात चिखल असल्यामुळे सभा रद्द करणारे पंतप्रधान काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर बिहारची सभा का रद्द करू शकले नाहीत? राष्ट्रीय दुखवटा का जाहीर केला नाही?

■ **युगानंद साळवे**, पुणे

### पंतप्रधान काश्मीरला का गेले नाहीत?

**'पहलगाममुळे प्रतिमासंवर्धनाचीही** कोंडी?' हा लेख वाचला. यापूर्वी दोन वेळा अमेरिकेच्या राजकारण्यांनी भारताला भेट दिली असताना काश्मिरात अतिरेकी हल्ले झाल्याचा इतिहास असूनही इतकी बेफिकिरी सरकार व संरक्षण यंत्रणा कशी दाखवू शकतात? दोन हजार पर्यटक हजर असलेल्या जागी सुरक्षा असू नये, हे संतापजनक आहे. १९ एप्रिलला पंतप्रधान काश्मीर दौऱ्यावर जाणार होते परंतु खराब हवामानामुळे तो दौरा रद्द झाल्याचे सांगितले जाते, हेही संशयास्पद वाटते. पंतप्रधानांनी काश्मीरमध्ये जाऊन स्थानिकांना नैतिक बळ दिले असते तरी बरे झाले असते. 'मन की बात' करण्याऐवजी एक पत्रकार परिषद घेऊन पाकिस्तानला चार खडे बोल सुनवले असते, तर बरे झाले असते.

■ **अशोक आचरेकर**, मुलुंड (मुंबई)

### मुघलांना वगळल्यास गोंधळच वाढेल

**'एनसीईआरटीच्या पुस्तकातून** मुघल हद्दपार' ही बातमी (लोकसत्ता- २८ एप्रिल) वाचली. हा सरकारच्या अनाकलनीय निर्णयांपैकी एक निर्णय म्हणावा लागेल. भारतात मुघल कधी आलेच नव्हते, असे या पिढीच्या मनावर ठसवणे, हा यामागचा उद्देश आहे का? यातून गोंधळच वाढेल. केवळ धार्मिक दृष्टिकोनातून पवित्र जागा आणि तीर्थक्षेत्रांची माहिती समाविष्ट करून सर्वांना इतिहास समजावता येईल, अशी सरकारी धारणा दिसते. उलट मुघल आले होते आणि त्यांना यशस्वी प्रतिकार करून थोपवणारे भारतीय राजेही त्या काळात होते हे सविस्तर दाखविल्याने पुढच्या पिढीला भारत कसा घडत गेला हे समजेल. या पिढीला प्राचीन, मध्ययुगीन भारताचे चित्र यथार्थपणे समजावता येईल. त्यामुळे मुघलांना पुस्तकातून हद्दपार करण्याचा निर्णय इतिहासाची मोडतोड करणारा आहे.

■ **अशोक साळवे**, मालाड (मुंबई)

### हे 'आयजीच्या जिवावर बायजी उदार!'

**'कृषीपंपांच्या ७५** हजार कोटी रुपयांच्या थकबाकीवर पाणी!' ही बातमी (लोकसत्ता- २८ एप्रिल) वाचली. सामान्यपणे कृषीपंप धनदांडग्यांच्या कुळांच्या शेतांवर बसविलेले असतात. त्याची इत्थंभूत चौकशी केली पाहिजे व त्यांच्याकडून पैसे वसूल करून महावितरणला देणे योग्य ठरेल. एवढी मोठी रक्कम माफ करणे हे सामान्य जनतेने दिलेले पैसे शासनाने धनदांडग्यांना देऊन चुचकारण्यासारखे आहे. हे 'आयजीच्या जिवावर बायजी उदार!' असे झाले.

■ **नरेंद्र दीक्षित**

# करा हिमालय लक्ष खडे!

**एकनाथ शिंदे यांच्या जम्मू- काश्मीर दौऱ्याकडे राजकीय चष्म्यातून पाहिले जात आहे. आदिल या स्थानिक व्यक्तीच्या कुटुंबीयांना मदत करून त्यांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचा संदेशही दिल्यामुळे काही राजकीय गटांत अस्वस्थता निर्माण झाली आहे, मात्र संकटसमयी मदतीसाठी धाव घेणे, हीच शिवसेनेची कार्यपद्धती आहे...**



पहिली बाजू

**नरेश म्हस्के**
ठाणे मतदारसंघातील
शिवसेनेचे खासदार

**जम्मू-काश्मिरातील** भ्याड इस्लामी दहशतवादी हल्ल्यात मृत्यमुखी पडलेल्या तसेच जखमी झालेल्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः काश्मीरला रवाना झाले. काश्मीरशी शिवसैनिकांचे भावनिक नाते आहे. एकनाथ शिंदेंच्या जम्मू - काश्मीर दौऱ्याकडे राजकीय चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. या दौऱ्याचा अर्थ लावताना शिवसेना या पक्षसंघटनेची पार्श्वभूमी, काश्मीरशी असणारे नाते, बाळासाहेब ठाकरेंचे संस्कार आणि हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या आदिल नावाच्या स्थानिक रहिवाशाच्या कुटुंबीयांना त्यांनी केलेली मदत अशा विविध पैलूंचा विचार करावा लागेल.

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या भूमिकेतून शिवसेना या संघटनेची स्थापना झाली होती. संकटकाळी सर्वसामान्यांची सर्वतोपरी मदत-सेवा करण्याची शिकवण हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी दिली आहे. बाळासाहेबांच्या संस्कारात लहानाचा मोठा झालेला कोणताही शिवसैनिक अशा प्रसंगी घरी स्वस्थ बसू शकत नव्हता. परंतु नव्याने 'सेक्युलर' झालेल्या काही विघ्नसंतोषी लोकांना एकनाथ शिंदे साहेबांकडून सुरू झालेले प्रयत्न पाहून पोटशूळ उठला. देशावरील संकटसमयी स्वतः युरोपात पर्यटन करणाऱ्यांच्या प्रवक्त्यांनी शिवसेनेच्या सेवाकार्यावर पातळी सोडून टीका केली.

शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नाही तर शिवसेनेची स्थापनाच एक सामाजिक संघटना म्हणून झाली होती. कोणत्याही संकटकाळात प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून सेवाकार्यात सहभाग घेणे हा सामाजिक संघटनेचा स्वभाव असतो. आपत्तीस्थळी स्वतः मदत घेऊन पोहोचणे हा एकनाथ शिंदे यांचा स्वभाव आहे. महाड, इरशाळवाडी, कोल्हापूरचा पूर अशा सर्वच आपत्तीप्रसंगी एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीत एक सातत्य दिसते. दरवेळी ते घटनास्थळी गेले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर त्यांनी त्यांच्या स्वभावाला साजेशी कृती केली. त्यांनी वेगळे काही केले असे नाही. परंतु एकनाथ शिंदे त्यांच्या कृतीमुळे इतरांपेक्षा वेगळे ठरले, हे नक्की.

काश्मिरी पंडितांवर अत्याचार झाले, त्यांना जम्मू - काश्मीर सोडून जावे लागले तेव्हा बाळासाहेब ठाकरेंनी काश्मीरमधील हिंदू निर्वासितांसाठी आरक्षणाची तरतूद होईल, याची काळजी घेतली. अमरनाथ यात्रा बंद करण्याची दहशतवाद्यांनी धमकी दिली तेव्हा अमरनाथ यात्रा झाली नाही तर मुंबईतून हजला एकही विमान जाणार नाही, अशी भूमिका बाळासाहेब ठाकरेंनी घेतली होती. तेव्हापासून महाराष्ट्रातील असंख्य शिवसैनिक काश्मीरला जाऊ लागले, अमरनाथ यात्रेत सहभागी होऊ लागले. त्यामागे पर्यटन नव्हे तर देशासाठी भूमिका घेणे हा शिवसैनिकांचा उद्देश असे. बाळासाहेब ठाकरेंनी प्रत्येक शिवसैनिकाला जम्मू- काश्मीरशी जोडले ते कायमचेच.

एकनाथ शिंदे यांनी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मराठी बांधवांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी संवेदना व्यक्त करताना शासकीय पातळीवर सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. याशिवाय, स्थानिक नागरिकांनाही त्यांनी आधार दिला. सय्यद आदिल या स्थानिक व्यक्तीचाही यात बळी गेला असून त्याच्या नातेवाईकांना शिंदे यांनी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. ज्यामुळे त्यांच्या कुटुंबाला दिलासा मिळाला. त्याचे घर बांधून देण्याचा निर्णय एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला. काश्मीरमधील दहशतवादी यासीन मलिक याला दिल्लीत बोलवून जेवणाच्या पंक्तीत बसणाऱ्या संजय राऊत यांच्या पक्षाला आदिलच्या कुटुंबीयांना एकनाथ शिंदेंनी केलेल्या मदतीचे महत्त्व कळणार नाही. आमच्यासाठी आदिल महत्त्वाचा आहे यासीन नाही. आम्ही दहशतवाद्यांना गोळी घालू तर देशभक्ताचा सत्कार करू, हा संदेश जगाला देणे गरजेचे होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जम्मू- काश्मीर दौरा ही केवळ राजकीय कृती नसून, संकटकाळात नेतृत्व आणि मानवतेच्या मूल्यांचा प्रत्यय देणारा एक उत्तम नमुना आहे. काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यानंतर तेथील परिस्थिती गंभीर झाली होती. पर्यटक आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या हल्ल्यात मराठी पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या आणि काही जण अडकल्याच्या बातम्या समोर आल्या. अशा वेळी एकनाथ शिंदे यांनी क्षणाचाही विलंब न करता विशेष विमानाने काश्मीर गाठले. त्यांचा मुख्य उद्देश होता पीडित कुटुंबांना आधार देणे, अडकलेल्या मराठी पर्यटकांना सुरक्षितपणे परत आणणे आणि स्थानिक प्रशासनाशी समन्वय परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे.

एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीही पूर, वादळ, दरड कोसळणे यांसारख्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटांमध्ये तत्परतेने कारवाई केली आहे. त्यामुळे त्यांचा अनुभव आणि संकटकाळातील व्यवस्थापनकौशल्य यामुळे काश्मीरमधील पर्यटकांना आणि पीडितांना विश्वास वाटला. काश्मीरमध्ये अडकलेल्या अनेक मराठी पर्यटकांना सुरक्षितपणे महाराष्ट्रात परत आणण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी विशेष विमानाची व्यवस्था केली. त्यांनी काश्मीरमधील स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांशी थेट संपर्क साधला. पर्यटकांच्या सुरक्षित स्थलांतरासाठी आणि औषधोपचारांसाठी आवश्यक ती सर्व मदत पुरवली.

एकनाथ शिंदे यांच्या या दौऱ्याने राजकीय आणि सामाजिक स्तरांवर अनेक चर्चांना जन्म दिला. काहींनी यावर राजकीय टीका केली, तर बहुतेकांनी या दौऱ्याला संकटकाळातील खऱ्या नेतृत्वाचे उदाहरण मानले. शिवसेनेचे नेते आणि कार्यकर्ते याला बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे पालन मानतात, जिथे मराठी माणसाच्या हक्कांसोबतच मानवता आणि एकता यांना प्राधान्य दिले जाते.

संजय राऊत यांनी, शिंदे यांच्या दौऱ्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी या दौऱ्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला. पण हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचे खरे वारसदार अशा संकटसमयी परदेशात जाऊन बसणारे असू शकत नाहीत. प्रत्यक्ष संकटाच्या ठिकाणी जाऊन पीडितांना मदत करणे, त्यांच्या नातेवाईकांना धीर देणे ही शिवसेनेच्या कामाची पद्धत आहे. शिंदे यांनी केवळ मराठी माणसांनाच नव्हे, तर सर्व पीडितांना मदत केली. आदिल या स्थानिक व्यक्तीच्या कुटुंबीयांना मदत करून त्यांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचा संदेशही दिला, ज्यामुळे काही राजकीय गटांत अस्वस्थता निर्माण झाली.

एकनाथ शिंदे यांचा हा दौरा त्यांच्या नेतृत्वशैलीचे एक वैशिष्ट्य अधोरेखित करतो - संकटकाळात त्वरित कृती आणि जनतेशी थेट संवाद. त्यांनी यापूर्वीही ठाणे जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात अनेक संकटांमध्ये आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. महाड, इरशाळवाडीतील संकट अशा सर्वच ठिकाणी एकनाथ शिंदे स्वतः हजर राहिले. त्यांनी कोणत्याही पदावर असताना संकटसमयी शक्य ती सर्व मदत नेहमीच केली आहे.

एकनाथ शिंदे यांचा काश्मीर दौरा हा संकटकाळातील नेतृत्व आणि मानवता यांचा संगम होता. त्यांनी दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने कारवाई करत मराठी बांधवांसह सर्व पीडितांना मदत केली. या दौऱ्याने त्यांची जनसेवेची वृत्ती पुन्हा एकदा अधोरेखित केली, तसेच राजकीय चर्चांना नवे वळण दिले. सामान्य जनतेच्या दृष्टीने हा दौरा शिंदे यांच्या कृतिशील नेतृत्वाचा पुरावा ठरला. भविष्यातही कधी अशी संकटे उद्भवल्यास त्यांचा सामना करण्यात एकनाथ शिंदे योगदान देतील आणि त्यांचे नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात एक उदाहरण प्रस्थापित करेल, असा विश्वास वाटतो.

१९६२ च्या युद्धाच्या वेळी कुसुमाग्रजांनी काव्यरचना केली,

*बर्फाचे तट पेटुनी उठले*
*सदन शिवाचे कोसळते*
*रक्त आपुल्या प्रिय आईचे*
*शुभ्र हिमावर ओघळते*
*सह्यगिरीतील वनराजांनो*
*या कुहरातुन आज पुढे*
*रक्त हवे जर स्वतंत्रतेला,*
*रक्ताचे पडतील सडे*
*एक हिमाचल राखायास्तव*
*करा हिमालय लक्ष खडे*
*समरपुराचे वारकरी हो*
*समरदेवता बोलविते*

कुसुमाग्रजांच्या कवितेत सह्यगिरीतील वनराजा म्हणून मराठी माणसासमोर जबाबदारी उचलण्याचे आव्हान आहे, तर 'एक हिमाचय राखायास्तव करा हिमालय लक्ष खडे,' हा उपाय. अशा युद्धप्रसंगी एकनाथ शिंदे 'समरपुराचे वारकरी' ठरले याचे मला समाधान वाटते.

## कुतूहल

# कार्बन-१४ कालमापन पद्धती

**कार्बन हे** मूलद्रव्य सर्व सजीवांच्या शरीरात आढळणाऱ्या जैवरसायनांचा आधारस्तंभ आहे. कार्बनचा अणुक्रमांक आहे सहा. याचा अर्थ कार्बनच्या प्रत्येक अणूच्या केंद्रकात (न्यूक्लियस) सहा प्रोटॉन असतात. बहुतेकदा केंद्रकातील न्युट्रॉन्सची संख्याही ६ असते. पण क्वचित काही अणूंमध्ये ती संख्या सात असते आणि अगदी थोड्या अणूंमध्ये ती आठ असते. पण या सर्व अणूंच्या केंद्रकात प्रोटॉन्स मात्र सहाच असतात. त्यामुळे अणूंच्या यादीत हे तिन्ही प्रकारचे अणू सहाव्या स्थानावरच येतात. म्हणून त्यांना कार्बनचे 'समस्थानिक' (आयसोटोप) म्हणतात.



कार्बन-14चा अणू
केंद्रकात ६ प्रोटॉन आणि ८न्युट्रॉन

ज्या अणूंमध्ये सहा प्रोटॉन आणि सहा न्युट्रॉन असतात त्या अणूंना (६ ६=१२) कार्बन-१२ म्हणतात, ज्या अणूंमध्ये सात न्युट्रॉन असतात त्या अणूंना (६ ७=१३) कार्बन-१३ म्हणतात, तर आठ न्युट्रॉन असणाऱ्या अणूंना (६ ८=१४) कार्बन-१४ म्हणतात. कार्बन-१२ आणि कार्बन-१३ यांचे अणू स्थिर असतात. मात्र कार्बन-१४ चे अणू अस्थिर असल्याने कार्बन-१४ च्या केंद्रकातून बीटा किरणांचे उत्सर्जन होत राहते. म्हणून कार्बन-१४ ला 'किरणोत्सारी कार्बन' असेही म्हणतात. कार्बन-१४ च्या अणूचा क्षय होऊन त्याचे रूपांतर नायट्रोजनच्या अणूमध्ये होते.

१९४९ मध्ये विलार्ड लिबी यांनी कार्बन-१४ च्या अणूंचा क्षय कसा होतो यावर संशोधन केले. त्यांनी असे सिद्ध केले की, कार्बन-१४ चे जितके अणू सुरुवातीला असतील, त्यातल्या अर्ध्या अणूंचे रूपांतर नायट्रोजनमध्ये होण्यासाठी पाच हजार ७३० वर्षे लागतात. म्हणून कार्बन-१४ चे 'अर्धे आयुष्य' पाच हजार ७३० वर्षे आहे असे म्हणतात. दर पाच हजार ७३० वर्षांनी उरलेल्या अणूंपैकी अर्धे अणू रूपांतरित होत होत सुमारे ७० हजार वर्षांनी कार्बन-१४ च्या सर्व अणूंचे नायट्रोजनच्या अणूंमध्ये रूपांतर होते. या संशोधनाबद्दल लिबी यांना १९६० मध्ये नोबेल पारितोषिक देऊन गौरवण्यात आले होते.

पृथ्वीच्या उच्चस्तरीय वातावरणात नायट्रोजनबरोबर होणाऱ्या वैश्विक किरणांच्या अंतर्क्रियेमुळे कार्बन-१४ ची निर्मिती होते. प्रकाशसंश्लेषणाच्या प्रक्रियेत वनस्पती कार्बन-१२ बरोबर कार्बन-१४ही शोषून घेतात. वनस्पतीजन्य पदार्थ आहारात आल्याने सर्व प्राण्यांच्या आणि मानवाच्या शरीरात कार्बन-१४ चा प्रवेश होतो. श्वसनाद्वारेही सजीवांच्या शरीरात कार्बन-१४ चा प्रवेश होतो. मृत्यूनंतर मात्र सजीवांच्या शरीरातली कार्बन घेण्याची क्रिया थांबते आणि जो कार्बन-१४ शरीरात आहे त्याचा किरणोत्सारामुळे क्षय होऊ लागतो.

पुरातत्त्वविज्ञानाचे उत्खनन सुरू असेल, तिथल्या जैव अवशेषांमध्ये कार्बन-१४ आणि कार्बन-१२ यांचे प्रमाण किती आहे, आणि वातावरणात ते सामान्यतः किती असते, यावरून किती काळापूर्वी तो जैव अवशेष जिवंत होता याचे गणित मांडून कालमापन करतात. या मापनासाठी अद्ययावत् उपकरणे वापरतात. ७०,००० वर्षांपर्यंतच्या प्राचीन कालमापनासाठी ही पद्धत फार उपयुक्त आहे.

**- अरविंद आवटी**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

## उलटा चष्मा

# २४ तास काम

*'**या निशा** सर्वभूतानाम् तस्यांम जागर्ति संयमी' म्हणजे सर्व जग झोपलेले असताना जगाचा (राज्याचा) विचार करणारे ज्ञानी जागे असतात' असा भगवतगीतेतील मजकूर एका बाजूला व दुसरीकडे 'मी रात्री अकरापर्यंत काम करतो. पहाटे दोनपर्यंत फडणवीस, चारपर्यंत शिंदे व नंतर पुन्हा चारपासून मी' हे अजितदादांचे प्रसिद्ध वाक्य असलेले फलक राज्यभर लागले व चमत्कार घडावा तसे बदल मुंबईत दिसू लागले.*

*मंत्रालयात दिवसा होणारी गर्दी अचानक कमी झाली. सरकार जर २४ तास काम करणारे असेल तर ओळख पटवण्याचा आटापिटा करत दिवसा मंत्रालयात जायचेच कशाला? असे म्हणत अभ्यागत रात्री या तिघांच्या बंगल्यावर गर्दी करू लागले. रात्री अकरापर्यंत तिघांपैकी एकाचा पर्याय निवडायचा, अकरानंतर देवाभाऊ वा एकनाथरावांचे घर गाठायचे. पहाटे दोनला एकनाथरावांसमोर गर्दी करायची. या तिन्ही ठिकाणी काम झालेच नाही तर पहाटे चारला पुन्हा दादांना गाठायचे. अभ्यागतांच्या या नव्या युक्तीमुळे मलबार हिलचा परिसर रात्री गजबजून गेला. वाहतूक कोंडी होऊ लागली. हे चित्र बघून दादा व एकनाथराव मनोमन सुखावले. 'अब आयेगा ऊंट पहाड के निचे' असे म्हणत दोघांनी रात्रपाळीत सहाय्यकांची संख्या वाढवली. कोंडी अशी करायची की समोरच्याच्या लक्षात येऊनही बोलता येऊ नये. आता बघू पुढे काय होते ते असा संवाद 'सिग्नल' ॲपवरून झाल्यावर या दोघांनी देवाभाऊ झोपलेले असताना म्हणजे पहाटे दोन ते सकाळी आठ या काळात निर्णय घेण्याचा धडाकाच लावला. घेतला निर्णय की केला लगेच जाहीर या त्यांच्या धोरणामुळे पुनःप्रक्षेपणावर कशीबशी रात्र काढणाऱ्या चॅनेलवाल्यांना ताज्या बातम्या मिळू लागल्या. सरकार खरोखरच वेगवान झाले अशी स्तुती सकाळी उठल्याबरोबर जनतेच्या कानी पडू लागली.*

*दुसरीकडे भाजपच्या गोटात मात्र शांतता होती. काहीही झाले तरी बहुमत आपल्याकडे. ते दोघे कितीही कार्यक्षम झाले तरी मोठ्या पक्षाचा मान कुणी हिरावू शकत नाही. 'रात्र थोडी सोंगे फार' या न्यायाने काही दिवस हे चालेल व मग दोघेही गप्प बसतील. शेवटी देवाभाऊंची सर कुणालाच नाही असाच सूर भाजपच्या गोटात होता. नेमक्या याच गाफिलतेचा फायदा घेत दादा व एकनाथरावांची रणनीती आकाराला आली. मग ठरल्याप्रमाणे एका पहाटे दोघांनीही चाणक्यांची वेळ घेऊन एकत्रपणे दिल्ली गाठली. आता देवाभाऊ नक्कीच झोपलेले असतील असे म्हणत ते निश्चिंत मनाने दरबारात दाखल झाले. राज्यातल्या सामान्य नागरिकांना तातडीने दिलासा मिळावा. त्यांच्या तक्रारीची तड लागावी, त्यांना न्याय मिळावा म्हणून आम्ही दोघेही पहाटे दोन ते सकाळी आठ या वेळात कसे काम करतो हे त्यांनी सविस्तरपणे चाणक्यांच्या कानावर घातले. ऐकून त्यांच्या चेहऱ्यावर कौतुकभाव पसरलेले दिसताच एकनाथराव हळूच म्हणाले. 'अडचण फक्त एकच. मला पहाटे व दादांना भल्या सकाळी कामे हातावेगळी करताना मुख्यमंत्र्यांची मान्यता वा सही हवी असेल तर फाइल बाजूला ठेवावी लागते. यामुळे अभ्यागत नाराज होतात. तेव्हा आमची विनंती एवढीच की पहाटे दोन ते चार या वेळेत मला व चार ते आठ या काळात दादांना मुख्यमंत्रीपदाचे अधिकार दिले तर सरकार अधिक गतिमान होईल. शिवाय आमच्याही मनातली रुखरुख कायमची निघून जाईल.'*

*हे ऐकताच चाणक्य चमकले. मी बोलतो देवेंद्रशी असे म्हणत ते उठले. दोघेही तिथून गेल्यावर त्यांनी थेट देवाभाऊंना फोन केला व म्हणाले 'एकतर तुम्ही रात्रभर जागे राहा किंवा ते दोघे रात्री दोन वाजता झोपतील याची तरी व्यवस्था करा. यानंतर अशी मागणी यायला नको'*

## तर्कतीर्थ विचार

# सदाचारी व्रत आणि श्रद्धांचे चिंतन

**महाराष्ट्रातील सदाचारी** समाजसुधारकांनी वंचितांसाठी शिक्षण संस्था, वसतिगृहे, अनाथाश्रम, रुग्णालये उभारली, ती आज स्थापनेची शतकोत्तर वाटचाल करत आहेत. अशांपैकी डॉ. ग. श्री. खैर एक होत. ते अनाथ विद्यार्थिगृहात शिकले. त्या वसतिगृहास त्यांनी आपले जीवन समर्पित केले नि आपले नि संस्थेचे 'अनाथत्व' संपुष्टात आणले. डॉ. ग. श्री. खैर यांनी 'सदाचार चिंतनी' (भाग- १ ते ५)ची रचना केली. पहिल्या भागाच्या सलग तीन आवृत्ती प्रकाशित कराव्या लागल्या. हे यश पाहून त्यांनी १९६८ मध्ये 'सदाचार चिंतनी' (भाग- २)ची रचना केली. तेव्हा त्याचे उत्स्फूर्त स्वागत करत तर्कतीर्थांनी 'नवभारत' मासिकाच्या ऑक्टोबर, १९६८ च्या अंकात या ग्रंथाची प्रशंसा केली.

'सदाचार चिंतनी'चे लेखन डॉ. ग. श्री. खैर यांचे अनुभवसंचित होय. संस्कार देण्याचा, रुजविण्याचा हेतू या लेखनामागे होता ते त्यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट केले आहे. हे लेखन पाश्चात्त्य देश पाहिल्यानंतर केलेले असल्याने देश नि मनुष्यबळ विकासाची तळमळ त्यामागे आहे. या ग्रंथात त्यांनी जीवनाची तीन व्रते व श्रद्धा वर्णिल्या आहेत. पैकी तीन व्रते, पुढील होत - (१) दुसरा माणूस माझ्याशी बरे-वाईट कसेही वागो, माझा धर्म चांगले वागण्याचा आहे. (२) आपले विचार प्रगतिशील, गतिमान राहिले पाहिजेत. बुद्धी व विचार गंजू द्यायचे नाहीत. (३) सर्वांच्या विचाराने काम करणे. तीन श्रद्धा अशा होत्या - (१) स्थितप्रज्ञता, (२) चांगुलपणा, (३) विधायक कार्य. तर्कतीर्थांनी आपल्या या ग्रंथ परीक्षणात या व्रत आणि श्रद्धांचे वर्णन 'असिधाराव्रत' असे केले आहे. डॉ. खैर यांनी आपल्या ग्रंथांमध्ये या व्रत श्रद्धांचे विवरण विविध दृष्टांतांद्वारे केले आहे.

तर्कतीर्थांनी या पुस्तक परिचयात लिहिले की, 'सदाचार-चिंतनी'त विवेकपूर्ण सामाजिक जीवन जगण्याकरिता आवश्यक असलेल्या सिद्धांताची चर्चा केली आहे. माणसाने स्वतःस जन्मभर विद्यार्थी समजून आत्मपरीक्षण करून व्यक्तिमत्त्वाचा विकास करीत कसे राहावे याबद्दलचे विचार यात माडंले आहेत. माणसाने समाजसुधारणेच्या कार्याचा प्रारंभ स्वतःच्या सुधारणेपासून करावा, अशा व्यक्तिप्रधान दृष्टिकोनातून बरेचसे विवेचन केले आहे. भारतीयांच्या राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, प्रापंचिक वा वैयक्तिक जीवनावर अनेक स्फुट विचार यात सांगितले आहेत.

लेखक बुद्धिवादी असूनही 'भवद्गीता' व 'गणेशगीता' यांवर श्रद्धा आहे हे (९२) 'गीतेने बनविलेला माझा मनःपिंड' (९३) 'गणेश, उपासना आणि बुद्धिविकास' या चिंतनी वाचल्यावरून ध्यानात येईल. गीतेतील अवतारवाद, पुनर्जन्मवाद हे बुद्धिवादाच्या कक्षेत कसे येतात? बुद्धिवादी श्रद्धेशी 'गणेशगीता' व 'भगवद्गीता' विसंगत ठरते. ही संक्रमणकालातील मनाची घडण आहे, असे यावरून म्हणता येईल. सुबोध भाषाशैली, विवेकयुक्त विवेचन, सदाचारविषयक सुश्लिष्ट विवरण हे या चिंतनीचे गुण प्रशंसास्पद होत, यात शंका नाही.

वरील तर्कतीर्थकृत परीक्षण वाचत असताना माझ्या लक्षात येते की, 'साधना साप्ताहिक'ला दिलेल्या एका मुलाखतीत संत तुलसीदासांचा दोहा देऊन समजावले होतं की, ''गरिबाचे कण्हणेदेखील वाया जात नाही. ज्या लोखंडाने बैलाची मान कापली जाते, त्या मेलेल्या बैलाच्या कातडीपासून जो घिसाड्याचा भाता तयार होतो, त्या भात्यात लोखंड वितळण्याची नाही तर त्याचे भस्म करण्याची ताकद असते. मला याउलट विधायक दृष्टांत आठवतो, तो असा की, साने गुरुजींचा 'पत्री' काव्यसंग्रह अनाथ विद्यार्थिगृह प्रकाशनने १९३५ ला प्रकाशित केला. त्यातील देशभक्तीपर रचना लक्षात घेऊन ब्रिटिशांनी बंदी घातली. अनाथ विद्यार्थिगृह प्रकाशनास मोठा तोटा सहन करावा लागला. प्रायश्चित्त म्हणून या संस्थेस साने गुरुजींनी अल्प मानधनावर 'श्यामची आई'चे अधिकार बहाल केले, तेव्हापासून आजचे पुणे विद्यार्थिगृह 'श्यामची आई' अव्याहत छापते आहे. साने गुरुजी स्मृती संग्रहालय उभारत असताना 'श्यामची आई'ची भाषांतरे शोधत पुणे विद्यार्थिगृह प्रकाशनाच्या मुद्रणालयात पोहोचलो होतो. तत्कालीन व्यवस्थापक शेटे सांगत होते की, मुद्रणालयाच्या यंत्रांवर त्या वेळी चढविलेला फार्मा आम्ही अजून उतरविलेला नाही. पुणे विद्यार्थिगृह चालविण्यात 'श्यामची आई'चा सिंहाचा वाटा आहे. ज्या दिवशी साने गुरुजींनी हे पुस्तक या संस्थेस कायमचे दिले, त्या दिवशी ते प्रचंड अस्वस्थ होते. मित्रास करुण स्वरात म्हणाले की, ''आज मी आई विकून आलो.'' पुढे ते निःशब्द होते.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**
drsklawate@gmail.com

# १०० दिवसांतील शंभरी!

## ऊटपटांग निर्णय, प्रशासकीय हडेलहप्पी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवरील धरसोड यांमुळे ट्रम्प यांची लोकप्रियता अन्य अध्यक्षांपेक्षाही अधिक घसरली...

**जगातील एकमेव** महासत्तेच्या प्रमुख पदावर डोनाल्ड ट्रम्प आरूढ झाले त्यास आज २९ एप्रिल रोजी १०० दिवस होतील. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांस पराभूत केल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकी रिवाजानुसार २० जानेवारीस अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. त्या वेळी 'लोकसत्ता' संपादकीयाने त्यांच्या झंझावाती प्रारंभाचे वर्णन 'वॉशिंग्टनची कुऱ्हाड' (२२ जानेवारी) असे केले. ते किती रास्त होते ते नव्याने सांगण्याची गरज नाही. या वॉशिंग्टन-स्थित 'कुऱ्हाडी'ने जागतिक अर्थकारण, समाजकारण यांवर सावली धरणाऱ्या वृक्षांची कत्तल इतक्या जोमाने केली की त्यानंतरच्या वणव्यात हा कुऱ्हाडीचा दांडाच आता बळी पडतो की काय अशी स्थिती निर्माण होताना दिसते. या १०० दिवसांत ट्रम्प यांनी जे करून दाखवले ते अद्वितीयच. एरवी समर्थकांचे रूपांतर इतक्या तातडीने विरोधकांत करून दाखवणे हे तसे येरागबाळ्याचे काम नव्हे. ट्रम्प हे अशा सामान्य नेत्यांतले नसल्याने त्यांना हे शक्य झाले. हे यश इतके देदीप्यमान आहे की ते पुन्हा निवडून यावेत यासाठी एके काळी देव पाण्यात घालून प्रतीक्षा करणाऱ्यांची वळलेली बोबडी बराच काळ तशीच राहील असे दिसते. तथापि कडव्या टीकाकारांसही त्यांच्यातील एका दुर्मीळ गुणाचे कौतुक करावेच लागेल. माघार घेणे हा तो गुण. आज पहिल्या शंभर दिवसीय धडाक्यातील एकही मोठा निर्णय असा नाही की ट्रम्प यांनी त्यापासून माघार घेतली नाही वा त्या भूमिकेत बदल केला नाही. त्यांच्या पहिल्या शतकदिन पूर्तीनिमित्ताने या माघारींचा आढावा घ्यायला हवा. तसेच ही वेळ त्यांच्यावर का आली त्या कारणाचाही स्पष्ट उल्लेख करायला हवा.

यातील सगळ्यात ढळढळीत आणि पहिली भव्य माघार म्हणजे त्यांनी स्वतःच स्वतःचा लांबणीवर टाकलेला आयात शुल्क वाढीचा निर्णय. या निर्णयामुळे जगातील सर्व देशांची उत्पादने अमेरिकी बाजारात विकण्यासाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाणे अपेक्षित होते. ही घोषणा झाली आणि अमेरिकी बाजारात जी घसरण सुरू झाली त्यामुळे ट्रम्प यांच्या सल्लागारांचे डोळे पांढरे झाले. जे अमेरिकन ट्रम्प यांच्या सत्तारोहणामुळे येऊ घातलेल्या 'अच्छे दिनां'कडे डोळे लावून होते त्यांनी आहे ते तरी राहणार की जाणार या भीतीने डोळे फिरवले. अखेर स्वतःच्याच निर्णयास ९० दिवसांची स्थगिती देण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्याकडे 'होते असे कधी' असे म्हणून डोळेझाक करता आलीही असती. पण ट्रम्प यांनी या काळात आपल्या निर्णयांपासून माघारी जाण्याचा सपाटा लावला. ज्या शत्रुपक्षीय चीनवर त्यांनी २४५ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क वाढवण्याची धमकी दिली त्याच चीनबाबत त्यांचा सूर नरमाईचा झाला. इतका की चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग अमेरिकेकडे ढुंकून बघण्यास तयार नसताना ट्रम्प यांच्यावर त्यांची आर्जवे करण्याची वेळ आली. तीच बाब अमेरिकेत आलेल्या परदेशी विद्यार्थ्यांबाबत. हजारो विद्यार्थ्यांना ट्रम्प यांनी 'चले जाव'चा आदेश दिला खरा. पण अमेरिकेचे यामुळे काय नुकसान होईल याचा अंदाज आल्यावर त्यातील निम्म्याहून अधिकांचा हा आदेश त्यांनी मागे घेतला. परदेशी कंपन्यांच्या परदेशातच बनवलेल्या मोटारींवर खच्चून आयात कराची घोषणा करणारे ट्रम्प नंतर हळूच मोटार उद्योगाचा अपवाद करते झाले. ही माघारमौज फक्त आर्थिक निर्णयांबाबतच दिसून आली असे नाही. मुत्सद्देगिरीतही तेच झाले. ज्या युक्रेनच्या झेलेन्स्की यांना युद्धखोर ठरवत व्हाइट हाऊसमधून अपमानित होऊन जावे लागले त्याच झेलेन्स्की यांची भलामण करण्याची वेळ ट्रम्प यांच्यावर आली. कारण? झेलेन्स्की यांना दूर सारत रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचा पत्कर घेणे राजकीयदृष्ट्या महाग पडेल याची त्यांना उशिरा का असेना झालेली जाणीव. सामान्य अमेरिकी नागरिक अनेक गुन्हे माफ करू शकतो. पण अमेरिकेत एका प्रमादास क्षमा नाही. रशियाची तळी उचलणारा अध्यक्ष अमेरिकी नागरिक सहन करू शकत नाहीत. हे आणि असे बरेच काही अवघ्या १०० दिवसांत घडले.

याचा परिणाम त्यांच्या लोकप्रियतेवर झाला नसता तरच नवल. ऊटपटांग निर्णय, प्रशासकीय हडेलहप्पी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवरील धरसोड वृत्ती यांमुळे ट्रम्प यांची लोकप्रियता झरझर घसरत असून पहिल्या १०० दिवसांत इतकी घसरण अनुभवणारे ते अलीकडच्या काळातील पहिले अध्यक्ष ठरतील. इतकेच नव्हे तर उठता-बसता ट्रम्प ज्यांना लाखोली वाहतात ते माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यापेक्षाही पहिल्या १०० दिवसांत ट्रम्प यांच्या लोकप्रियतेची अधिक धूप झाली असे ताज्या पाहण्यांतून दिसते. अध्यक्षपदी आरूढ झाल्यानंतर अवघ्या एक महिन्यात ट्रम्प यांचे समर्थक निम्म्यापेक्षा कमी होऊन ४७ टक्क्यांवर आले आणि आज १०० दिवसांचा टप्पा ते पूर्ण करत असताना हे प्रमाण ४२ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. या तुलनेत बायडेन याचा लोकप्रियता निर्देशांक पहिल्या १०० दिवसांत ५९ टक्के इतका होता. त्यांच्या तुलनेत स्वतःस कर्तबगार, धाडसी इत्यादी समजणाऱ्या ट्रम्प यांची घसरण फारच केविलवाणी. ट्रम्प यांच्यावर जनता रुष्ट होण्याची कारणेही लक्षात घ्यावी अशी. आपला उद्योगपती मित्र 'टेस्ला'कार आचरट इलॉन मस्क यांच्या सल्ल्याने ट्रम्प यांनी 'सरकारी कार्यक्षमता विभाग' सुरू केला आणि एकापाठोपाठ एक अनेक खात्यांत नोकरकपात सुरू केली. हे जनतेस रुचले नाही. प्रत्येकी १०० अमेरिकी नागरिकांतील ५५ जणांनी या नोकरकपातीविरोधात आपले मत नोंदवले. हा रोष इतका आहे की त्याचा फटका खुद्द मस्क यांच्या 'टेस्ला' कंपनीसही बसला. लोकांनी या कंपनीच्या मोटारी खरेदी करणे कमी केले. परिणामी कंपनीच्या नफ्यात तब्बल ७१ टक्क्यांची घट झाली. या फटक्याने मस्क यांच्याही डोळ्यासमोर काजवे चमकले आणि त्यांनी या सरकारी खात्यातून बाहेर पडण्याची भाषा सुरू केली. यापेक्षा अधिक अमेरिकी जनता ट्रम्प यांच्यावर नाराज आहे ती आयात शुल्काबाबतच्या धोरणाने. सणसणीत ६० टक्के नागरिकांनी ट्रम्प यांची ही आयात धोरणे चुकीची असल्याचे मत नोंदवले. अमेरिकेस पुन्हा (?) महान बनवण्याच्या नादात ट्रम्प अधिकाधिक जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती देशांतर्गत करून आत्मनिर्भर होऊ पाहतात. पण तसे केल्याने अमेरिकेत अनेक घटकांच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याने नागरिकांस संभाव्य चलनवाढीची, म्हणजेच महागाईची, चिंता आहे. त्यामुळे नागरिकांस हे धोरण मंजूर नाही. याचबरोबर अमेरिकी नागरिक ट्रम्प यांच्यावर यापेक्षाही अधिक नाराज दोन बिगर-आर्थिक कारणांमुळे आहेत.

एक म्हणजे ट्रम्प यांची सरकारी उच्चपदस्थांवर असलेली भिस्त आणि न्यायालयाप्रति ते सातत्याने दाखवत असलेला अनादर. पाहणीतील ५१ टक्के नागरिकांस ट्रम्प यांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या मतांस इतकी किंमत देणे पसंत नाही. मंत्रिमंडळातील राजकीय सहकाऱ्यांपेक्षा आपला अध्यक्ष नोकरशहांवर अधिक विसंबून आहे हे बहुसंख्यांस आवडलेले नाही. तसेच सर्वाधिक म्हणजे ७५ टक्के नागरिकांनी ट्रम्प यांचा न्यायालयांबाबतचा अनुदार दृष्टिकोनही अस्वीकारार्ह ठरवला. त्यातही मुद्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करण्याचा असेल तर ८० टक्के नागरिकांनी या पाहणीत ट्रम्प यांच्या वागण्याचा निषेध केला.

तेव्हा आपली लोकप्रियता झपाट्याने घसरू लागल्याचे पाहून ट्रम्प यांस भान आले आणि आपल्याच भूमिकांपासून माघार घेण्याची वेळ त्यांच्यावर आली. अशा तऱ्हेने आपल्या बोलघेवड्या नेत्यावर जागरूक अमेरिकी लोकशाहीने पहिल्या १०० दिवसांतच शंभरी भरल्याची वेळ आणली. ही घसरण ट्रम्प कशी रोखतात ते आता पाहायचे.

> **वाढीव आयात शुल्क लागू करणे, विद्यार्थ्यांस परत पाठवणे, रशियाची भलामण अशी पावलोपावली माघार घेण्याची वेळ ट्रम्प यांच्यावर गेल्या तीन महिन्यांत आली...**

लेख

# दहशतवादाचा माग कसा काढायचा?

वप्पाला बालचंद्रन
केंद्रीय मंत्रिमंडळाचे माजी विशेष सचिव




**दहशतवादी हल्ला** झाल्यानंतर तपास यंत्रणा कामाला लागतात आणि त्यापुढले- या एकंदर घटनेचा अभ्यास करून काही व्यूहात्मक निष्कर्ष काढण्याचे कामही तज्ज्ञमंडळींमार्फत केले जाते. हे दुसरे काम पुढल्या काळासाठीही उपयुक्त ठरावे, अशी अपेक्षा असते. त्या दृष्टीने अमेरिकेतील '९/११'च्या (वर्ल्ड ट्रेड सेंटर उद्ध्वस्तीकरण) हल्ल्यानंतरचा ५८९ पानी अहवाल जगभरच्या दहशतवादविरोधी सुरक्षा अधिकाऱ्यांनी वाचलाच पाहिजे असा आहे. विशेषतः या अहवालातील 'फोरसाइट ॲण्ड हाइन्डसाइट' (हल्ल्याआधी आणि नंतर) या ११ व्या प्रकरणात 'कल्पनाशक्ती'चे महत्त्वही अधोरेखित करण्यात आलेले आहे. धोका कसकशा प्रकारे असू शकतो, हे उमगण्यासाठी कल्पनाशक्ती वापरण्याचे काम अधिकाऱ्यांनी केले पाहिजे, म्हणजेच कल्पनाशक्तीचे 'संस्थात्मीकरण' झाले पाहिजे, असे हा अहवाल सांगतो. सप्टेंबर २०११ मध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला, त्याआधी जानेवारी २००० ते ऑगस्ट २००१ या १८ महिन्यांत अशी कल्पनाशक्ती वापरण्याच्या किमान १० संधी 'सीआयए' आणि 'एफबीआय' या तपासयंत्रणांनी गमावल्याचे हा अहवाल सांगतो. अशीच अभ्यासपद्धती मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या हल्ल्यानंतर स्थापन झालेल्या समितीनेही वापरली, तिचा मी दुसऱ्या फळीतला सदस्य होतो. हे सारे आता सांगण्याचे कारण अर्थातच पहलगामचा हल्ला.

प्रश्न असा की, 'लष्कर- ए- तोयबा' (एलईटी) कडून पहलगामसारख्या ठिकाणांना धोका असल्याची कल्पनाही आपल्याला नव्हती काय. विशेषतः काही दिवसांपूर्वीच, १० एप्रिल रोजी '२६/११ चा एक सूत्रधार तहव्वुर राणा याला भारतात आणले गेल्यामुळे आपण 'दहशतवादावर मोठा विजय' मिळवल्याच्या आनंदात होतो. अशा वेळी, दहशतवाद्यांचा तर्क आणि त्यांचे काम फारच निराळ्या प्रकारे चालतात हे आपण लक्षात घेतले नाही. मोठे हल्ले केल्यानंतर दहशतवादी संघटनांना मिळणारी सहानुभूती आणि त्यांच्याकडील पैशाचा ओघसुद्धा वाढू लागतो. हल्ल्याचा छडा लावणाऱ्या तपासयंत्रणांनी किती जणांना फासापर्यंत नेले, याकडे लक्ष न देता दहशतवादी संघटना पुढले बेत आखत असतात, या इतिहासाकडे आपले दुर्लक्ष झाले काय असाही प्रश्न यातून उरेल.

तहव्वुर राणा हा पाकिस्तानी 'इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स' (आयएसआय) या गुप्तहेर संघटनेसाठी 'एलईटी'मार्फत काम करत होता, हे सर्वज्ञात आहे. डेव्हिड हेडलीच्या नोंदींमधून राणा आणि हेडली एकमेकांशी कसे सतत संपर्कात होते आणि '२६/११' नंतरच्या वर्षी (२००९) त्यांनी डेन्मार्कमधल्या (प्रेषित मुहम्मद यांची व्यंगचित्रे छापणाऱ्या) वृत्तपत्रावरील हल्ल्याची आखणी कशी करून दिली, याचा तपशील मिळतो. हेडलीने अमेरिकेतील नॉर्दर्न डिक्स्ट्रिक्ट ऑफ इलिनॉयच्या जिल्हा न्यायालयाला दिलेल्या जबाबातही ३३ वेळा राणाचे नाव आहे. 'एलईटी'च्या म्होरक्यांसाठी २००३ पासून हेडलीने काम करणे सुरू केले तेच मुंबईत राणाच्या मालकीच्या जागेतून; आणि पुढल्या (विशेषतः २००६ नंतरच्या) मुंबई-भेटींमध्ये त्याने बोट भाड्याने घेऊन समुद्रकिनाऱ्याचे व्हिडीओ चित्रीकरण, हल्ल्यांच्या ठिकाणांची निवड व त्यांचे जीपीएस लोकेशन अशी अनेक कामे 'एलईटी'साठी केली, हे सारे हेडलीच्या जबाब व नोंदींतून स्पष्ट झालेले आहे. थोडक्यात, राणा आणि हेडली हे दोघेही 'एलईटी'चे हस्तक होते, याचे पुरावे आहेत.

या राणा आणि हेडलीचा जम्मू-काश्मीरशी काय संबंध, असा प्रश्न अनेकांना पडेल. हेडलीची कागदपत्रे मिळवून बातमीदारी करणाऱ्या स्टीफन टँकेल आणि सॅबेस्टियन रोटेला यांच्या लिखाणातून असे उघड होते की, 'एलईटी' आणि 'आयएसआय' यांचा रोख काश्मीर भारताकडून हिसकावणे हाच असल्याने त्यांच्या सर्व कारवाया काश्मीरच्या संदर्भातच चाललेल्या असतात. त्यास मुंबई हल्लासुद्धा अपवाद नव्हता. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी, म्हणजे भारत सरकारला (काश्मीरसाठी) पैसा मुंबईतून सर्वाधिक मिळतो आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांचे मुंबई हे केंद्र आहे. याच शहरावर, त्यातही पंचतारांकित हॉटेलांना लक्ष्य करून हल्ला केल्यास काश्मीरची भारतीय रसद कमकुवत करता येईल, ज्यूंच्या 'छबाड हाउस'वर हल्ल्यातून अमेरिकेशी भारताचे आर्थिक संबंध कमकुवत होतील, असे तर्कट '२६/११'मागे असल्याचे हेडलीच्या नोंदींआधारे या दोघा पत्रकारांचे म्हणणे आहे. यापैकी टँकेल यांनी तर पाकिस्तानात आणि अमेरिकेत अनेकांच्या मुलाखती घेऊन 'स्टॉर्मिंग द वर्ल्ड स्टेज' हे पुस्तकही २०११ मध्ये लिहिले होते. त्यातही नमूद आहे की, २००१ मध्ये हेडली हा 'एलईटी'कडे 'काश्मीर जिहाद'चे काम मागण्यासाठीच गेला होता; पण त्याला केवळ टेहळणीचे काम देण्यात आले. याखेरीज, 'यापुढे काश्मीर आणि भारतावर लक्ष केंद्रित करावे की थेट अफगाणिस्तानात धडक मारून 'ग्लोबल जिहाद' पुकारावा' अशी चर्चा 'एलईटी'मध्येच सुरू झाली होती, ती पुन्हा काश्मीरकडे वळवण्यासाठी मुंबई हल्ला उपयोगी पडेल, असा 'आयएसआय'चा हिशेब होता.

पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी हल्लीच काश्मीरला इस्लामाबादच्या 'गळ्यावरली ठसठसती नस' म्हटले आहे, त्याच्या कितीतरी आधी ही तयारी सुरू होती. प्रत्यक्ष 'आयएसआय'शी हेडलीचा संबंध आला २००६ मध्ये. त्या वेळी त्याने काही तस्करांशी संधान बांधल्याच्या 'आरोपा'वरून त्याला ताब्यात घेऊन 'आयएसआय'तर्फे मेजर समीर अली आणि मेजर इक्बाल यांनी त्याची 'चौकशी' केली होती. मग मात्र, मेजर इक्बाल यांनीच मुंबईतल्या टेहळणीसाठी हेडलीला पैसा पुरवला. या समीर अली आणि इक्बाल यांच्याशी हेडली सतत संपर्कात राहिला. प्रत्येक टेहळणीच्या नोंदींचे- व्हिडीओ, नकाशे, इतर नोंदी असलेले- 'पेन ड्राइव्ह' हेडलीकडून 'आयएसआय' आणि 'एलईटी' या दोहोंना मिळत होते. यातूनच 'एलईटी'चा साजिद मीर, 'एलईटी'पासून फारकत घेतलेला पण 'आयएसआय'ने पोसलेला सय्यद आणि 'आयएसआय'चा मेजर इक्बाल यांनी २००७ संपेपर्यंत मुंबईतल्या 'लक्ष्यां'ची निवडसुद्धा केली होती. प्रत्यक्ष कट रचला गेला तो मार्च २००८ मध्ये. त्या वेळी मुजफ्फराबाद येथे झालेल्या बैठकीत, समुद्रमार्गेच मुंबईत घुसायचे हेही ठरले होते. मग भारतीय नौदलाच्या गस्ती नौकांना गुंगारा देत मुंबईपर्यंत कसे यायचे याची तालीमही होऊन सागरी 'जीपीएस लोकेशन'नुसार मार्ग आखला गेला. मात्र हल्ल्याच्या नेमक्या जागा एप्रिल २००८ नंतरच ठरल्या. टेहळणी करणाऱ्या हेडलीला, 'भाभा अणुशक्ती केंद्रा'च्या फक्त रहिवासी इमारतींवर हल्ला करता येईल का हेही चाचपण्यास सांगण्यात आलेले होते- कारण एकमेकांच्या अणु-प्रकल्पांवर हल्ले करायचे नाहीत, हा आंतरराष्ट्रीय नियम पाळला नसता तर पाकिस्तानची पत पारच लयाला गेली असती.

२६/११ हल्ल्याच्या परिणामी 'एलईटी'चे महत्त्व वाढले आणि या संघटनेकडे पैशांचा ओघही वाढलाच, असे टँकेल यांनी एका पाश्चात्त्य राजनैतिक अधिकाऱ्याचा हवाला देऊन लिहिले आहे. काश्मीरमध्ये- पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा माग काढतानाही बरेच मागे जावे लागेल. त्यासाठी कल्पनाशक्ती वापरावी लागेल आणि त्याआधारे शक्यतांची पडताळणी करावी लागेल.

आणखी एक म्हणजे, पहलगामच्या हल्ल्यानंतर कुणा हल्लेखोर संघटनेचे महत्त्व वाढू नये, याचाही बंदोबस्त भारताला करावा लागेल.

> **पहलगाम हल्ल्याची पाळेमुळे खोदून काढल्यास सीमेपल्याडच्या कटाची लक्तरे पुन्हा वेशीवर टांगली जातील! पण हे काम बरेच दिवस चालणारे असते असे '२६/११'चा तपास सांगतो...**

अन्वयार्थ

# पाणी का पुरत नाही?

**उन्हाळा संपायला** अजून जवळपास दीड महिना शिल्लक असताना राज्याचा सरासरी पाणीसाठा ४० टक्क्यांखाली गेला आहे. हल्ली जूनमध्ये सगळीकडे समान आणि सरासरीइतका पाऊस होतोच असे नाही. त्यामुळे हा पाणीसाठा दोन-अडीच महिने पुरवणे क्रमप्राप्त. आता हा साठा गेल्या वर्षीपेक्षा बरा, पण तरी तो पुरत नाही, हीच मुळात रड. कारण, राज्यात ठिकठिकाणी वाढलेल्या टँकरच्या फेऱ्या आणि अनेक शहरांमध्ये दररोज नळाने होऊच न शकणारा पाणीपुरवठा ही वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही. 'लोकसत्ता'ने २७ एप्रिलला यावर प्रकाश टाकणारे वृत्त प्रकाशित केले. पाण्याची ही बोंब केवळ ऊन जास्त असल्याने, बाष्पीभवन जास्त होऊन झाली आहे, असे मानण्याचे कारण नाही.



अर्थात तापमानवाढीचा परिणाम यावर आहेच, पण तापमानवाढ होणार हे गृहीत धरून न केलेल्या नियोजनाचा परिणाम जास्त आहे, हे नक्की.

राज्यातील जनता दर उन्हाळ्यात तहानलेली कशी राहते, या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर व्यवस्थेने कधी तरी दिले पाहिजे. 'टँकर पुरवले जात आहेत,' हे त्यावरचे एक नेहमीचे छापील उत्तर. पण, मग 'नल से जल' वगैरे घोषणांचे काय झाले, असे त्यावर विचारले, तर? त्याचे समाधानकारक उत्तर ना व्यवस्थेकडे आहे, ना राज्यकर्त्यांकडे. मनमाडमध्ये १३ दिवसांनी एकदा, अकोला, सोलापुरात पाच-सहा दिवसांआड आणि पिंपरी-चिंचवडमध्ये गेली सहा वर्षे दिवसाआड पाणी, अशी नळयोजनांची स्थिती अजूनही आहे. ही केवळ प्रातिनिधिक उदाहरणे. महाराष्ट्रातील बऱ्याच शहरांत थोड्या फार फरकाने हीच स्थिती आहे. नळाला रोज पाणी येणाऱ्या पुण्यासारख्या 'पाणीदार' शहराला आजघडीला ४२ हजार टँकर पाणी पुरवतात, यापेक्षा पाणी नियोजनाची दयनीय स्थिती काय असू शकते? नागरिकांना शुद्ध पाणी देण्यासाठी बांधलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पांतून पाणी उचलून ते नागरिकांनाच दामदुप्पट दराने विकणारी टँकर लॉबी आणि त्यांचे राजकीय आश्रयदाते, हा तर आणखी एक वेगळा विषय.

राज्यात गेल्या वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. नेहमी ९९४.५ मिलिमीटर पडतो, गेल्या वर्षी १२५२.१ मि.मी. पडला, म्हणजे सरासरीपेक्षा अडीचशे मि.मी.हून अधिक. इतका पाऊस पडूनही लोकांना रोज पाणी देता येत नाही, कारण पावसाचा प्रत्येक थेंब वाचविण्याएवढी क्षमता आपण निर्माण करू शकलेलो नाही. धरणे बांधायला आता मर्यादा आहेत, आणि आहेत त्या धरणांत पाणी साठविण्यालाही. हवामानतज्ज्ञांनी दीड दशकापूर्वीपासून हे सांगायला सुरुवात केली होती की, इथून पुढे कमी वेळात अधिक पाऊस, असेच पावसाचे वैशिष्ट्य असणार आहे. ते तसेच आहे, हे दिसते आहे. त्यामुळे साहजिकच कमी वेळात पडणारे भरपूर पाणी साठवायचे कसे आणि कुठे, याचे स्वतंत्र नियोजन आवश्यक आहे. मात्र, त्याचे ठळक प्रतिबिंब नगर नियोजनात दिसत नाही. परिणामी, शहरांना पाणीपुरवठा करणारी धरणे, तलाव पूर्ण भरले, की त्यानंतर पडलेल्या पावसावर शब्दशः 'पाणी' सोडून द्यावे लागते.

भूजलावर मदार ठेवायची, तर त्यासाठी आधी जमिनीत पाणी मुरले पाहिजे. इथे शहरोशहरी ओढा, नाल्यांचे प्रवाह वळवलेले, नदीला 'सुधारा'च्या नावाखाली हवे तसे वाकवलेले आणि रस्त्यांचे नको इतके काँक्रीटीकरण केलेले. अशाने कसे मुरणार जमिनीत पाणी? जमिनीची चाळण होईल, इतक्या विंधनविहिरी शहराशहरांतून खणल्या गेल्या. पण उन्हाळ्यापर्यंत त्यातील पाणीही खोल तळाला जाते, ही वस्तुस्थिती. नळाचे पाणी न पुरण्याचे एक कारण पाण्याचा अपव्यय हेही. पिण्याचे पाणी सर्रास गाड्या, घरे, बागा धुवायला वापरले, तर कसे पुरणार पाणी? पुनर्वापर हा त्यावरचा उपाय. पण, सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प कार्यान्वित व्हायलाच इतका वेळ खातात, की त्यामुळे त्यावरही मर्यादा. या सगळ्यांतून ऐन उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष तेवढे वाढत जाते.

राज्यातील निम्मी लोकसंख्या ५०० शहरांत राहाते आहे आणि शहरांवरील लोकसंख्येचा हा ताण वाढतोच आहे. शहरीकरणाच्या प्रश्नांत पाणी हा येथून पुढचा अत्यंत कळीचा प्रश्न आहे. आजमितीला विस्तारणाऱ्या शहरांत बांधकामे करणारे व्यावसायिक ग्राहकांना नव्या इमारतींत महापालिकेच्या पाणीपुरवठ्याची खात्री देऊ शकत नाहीत, कारण महापालिकाच व्यावसायिकांना तशी हमी देऊ शकत नाहीत, ही वेळ आता आली आहे. असे असताना पाणीटंचाई झाली, की पाण्याच्या काटकसरीचे वैयक्तिक उपाय सांगितले जातात. त्यांचे स्वागतच. कारण अपव्यय टाळायलाच हवा. पण त्याने मूळ समस्या सुटत नाही आणि मूळ समस्या हीच आहे, की पाणी पुरत नाही. कारण ते पुरवायचे कसे, याचे नियोजन नाही.

विश्लेषण

# सिंधू पाणीवाटप कराराला स्थगितीमुळे भारताचा हेतू साध्य होईल?

निमा पाटील
nima.patil@expressindia.com

### सिंधू जलवाटप करार काय आहे?

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांनी १९ सप्टेंबर १९६० रोजी सिंधू जलकरारावर स्वाक्षऱ्या केल्या. सिंधूसह पाच नद्यांच्या पाण्याबाबतचा हा करार असून त्यापैकी पूर्वेकडील रावी, बियास आणि सतलज या तीन नद्यांचे पाणी भारताला; तर पश्चिमेकडील सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे पाणी पाकिस्तानला मिळते. जागतिक बँकेच्या मते, या करारामुळे सिंधू नदी स्रोताच्या निष्पक्ष आणि सहकार्यात्मक व्यवस्थापनाचा आराखडा तयार केला गेला आहे.

### यात जागतिक बँक आली कुठून?

१९४८मध्ये भारताने सिंधू नदीचा प्रवाह तात्पुरता थांबवला, त्यानंतर पाकिस्तानने हा मुद्दा संयुक्त राष्ट्रांमध्ये उपस्थित केला. त्यावर संयुक्त राष्ट्रांनी त्रयस्थ पक्षाच्या मध्यस्थीची शिफारस केली. त्यानुसार, जागतिक बँकेने ती भूमिका बजावली.

### कराराची वैशिष्ट्ये काय?

जगातील सर्वात जास्त टिकलेल्या जलवाटप करारांपैकी एक म्हणून सिंधू जलकराराकडे पाहिले जाते. आकडेवारीत सांगायचे तर या करारानुसार भारताच्या वाट्याला २० टक्के पाणी येते, म्हणजे वर्षाला साधारण ३३ दशलक्ष एकर फूट (एमएएफ) किंवा ४१ अब्ज घनमीटर (बीसीएम). तर पाकिस्तानला ८० टक्के म्हणजे १३५ एमएएफ किंवा ९९ बीसीएम पाणी मिळते. मात्र दोन्ही देशांना शेती आणि जलविद्युत प्रकल्पांसारख्या गैर-उपभोग उद्दिष्टांसाठी एकमेकांच्या वाट्याच्या पाण्याचा मर्यादित वापर करता येतो. मात्र, भारत हे पाणी रोखू शकत नाही किंवा त्याचा प्रवाह लक्षणीयरीत्या बदलू शकत नाही.

### सिंधू नदीचे पाकिस्तानसाठी महत्त्व

सिंचन, शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी पाकिस्तान मोठ्या प्रमाणात सिंधूवर अवलंबून आहे. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा वाटा २३ टक्के आहे आणि तेथील ६८ टक्के जनता उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहे. सिंधूच्या पाण्यावर पाकिस्तानची शेती मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याने हे पाणी अडवले गेले, तर पाकिस्तानच्या कृषी क्षेत्रावर आणि परिणामी अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतील. विशेषतः ग्रामीण नागरिकांना त्याचा सर्वाधिक फटका बसेल. आताच पाकिस्तानसमोर झपाट्याने खाली जाणारी भूजल पातळी, शेतजमिनीचे क्षारीकरण आणि पाणी साठवण्याची मर्यादित क्षमता अशा समस्या आहेत.

### भारताच्या निर्णयाचा अर्थ काय?

सिंधू नदीसाठी भारताचे माजी आयुक्त पी. के. सक्सेना यांनी 'इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले की, आता भारत पाणी प्रवाहाविषयीची आकडेवारी पाकिस्तानला देणे तातडीने थांबवू शकतो. सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्याच्या वापरावर कोणतेही निर्बंध राहणार नाहीत. तसेच सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांवरही भारत येत्या काही काळात धरणासारखे जलसाठे उभारू शकतो. सध्याच जम्मू आणि काश्मीरमध्ये झेलम नदीची उपनदी असलेल्या किशनगंगावरील किशनगंगा एचपी आणि चिनाबवरील रॅटल एचपी या दोन जलविद्युत प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पांना पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या भेटी भारत थांबवू शकतो, असेही सक्सेना यांनी सांगितले.

### एकतर्फी करारबंदी अशक्य आहे?

'कराराला अंतिम मुदत नाही आणि त्यामध्ये कोणतेही बदल करायचे असतील तर त्यासाठी दोन्ही देशांची संमती आवश्यक आहे' अशा तरतुदींमुळे हा करार एकतर्फी रद्द करता येत नसला तरी, दोन्ही देशांना त्याविषयी त्रयस्थ पक्षाकडे आणि परिणामतः लवादाकडे तक्रार उपस्थित करण्याची मुभा आहे.

### भारताचा निर्णय केवळ दबावतंत्र?

सिंधू जलकरार स्थगित करण्याचा भारताचा निर्णय म्हणजे तातडीने पाकिस्तानच्या वाट्याचे पाणी अडवणे असा होत नाही. भारताला सिंधूचे सर्व पाणी अडवणे किंवा त्याचा प्रवाह वळवणे शक्य नाही. त्यासाठी आवश्यक साठवणक्षमता आणि पायाभूत सुविधा भारताकडे नाहीत. अशा सुविधा उभारायच्या असल्यास त्यासाठी काही वर्षे लागतील. सद्यःस्थितीत भारत पाकिस्तानचे पाणी जास्तीत जास्त ५ ते १० टक्के कमी करू शकतो. त्यामुळे सध्या तरी सिंधू जलकराराला स्थगिती देऊन पाकिस्तानवर दबाव आणण्याचा हेतू साध्य होईल... परंतु सिंधूच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या पाकिस्तानी शेतीवर आताच थेट परिणाम होणार नाही, असे मानण्यास जागा आहे.

> **सद्यःस्थितीत भारत पाकिस्तानचे पाणी जास्तीत जास्त ५ ते १० टक्के कमी करू शकतो. त्यामुळे सिंधू जलकराराला स्थगिती देणे हा तूर्तास, दबावतंत्राचा केवळ एक भाग ठरतो...**

## संक्षिप्त

### ‘केंद्राला पक्षकार करणे योग्य!’

**नवी दिल्ली :** मथुरा येथील कृष्ण जन्मभूमी खटल्यामध्ये केंद्र सरकार, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) यांना पक्षकार करण्याची परवानगी देण्याचा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल सकृतदर्शनी योग्य होता असे दिसते असे मत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी व्यक्त केला. हिंदू पक्षकारांनी केलेल्या अपिलावरून उच्च न्यायालयाने ५ मार्च रोजी दोन खटल्यांमध्ये दुरुस्ती करायला परवानगी दिली होती. त्याविरोधात मशीद समितीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.

### पाकिस्तानात १७ दहशतवादी ठार

**पेशावर :** पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी खैबर पख्तुनख्वा प्रांतामध्ये सुरू केलेल्या मोहिमेमध्ये सोमवारी ‘तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान’ या प्रतिबंधित संघटनेचे १७ दहशतवादी मारले गेले. उत्तर वझिरिस्तान जिल्ह्यामध्ये अफगाणिस्तानच्या सीमेलगत ही कारवाई करण्यात आली. यामुळे गेल्या तीन दिवसांमध्ये या भागात मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची संख्या एकूण ७१ झाली आहे. दरम्यान, खैबर पख्तुनख्वा प्रांतामध्येच आणखी एका दहशतवादी हल्ल्यात सात जण ठार आणि नऊ जखमी झाले.

### इराण स्फोटातील मृतांची संख्या ६५

**दुबई :** इराणच्या राजाई बंदरामध्ये शनिवारी झालेल्या स्फोटातील मृतांची संख्या ६५ झाली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. तर या स्फोटामुळे लागलेली आग विझवण्यात यश आल्याचे इराणचे गृहमंत्री इस्कंदर मोमेनी यांनी सांगितले. हा स्फोट बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या घन इंधनासाठी आवश्यक असलेल्या रासायनिक घटकामुळे झाल्याची माहिती आहे. मात्र, इराणच्या लष्कराने हे वृत्त फेटाळले आहे.

### रशियाकडून ८ ते १० मे युद्धविरामाची घोषणा

**कीव्ह:** रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी ८ ते १० मे असे तीन दिवस युक्रेनमध्ये युद्धविरामाची घोषणा सोमवारी केली. नाझी जर्मनीवर मिळविलेल्या विजयाच्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त हा निर्णय घेण्यात आल्याचे क्रेमलिनने जाहीर केले. ‘ईस्टर संडे’ला देखील पुतिन यांनी एक दिवसाचा युद्धविराम जाहीर केला होता. मात्र त्या दिवशीही रशियाने अनेक शहरांमध्ये क्षेपणास्त्र हल्ले केल्याचा आरोप युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी केला होता.

### नव्या पोप निवडीसाठी ७ मे पासून बैठक

**व्हॅटिकन सिटी :** पोप फ्रान्सिस यांच्यानंतर पोप निवडीसाठी येत्या ७ मेपासून कॅथॉलिक धर्मगुरूंच्या बैठकीला सुरुवात होणार आहे. धर्मगुरूंमध्ये मतैक्य होण्यासाठी गुप्त मतदानाची प्रक्रिया दोन दिवस उशिरा होणार आहे. पोप फ्रान्सिस यांच्यावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर प्रथमच अनौपचारिकरीत्या धर्मगुरू एकत्र आले. त्यात ७ मेपासून पोपनिवडीसाठी बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील पोपबाबत मतैक्य होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# जलद, निष्पक्ष चौकशीचे आवाहन

## पहलगाम हल्ल्यानंतर प्रथमच चीनची अधिकृत भूमिका जाहीर




पीटीआय, बीजिंग

**भारत आणि** पाकिस्तानदरम्यानचा वाढलेला तणाव कमी होण्यासाठी, पहलगाम हल्ल्याच्या जलद आणि निष्पक्ष चौकशीसह सर्व उपाययोजनांचे आपण स्वागत करतो असे चीनने सोमवारी सांगितले. पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर चीनने प्रथमच अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. यापूर्वी चीनने २३ एप्रिलला हल्ल्याचा निषेध केला होता. मात्र, दोन्ही देशांदरम्यान वाढत्या तणावावर त्यांनी प्रथमच भाष्य केले आहे.

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी सोमवारी माध्यमांशी बोलताना पहलगाम हल्ला आणि त्यानंतरच्या घडामोडींसंबंधी आपली भूमिका स्पष्ट केली. मात्र हल्ल्याच्या तपासामध्ये पाकिस्तानने कथित मागणी केल्याप्रमाणे चीन सहभागी होईल का या प्रश्नाचे उत्तर देणे त्यांनी टाळले. तसेच तपासाची निष्पक्षता आणि विश्वासार्हता याबद्दल कोणतीही टिप्पणी करण्याचे जियाकुन यांनी टाळले. पाकिस्तानचे सार्वभौमत्व आणि सुरक्षेच्या संरक्षणासाठी पाठिंबा असल्याचेही त्यांनी सांगितले.



दहशतवादविरोधी कारवाईचा भाग म्हणून सुरक्षा अधिकाऱ्यांनी सोमवारी दक्षिण काश्मीरमधील त्राल या शहराजवळ आसिफ शेख या संशयिताचे घर पाडले.

> भारत आणि पाकिस्तानचा शेजारी देश म्हणून चीनची आशा आहे की, दोन्ही देश संयम बाळगतील, चर्चा करण्यासाठी दोघेही पुढे येतील, चर्चा आणि सल्लामसलतीच्या माध्यमातून संबंधित मतभेद योग्यपणे हाताळतील आणि दोघेही प्रादेशिक शांतता व स्थैर्य कायम राखतील.
> – **गुओ जियाकुन,** प्रवक्ते, चीनचे परराष्ट्र मंत्रालय

### पाकिस्तानकडून पूंछ, कुपवाडामध्ये गोळीबार

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ आणि कुपवाडा जिल्ह्यांमध्ये पाकिस्तानी सैन्याने रविवारी सलग चौथ्या रात्री पूंछ, कुपवाडा जिल्ह्यांमध्ये नियंत्रणरेषेवर गोळीबार करत शस्त्रविरामाचे उल्लंघन केले अशी माहिती सैन्याच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. पाकिस्तानकडून हलक्या शस्त्रांनी गोळीबार करण्यात आला असे संरक्षण विभागाने सांगितले.

### पाकिस्तानच्या १६ यूट्यूब वाहिन्यांवर बंदी

नवी दिल्ली : भारताविरोधात सातत्याने खोटा, प्रक्षोभक आणि सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील कार्यक्रम सादर केल्याचा आरोप करत केंद्र सरकारने १६ पाकिस्तानी यूट्यूब वाहिन्यांवर बंदी घातली. तसेच पहलगाम हल्ल्याचे दहशतवाद्यांचा उल्लेख अतिरेकी असा करणाऱ्या बीबीसीच्या वार्ताकनालाही तीव्र आक्षेप घेतला असल्याचे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. केंद्रीय गृह विभागाच्या सूचनेनंतर ही बंदी घालण्यात आली आहे.

# नेत्यांच्या टिप्पण्यांमुळे काँग्रेस अडचणीत

## भाजपच्या टीकेनंतर हल्ल्यासंबंधी विधाने करण्यास मनाई

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यासंदर्भात काँग्रेसच्या काही नेत्यांनी केलेल्या आक्षेपार्ह व वादग्रस्त विधानांमुळे सोमवारी काँग्रेस पक्ष अडचणीत सापडला. काँग्रेसचे नेते मनात येईल ते बोलत आहेत, या नेत्यांवर पक्षाच्या नेतृत्वाचे नियंत्रण नाही का, असा सवाल भाजपने केल्यामुळे काँग्रेसची कोंडी झाली. त्यामुळे या नेत्यांच्या विधानांपासून काँग्रेसने स्वतःला वेगळे केले. शिवाय, या हल्ल्यासंदर्भात कोणतीही विधाने करण्यास नेत्यांना मनाई करण्यात आल्याचे समजते.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी, युद्ध हा पर्याय असू शकत नाही, असे विधान केल्यानंतर, पाकिस्तानच्या टीव्ही चॅनलवरून या विधानाचा गैरफायदा घेतला गेला. त्यावर भाजपचे खासदार रविशंकर प्रसाद यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत टीका केली. त्यानंतर काँग्रेसचे माध्यम विभागाचे प्रमुख जयराम रमेश यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. वादग्रस्त विधाने करणाऱ्या नेत्यांच्या विचारांशी काँग्रेसचा काहीही संबंध नाही, ती त्यांची वैयक्तिक मते आहेत, ती काँग्रेसची भूमिका नाही असे रमेश यांनी सांगितले.

> पाकिस्तानला हवी असलेली भूमिका काँग्रेसचे नेते कशासाठी घेत आहेत? पाकिस्तान अशा विधानांचा स्वतःसाठी उपयोग करून घेत आहे.
> – **रविशंकर प्रसाद,** खासदार, भाजप

> काँग्रेसच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये हल्ल्यासंबंधीच्या ठरावात काँग्रेसने केंद्र सरकारला पाठिंबा व्यक्त केला होता. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व राहुल गांधींनी काँग्रेसची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे.
> – **जयराम रमेश,** माध्यम विभागप्रमुख, काँग्रेस

### वडेट्टीवारांची सारवासारव



नागपूर : काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी पर्यटकांना सुरक्षा का नव्हती, असा प्रश्न सरकारला करतानाच हल्ला झाला त्यावेळी दहशतवाद्यांना धर्म विचारायला वेळ होता काय, असे वादग्रस्त विधान केले. या विधानानंतर गदारोळ निर्माण झाल्याने वडेट्टीवार यांनी सारवासारव करीत दहशतवाद्यांवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. सरकार जी कारवाई करेल त्याला काँग्रेसचा पाठिंबा आहे, असे वक्तव्य केले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा मुख्य हेतू दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करून भारतातील एकात्मता भंग करणे आणि देशात अस्थिरता निर्माण करणे हा आहे, असे ते म्हणाले. पहलगाम येथे अतिरेक्यांनी पर्यटकांना धर्म विचारून गोळ्या घातल्या नाहीत, हे वडेट्टीवार यांचे वक्तव्य मूर्खपणाचे आणि मृतांच्या नातेवाईकांच्या जखमांवर मीठ चोळणारे असल्याची टीका फडणवीस यांनी केली.

**नेत्यांची वक्तव्ये**

जम्मू-काश्मीरमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सैफुद्दीन सोझ यांनी, सिंधू जलकरार रद्द करण्याला विरोध केला. पाकिस्तानने पहलगाम हल्ल्यात सहभाग नसल्याचे सांगितले आहे, त्यावर विश्वास ठेवला पाहिजे असेही त्यांचे मत होते. त्यावरून वादंग झाल्यावर केंद्राच्या भूमिकेला पाठिंबा असल्याचे सांगत त्यांनी घूमजाव केले. महाराष्ट्रातील विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीदेखील वादग्रस्त विधान केले. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले. तर शशी थरूर भाजपच्या सुरात बोलत असल्याची टीका उदित राज यांनी केली.

# भारताकडून लष्करी घुसखोरी अटळ!

## पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांचा दावा

वृत्तसंस्था, इस्लामाबाद

**पहलगाम हल्ल्यानंतर** भारतीय लष्कराची पाकिस्तानात घुसखोरी अटळ आहे असा दावा त्यांचे संरक्षणमंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी ‘रॉयटर्स’ या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत केला. यासंबंधी भारताकडून सातत्याने वक्तव्ये केली जात आहेत आणि पाकिस्तानच्या लष्कराने सरकारला संभाव्य भारतीय हल्ल्याची माहिती दिली आहे असे ते पुढे म्हणाले. मात्र, आपल्या विधानामागील कोणतेही कारण त्यांनी दिले नाही.

भारतीय लष्कर पाकिस्तानमध्ये घुसण्याची तयारी करत असताना आम्ही जादा कुमक पाठवत आहोत. अशा परिस्थितीत काही सामरिक निर्णय घ्यावे लागतात, त्यामुळे हे निर्णय घेण्यात आले आहेत असे ख्वाजा आसिफ म्हणाले. त्यांच्या इस्लामाबादमधील कार्यालयातून ते बोलत होते. आसिफ यांच्या वक्तव्यावर भारताच्या संरक्षण मंत्रालयाने किंवा परराष्ट्र मंत्रालयाने तातडीने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

आमच्या अस्तित्त्वाला थेट धोका असेल तरच आम्ही अण्वस्त्राचा वापर करू असे म्हणत हा पर्याय खुला असल्याची गर्भित धमकीही ख्वाजा आसिफ यांनी दिली. भारताबरोबरच्या तणावाबद्दल आम्ही आखाती देश, चीन या मित्र देशांसह ब्रिटन, अमेरिका आणि अन्य राष्ट्रांशी चर्चा केली आहे असे त्यांनी सांगितले. काही आखाती देशांनी दोन्ही बाजूंशी चर्चा केली आहे अशी माहिती त्यांनी दिली. सिंधू जलकरार स्थगित करण्याचा भारताचा निर्णय ही युद्धाची कृती असल्याच्या पाकिस्तानच्या भूमिकेचा ख्वाजा आसिफ यांनी पुनरुच्चार केला.

### राजनाथ सिंह यांची पंतप्रधानांशी चर्चा

नवी दिल्ली : संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांना जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थितीची माहिती दिली असे या बैठकीची माहिती असलेल्या लोकांनी सांगितले. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही. ही चर्चा सुमारे ४० मिनिटे चालली.

# राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेच्या घोटाळ्यावर पडदा

## ईडीच्या ‘क्लोजर रिपोर्ट’चा दिल्ली न्यायालयाकडून स्वीकार

पीटीआय, नवी दिल्ली

**दिल्ली न्यायालयाने** सोमवारी २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या (कॉमनवेल्थ गेम्स) आयोजन समितीचे माजी प्रमुख सुरेश कलमाडी, तत्कालीन सचिव ललित भानोत आणि इतरांविरुद्ध आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाचा (ईडी) ‘क्लोजर रिपोर्ट’ स्वीकारत १३ वर्षे जुन्या प्रकरणावर पडदा टाकला. अहवाल स्वीकारल्याने १५ वर्षांपूर्वीच्या कथित घोटाळ्यातील आर्थिक गैरव्यवहाराची किनारही यामुळे संपुष्टात आली आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे देशात मोठा राजकीय गोंधळ निर्माण झाला होता. याप्रकरणात अनेक गुन्हेगारी आणि आर्थिक गैरव्यवहाराचे खटले दाखल झाले, ज्यामध्ये सध्याच्या खटल्याचाही समावेश होता. कलमाडी आणि इतरांवर पुरस्कार आणि खेळांसाठी दोन महत्त्वाचे कंत्राट देण्यात गैरव्यवहार केल्याचा आरोप होता. ‘सीबीआय’ने भ्रष्टाचाराचा खटला आधीच बंद केला होता, ज्याच्या आधारे ‘ईडी’ने नंतर आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी सुरू केली आणि अहवाल स्वीकारला. यामध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची आयोजन समिती, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीओओ) विजय कुमार गौतम, तत्कालीन कोषाध्यक्ष ए. के. मॅटो, इव्हेंट नॉलेज सर्व्हिस (ईकेएस), स्वित्झर्लंड आणि ‘सीईओ’ क्रेग गॉर्डन मेलाचे यांची नावेही होती, असे विशेष न्यायाधीश संजीव अग्रवाल यांनी नमूद केले.

ईडीने गुप्त तपास करूनही त्यांच्याकडून ‘पीएमएलए’च्या कलम-३ अंतर्गत कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही किंवा तो करण्यात आलेला नाही. सध्याच्या अंमलबजावणी प्रकरण माहिती अहवालानुसार पुढे जाण्यात कोणतेही कारण नाही, परिणामी ईडीने दाखल केलेला ‘क्लोजर रिपोर्ट’ स्वीकारला जात आहे, असे न्यायाधीशांनी नमूद केले.

### ‘सीबीआय’चा आरोप काय?

‘सीबीआय’च्या मते, ‘गेम्स वर्कफोर्स सर्व्हिस’ आणि गेम्स प्लॅनिंग, प्रोजेक्ट अँड रिस्क मॅनेजमेंट सर्व्हिसेस आदींमध्ये स्पर्धेशी संबंधित कामांचे करार होते. आरोपींनी जाणूनबुजून आणि चुकीच्या पद्धतीने दोन्ही कंत्राटे देऊन ‘ईकेएस’ आणि ‘अर्न्स्ट अँड यंग’ यांच्या संघाला अनावश्यक आर्थिक फायदा मिळवून दिला, त्यामुळे आयोजन समितीचे ३० कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा आरोप ‘सीबीआय’ने केला होता.

### मोदी, केजरीवालांनी देशाची माफी मागावी - काँग्रेस

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेशी संबंधित एका प्रकरणात दिल्ली न्यायालयाने ईडी ‘क्लोजर रिपोर्ट’ स्वीकारल्याने या घोटाळ्याच्या प्रकरणावर पडदा पडला आहे. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ‘आप’चे नेते अरविंद केजरीवाल यांनी देशाची दिशाभूल केल्याबद्दल माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

# ‘जेएनयू’त पुन्हा डाव्यांची सरशी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) विद्यार्थी संघटनांच्या चुरशीच्या निवडणुकीमध्ये ‘ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन’ (आयइसा) आणि ‘डेमोक्रॅटिक स्टुडंट्स फ्रंट’ (डीएसएफ) यांच्या डाव्या आघाडीने चार केंद्रीय पदांपैकी तीन तर, संघाशी निगडीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने एका पदावर बाजी मारली. दशकभरानंतर ‘अभाविप’ला केंद्रीय पद जिंकता आले. गेल्या वर्षी डाव्या विद्यार्थी संघटनांनी एकत्रित लढवलेल्या निवडणुकीत सर्वच्या सर्व चारही पदे जिंकली होती.

‘आयइसा’चे नितीशकुमार यांची अध्यक्षपदी तर, ‘डीएसएफ’च्या मनीषा यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. ‘डीएसएफ’चे मुंतेहा फतिमा यांनी सरचिटणीसपदी विजय मिळवला तर, ‘अभाविप’चे वैभव मीणा यांना संयुक्त सचिवपदी निवडण्यात आले. २०१६नंतर पहिल्यांदाच ‘अभाविप’चा सदस्य ‘जेएनयू’च्या विद्यार्थी संघटनेच्या केंद्रीय पदावर निवडून आला आहे. असे असले तरी डाव्या विद्यार्थी संघटनांनी यावर्षीदेखील दबदबा कायम ठेवला.

यावर्षी सर्व कम्युनिस्ट संघटना एकत्र आल्या नव्हत्या. ‘आयइसा’ व ‘डीएसएफ’ या संघटनांनी युती केली होती तर ‘एसएफआय’, ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ), बिरसा आंबेडकर फुले स्टुडंट्स असोसिएशन (बापसा) आणि ‘प्रोग्रेसिव्ह स्टुडंट्स असोसिएशन’ (पीएसए) या संघटनांनी आघाडी केली होती.

दरम्यान, ‘अभाविप’ने ४२पैकी २३ कौन्सिलर पदे जिंकली. ‘स्कूल ऑफ सोशल सायन्सेस’ आणि ‘स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीज’ या डाव्यांच्या बालेकिल्ल्यांना धक्का देत पाच जागांपैकी प्रत्येकी दोन जागा जिंकल्या, असे ‘अभाविप’ने निवडणूक निकालानंतर म्हटले आहे.

### तहव्वूर राणाच्या ‘एनआयए’ कोठडीत वाढ

**नवी दिल्ली :** मुंबईवरील २६/११च्या दहशतवादी हल्ल्याचा आरोपी तहव्वूर हुसेन राणा याच्या ‘एनआयए’ कोठडीत १२ दिवसांची वाढ करण्यात आली आहे. राणाची १८ दिवसांची कोठडी संपल्यानंतर त्याला सोमवारी कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत विशेष ‘एनआयए’ न्यायालयासमोर उपस्थित करण्यात आले. यावेळी त्याचा चेहरा झाकलेला होता. ‘एनआयए’च्या विनंतीवरून विशेष न्यायाधीश चंदरजित सिंह यांनी त्याची कोठडी १२ दिवसांनी वाढवली.

राणाविरोधात मोठ्या प्रमाणात पुरावे असून त्यासंदर्भात अधिक चौकशी करण्यासाठी त्याची कोठडी हवी असल्याचे ‘एनआयए’ने न्यायालयाला सांगितले. तसेच गेल्या १८ दिवसात या प्रकरणाचा कशा प्रकारे तपास करण्यात आला त्याची माहितीही ‘एनआयए’ने दिली. बंद कक्षात सुरू असलेल्या या खटल्याच्या सुनावणीत ‘एनआयए’ची बाजू ज्येष्ठ वकील दयान कृष्णन आणि विशेष सरकारी वकील नरेंदर मान मांडत आहेत. राणा तपासात सहकार्य करत नसल्याचा आरोप त्यांनी केला.




# युरोपमध्ये बत्ती गुल

वृत्तसंस्था, बार्सिलोना

**युरोपातील स्पेन** आणि पोर्तुगालसह अन्य काही देशांमध्ये सोमवारी दुपारपासून मोठ्या परिसरात वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे भुयारी मेट्रो, रेल्वेसह दूरध्वनी, वाहतूक सिग्नल आणि एटीएम या महत्त्वाच्या यंत्रणा ठप्प झाल्या. सुमारे आठ ते १० तास वीज खंडित राहिल्याने कोट्यवधी नागरिकांचे अतोनात हाल झाले.

फ्रान्स आणि बेल्जियमच्या काही भागालाही याचा फटका बसला. प्रथमिक तपासात पॉवर ग्रीडवर सायबर हल्ल्याचे पुरावे नसल्याची माहिती पोर्तुगालचे पंतप्रधान ‘लुइस मॉंटेनेग्रो’ यांनी दिली.

युरोपमध्ये क्वचितच वीजपुरवठा खंडित होतो. सोमवारी दोन देशांतील बहुतांश भागांची वीज गेल्याने इबेरियन द्वीपकल्पाला त्याचा फटका बसल्याचे स्पॅनिश विद्युत पुरवठादार कंपनी ‘रेड इलेक्ट्रिका’तर्फे सांगण्यात आले. या घटनेची चौकशी केले जात आहे. स्पेनची सार्वजनिक वृत्तवाहिनी ‘आरटीव्हीई’ने म्हटले आहे की, दुपारच्या सुमारास देशाच्या अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. यामुळे त्यांचे कार्यालय, माद्रिदमधील लोकप्रतिनिधीगृह आणि देशभरातील भुयारी स्थानके अंधारात होती.

**हजारो प्रवासी अडकले**

लिस्बनमधील भुयारी मेट्रो तसेच रेल्वे स्थानके रिकामी करण्यात आल्याचे वृत्त आहे. न्यायालयांचे कामकाजही थांबविण्यात आले. एटीएम आणि ‘इलेक्ट्रॉनिक पेमेंट सिस्टम’वर परिणाम झाला. लिस्बनमधील वाहतूक सिग्नल यंत्रणाही ठप्प पडली होती. रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली.

### पोर्तुगालमध्ये विद्युतनिर्मिती पूर्ववत

लिस्बन : पोर्तुगालमधील राष्ट्रीय ग्रीड पूर्ववत करण्यासाठी जलविद्युत आणि औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये वीजनिर्मिती पुन्हा सुरू करण्यात आली आहे अशी माहिती तेथील विद्युत वितरक कंपनी आरईएन यांनी दिली. स्पेनच्या तुलनेत आपल्या देशातील ही प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची आहे असे आरईएनने म्हटले आहे.रुग्णालये, सुरक्षा दले, विमानतळे, रेल्वे आणि रस्ते अशा महत्त्वाच्या ठिकाणी वीजपुरवठा करण्यात प्राधान्य दिले जात आहे.

### संशयितांकडेच चौकशीची सूत्रे?

(पान १ वरून)

‘लोकसत्ता’ने जानेवारीमध्ये वाचा फोडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची गंभीर दखल घेत परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी यांना चौकशीचे आदेश दिले होते. चौकशीअंती निविदा प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा निष्कर्ष काढत ही निविदा प्रक्रिया रद्द करण्याची शिफारस चौकशी समितीने केली. कंत्राट देताना सरकारला अंधारात ठेवून महामंडळाच्या स्तरावरच निर्णय घेण्यात आला होता. मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप प्रलंबित असताना सर्व अधिकार मुख्यमंत्र्यांकडे होते. त्यांनाही याची कल्पना न देता ठेकेदाराशी परस्पर तडजोड करत त्याला वाढीव लाभ आणि महामंडळाला नुकसान करणारा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला होता. निर्णयाचे अधिकार असतानाही आपल्या अपरोक्ष हा निर्णय झाल्याची माहिती फडणवीस यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिली होती. महामंडळातील काहींच्या संगनमताने झालेल्या या निर्णयामुळे एसटीचे १७०० कोटी रुपयांचे नुकसान होणार होते. त्यामुळे निर्णय रद्द केल्याचे सांगत या घोटाळ्याची एक महिन्यात चौकशी पूर्ण करून दोषींवर कारवाईची घोषणाही त्यांनी १२ मार्च रोजी विधान परिषदेत केली होती.

ही चौकशी परिवहन विभागाकडून होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडेच चौकशी सोपविण्यात आल्याचे समजते. त्यामुळे गेला महिनाभर चौकशीचा केवळ फार्स सुरू असल्याची चर्चा महामंडळात सुरू आहे.



राष्ट्रपती भवनामध्ये सोमवारी झालेल्या सोहळ्यामध्ये पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. डावीकडून क्रिकेटपटू आर अश्विन, चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर आणि कर्करोगतज्ज्ञ विजयालक्ष्मी देशमाने.

# मी कमी पडलो!

(पान १ वरून)

मुख्यमंत्री अब्दुला यांनी संपूर्ण सभागृहाचे मन जिंकले. त्यांच्या वाक्यांना सत्ताधारी तसेच विरोधी सदस्ये बाके वाजवून अनुमोदन देत होते. त्यावेळी हा बाके वाजविण्याचा नव्हे, तर निषेधाचा आणि एकोपा दाखविण्याचा क्षण असल्याचे अब्दुल्ला यांनी ठणकाविले. ‘‘दहशतवादाच्या धोक्याविरोधात जनतेचा संघर्ष मजबूत करण्यासाठी आपले सरकार काम करेल. हल्ल्यानंतर जम्मू-काश्मीरची जनता उत्स्फूर्तपणे रस्त्यावर उतरली ही बाब आशेचा किरण आहे. त्याच वेळी हल्ल्यानंतर केल्या जाणाऱ्या कारवाईदरम्यान जनता दूर लोटली जाईल अशी पावले उचलणे टाळावे,’’ असे आवाहन त्यांनी केंद्र सरकारला केले. आपण पर्यटकांना काश्मीरमध्ये येण्याचे आवाहन केले होते, पण त्यांचे रक्षण करू शकलो नाही, मुख्यमंत्री म्हणून हे आपले अपयश असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. जम्मू-काश्मीरची सुरक्षा ही आपल्या सरकारची जबाबदारी नसली तरी आपण या हल्ल्याचा वापर संपूर्ण राज्याचा दर्जा मागण्यासाठी करणार नाही असेही अब्दुल्ला यांनी स्पष्ट केले.

**हुर्रियतकडूनही प्रार्थना!**

१९९०च्या दशकापासून हुर्रियत कॉन्फरन्स ही संघटना फुटीरतावाद्यांचे नेतृत्व करत आली आहे. मात्र, या संघटनेचे अध्यक्ष मिरवैज उमर फारुख यांनी श्रीनगरच्या जामिया मशिदीत हल्ल्याविरोधातील प्रार्थनेचे नेतृत्व केले. इतर मशिदींमध्येही प्रथमच शुक्रवारच्या प्रार्थनेआधी दोन मिनिटांचे मौन पाळले गेल्याकडे अब्दुल्ला यांनी लक्ष वेधले.

# अंड्याचे अतिसेवन हानीकारक

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** प्रोटिनचा महत्त्वाचा स्रोत म्हणून अंड्यांचे मोठ्या प्रमाणात सेवन केले जाते. अंड्यांमध्ये भरपूर व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि फॅट्स असतात. अंड्यामध्ये व्हिटॅमिन्स बी १२, मेंदूची शक्ती वाढवणारे कोलीन आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असे ल्युटीन असतात. अंडी खाल्ल्यानंतर भूक लागत नाही आणि दीर्घकाळासाठी पोट भरल्यासारखे वाटते. हे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप चांगले आहे, तसेच वजन कमी करण्यासाठीसुद्धा फायदेशीर आहे.

कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल येथील मुख्य आहारतज्ज्ञ प्रतीक्षा कदम यांनी सांगितले की, अंडी आरोग्यासाठी उत्तम असली तरी, ती अतिप्रमाणात खाणे हानीकरक आहेत. एका अंड्यामध्ये १८६ मिलीग्राम कोलेस्ट्रॉल असते. जर दिवसाला सुमारे १२ अंडी खाल्ली तर कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढू शकते. त्याचा हृदयाच्या आरोग्यावर हानीकारक परिणाम होऊ शकतो.

ज्यांना हृदयाशी संबंधित आजार असेल, त्यांच्यासाठी डझनभर अंडी दिवसाला खाणे धोकादायक ठरू शकते. त्याशी जर अंडी तेल किंवा तुपामध्ये तळून खाल्ली, तर हानीकारक कोलेस्ट्रॉल वाढू शकते. तसेच, अति प्रमाणात प्रोटिनचे सेवन केल्याने किडनीचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. अंड्याच्या अतिसेवनाने पोटफुगी, तसेच पचनक्रियेशी संबंधित समस्या जाणवू शकतात. त्यामुळे अन्य आहाराबरोबर योग्य प्रमाणात अंड्यांचे सेवन करावे, असे आहारतज्ज्ञांनी सांगितले.

आपल्या प्रगतीसाठी
कॉसमॉस
प्रॉपर्टी मॉर्टगेज लोन
व्याजदर फक्त 9.75%*
₹ ५ कोटीपर्यंत कर्ज उपलब्ध*
कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
Toll Free No.: 1800 233 0234




# ‘बुलेट ट्रेन’ २०२८पासून रुळावर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू असून २०२८ मध्ये ते पूर्ण होईल आणि वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचे स्थानक उभारले जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली. राज्यात रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग, बंदरे आणि विमानतळ आदी पायाभूत विकास प्रकल्पांची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून या ‘विकासाच्या परिसंस्थे’मुळे (इकोसिस्टीम) महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

‘इंडिया-मिडल ईस्ट-युरोप इकोनॉमिक कॉरिडोर समिट २०२५’ मध्ये फडणवीस यांनी राज्यात सुरू असलेल्या विकास प्रकल्पांबाबत विस्तृत विवेचन केले. मुंबईत सागरी किनारा रस्ता, अटल सेतू आणि विविध मेट्रो मार्गांचे प्रकल्प सुरू असून, या सर्व विकासकामांमुळे मुंबईत सुमारे ५० अब्ज डॉलरपर्यंत गुंतवणूक होण्याची शक्यता आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर हे सध्या अस्तित्वात असलेल्या जेएनपीटीपेक्षा तीनपट मोठे असणार असून, ते प्रवेश नियंत्रित महामार्गाद्वारे नाशिक व समृद्धी महामार्गाशी जोडले जाणार आहे. वाढवण बंदर परिसरात नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ व चौथ्या मुंबईचा विकास प्रस्तावित आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

**ऊर्जेच्या क्षेत्रात मोठी कामगिरी**

ऊर्जेच्या क्षेत्रातही मोठी कामगिरी होत असून कृषी क्षेत्रासाठी १६ हजार मेगावॅट वीज पूर्णपणे सौर ऊर्जेवर निर्माण करण्याचे लक्ष्य आहे. सध्या सौरऊर्जेतील राज्याची क्षमता २१ टक्के असून २०३० पर्यंत ती ५२ टक्के करण्याचा संकल्प आहे. सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत ३००० ट्रान्सफॉर्मर्स सौरऊर्जेवर कार्यान्वित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक वाहतूक आणि वाहने यामध्येही मोठे बदल घडवीत असून विद्युत वाहनांच्या वापरात राज्याने देशात अग्रेसर स्थान मिळविले असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### ‘महाविकास आघाडी सरकारमुळे बुलेट ट्रेन प्रकल्पात अडथळा’

बुलेट ट्रेन प्रकल्पात महाविकास आघाडी सरकारने अडथळा आणून ते बंद पाडले. गुजरातमध्ये काम सुरू असताना महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकारच्या काळात ते ठप्प होते. सुमारे ७०-८० हजार कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाचे काम अडीच वर्षे बंद राहिल्याने त्यावरील व्याजाचा बोजा कोणावर व किती पडणार आहे ? असा सवाल त्यांनी केला. आमचे सरकार आल्यापासून गेली अडीच वर्षे ते वेगाने सुरू असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



**विविध प्रकल्पांबाबत मुख्यमंत्री म्हणाले...**

- नदीजोड प्रकल्पाद्वारे कोल्हापूर, सांगली व पश्चिम घाटातील पाणी उजनी धरण व मराठवाड्याकडे वळविले जाणार असून, यामुळे भविष्यात मराठवाडा दुष्काळमुक्त होईल.
- समृद्धी महामार्गानंतर नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाचे काम हाती घेतले जाणार आहे.
- सध्या जेएनपीटीपासून नागपूरपर्यंत मालवाहतूक फक्त आठ तासांत करता येते आणि वाढवण बंदरामुळे ही गती अधिक वाढेल.
- नागपूर आणि पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळांवर कार्गो हब विकसित.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अटल सेतूमुळे तिसऱ्या मुंबईचा विकास होत आहे. येथे एज्यु-सिटी, हेल्थ-सिटी व इनोव्हेशन-सिटी उभारली जात असून, विविध नामांकित विद्यापीठे येथे आपली केंद्रे स्थापन करणार आहेत.

# माहिती अधिकार कायद्याच्या गैरवापरावर मुख्यमंत्र्यांची नाराजी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात गतिमान आणि पारदर्शी प्रशासन आणि लोकांच्या हितासाठी आणलेल्या माहिती अधिकारासारख्या चांगल्या कायद्याच्या गैरवापरामुळे आता हा कायदा वैताग ठरू लागला आहे. भाईगिरी करणारे लोक माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या पाट्या लावून मिरवत असल्याची नाराजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे व्यक्त केली.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. राज्यात माहिती अधिकार कायदा लोकांमध्ये इतका रुजला आहे की आता त्याचा गैरवापर होत आहे. मात्र हा कायदा लोकांच्या आणि प्रशासनाच्याही हिताचा आहे. त्यामुळे कोणी माहिती मागितल्यास त्याला देतानाच ती माहिती संकेतस्थळावर टाका. सरकारचा कारभार पारदर्शी झाल्यास, सर्व माहिती उघड केल्यास कोणाला माहितीच मागावी लागणार नाही, असे प्रशासनाने वागावे अशी सूचनाही फडणवीस यांनी केली.



### सरकारच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. १५ ऑगस्टपर्यंत सरकारच्या सर्व सेवा ऑनलाइन करण्यात याव्यात. ज्या विभागाच्या सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन होणार नाहीत, त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल.

# रत्नागिरीत महायुतीच्या दोन मंत्र्यांत खडाजंगी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**रत्नागिरी :** खेड-दापोली मतदारसंघातील अंतर्गत वादामुळे महायुतीच्या दोन मंत्र्यांची जुंपली आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मतदारसंघात येऊन राज्याचे मत्स्य व्यवसाय खात्याचे मंत्री नितेश राणे यांनी केलेली टीका कदम यांच्या चांगलीच जिव्हारी लागली असून महायुतीमधील वाद विकोपाला जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शिवसेना (शिंदे) आणि भाजपचे मंत्री एकमेकांवर टीका करत असल्याने रत्नागिरीतील राजकारणाला वेगळा रंग चढू लागला आहे. नितेश राणे यांनी नुकताच दापोलीचा दौरा केला होता. या वेळी ‘राज्यामध्ये हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आहे. गृहखाते आमच्या देवेंद्र फडणवीस साहेबांकडे आहे. एफआयआरमध्ये जर नाव आले नसेल, वाचवणारे कोणी असेल ते फडणवीस साहेबांपेक्षा मोठे नाहीत. संबंधित खात्यातील काही लोकांनी लक्षात घ्यावे,’ असे कदम यांचे नाव न घेता राणे म्हणाले. या टीकेला उत्तर देताना कदम म्हणाले की, नितेश राणे माझे मित्र, पण माझ्या मतदारसंघात येऊन त्यांनी मला शहाणपणा शिकवण्याची गरज नाही. मतदारसंघात शांतता कशी राखावी हे मला समजते. मी कधीही भगवा खाली ठेवला नाही, याचा अर्थ राणे यांनी समजून घ्यावा, असा टोलादेखील कदम यांनी लगावला.



योगेश कदम, नितेश राणे

### ‘नितेश राणे यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी करा’

मुंबई : ‘दुकानदाराला धर्म विचारून वस्तू खरेदी करा किंवा त्याला हनुमान चालिसा म्हणायला सांगा’. असे सभेत जाहीर आवाहन करणारे राज्याचे मंत्री नितेश राणे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, या मागणीचे निवेदन समाजवादी पक्षाच्या शिष्टमंडळाने सोमवारी राज्यपालांना दिले. मंत्री राणे हे समाज तोडण्याचे काम करत आहेत. वादग्रस्त वक्तव्य करून द्वेष पसरवत आहेत. राणे यांच्या आवाहनामुळे मुंबईत दोन ठिकाणी मुस्लीम फेरीवाल्यांना मारहाण झाली आहे. त्यामुळे राणे यांची हकालपट्टी करण्यात यावी, असे समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अबू आझमी म्हणाले. या प्रकरणी मंगळवारी आझाद मैदानात आंदोलन करण्यात येणार आहे.

# गिरीश महाजन धमकीप्रकरणी याचिका निकाली

## प्रकरण बंद करण्याचा ‘सीबीआय’चा कनिष्ठ न्यायालयात अहवाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचा ताबा मिळावा म्हणून संस्थेच्या विश्वस्तांना धमकावल्याच्या आरोपांतर्गत भाजप नेते आणि ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात दाखल केलेल्या गुन्ह्याचा तपास सीबीआयकडे वर्ग करण्यात आला होता. या निर्णयाला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालयाने नुकतीच निकाली काढली.

विशेष म्हणजे, सीबीआयने हे प्रकरण बंद करण्याबाबत संबंधित न्यायालयात आधीच अहवाल सादर केला आहे. त्यामुळे, याचिकाकर्त्यांनी संबंधित न्यायालयात या अहवालाला विरोध करण्याच्या दृष्टीने आवश्यक कारवाईची मागणी करावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

महाजन आणि त्यांचे स्वीय सचिव रामेश्वर नाईक यांच्याविरोधात कोथरूड पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने सरकारी वकिलांचे म्हणणे योग्य ठरवले. तसेच, भास्करराव पाटील यांची याचिका निकाली काढली.

helios MUTUAL FUND Har term ke liye...

**NOTICE NO. 13/2025**

**Disclosure of unaudited half-yearly financial results of the schemes of Helios Mutual Fund**

Notice is hereby given to the investor(s)/ Unit holder(s) of all the schemes of Helios Mutual Fund (the ‘Fund’) that in accordance with Regulation 59 of Securities and Exchange Board of India (Mutual Funds) Regulations, 1996 read with Paragraph 5.3 of SEBI Master Circular for Mutual Funds SEBI/HO/IMD/IMD-PoD-1/P/CIR/2024/90 dated June 27, 2024, the Half Yearly Unaudited Financial Results of all the schemes of the Fund for the half year ended March 31, 2025 has been hosted on the website of the Fund viz. **https://www.heliosmf.in/downloads/>> Financials>>** Scheme Financials.

Investors may accordingly view/download the results of the schemes of the Fund from the website.

**For Helios Capital Asset Management (India) Private Limited**
(Investment Manager to Helios Mutual Fund)

**Sd/-** **Date : April 28, 2025**
**Authorised Signatory** **Place : Mumbai**

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

**Helios Capital Asset Management (India) Private Limited**
(Formerly Helios Capital Management (India) Private Limited).
**Registered Office :** 515 A, 5th Floor, The Capital, Plot C70, Bandra Kurla Complex, Bandra East, Mumbai - 400051, Maharashtra.
**Corporate Office :** 502, B Wing, The Capital, Plot C70, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400051, Maharashtra.
**Contact :** 022-67319600, **Website :** www.heliosmf.in.
**Corporate Identification Number (CIN) :** U67190MH2021PTC360838

# राज्यात लवकरच ‘पर्यटन मित्र’

## मंत्री शंभूराज देसाई यांची महिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य सरकारने पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देताना ‘महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र)’ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षतेबरोबर पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी, नैसर्गिक, सांस्कृतिक विविधतेचा विचार करता या सुरक्षा दलाच्या माध्यमातून पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

राज्यातील पर्यटन स्थळे, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती पुरविणे हा या पर्यटन सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश असणार आहे. २ ते ४ मे, २०२५ दरम्यान पार पडणाऱ्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर महोत्सवात ‘महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल’ प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहे, असे देसाई यांनी सांगितले. राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी यासाठी राज्यात पर्यटनस्थळावर पर्यटकांच्या सेवेसाठी पर्यटन पोलिसांची कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे.

# काश्मिरातील पर्यटकांच्या परतीवर ६४ लाख खर्च

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्याचे श्रेय सत्ताधारी राजकीय पक्ष घेत असतानाच याचा खर्च राज्याच्या तिजोरीतून झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे. पर्यटकांना परत आणण्यासाठी विमानव्यवस्था करणाऱ्या ‘गिरीकंद ट्रॅव्हल्स’ कंपनीला आतापर्यंत ६४ लाख रुपये देण्यात आले आहेत.

दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मिरातील महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी सरकारने विशेष बाब म्हणून सर्व पर्यटकांना खास विमानाने राज्यात परत आणले. पुण्यातील गिरीकंद ट्रॅव्हल्स कंपनीने या प्रवाशांना आण्यासाठी विमानांची व्यवस्था केली. त्यापोटी कंपनीला ३८ लाख ६१ हजार, १३ लाख ७४ हजार आणि ११ लाख ६५ हजार असे सुमारे ६४ लाख रुपये देण्यात आले असून कंपनीची आणखी काही बिले बाकी असल्याची माहिती यावेळी सूत्रांनी दिली.

**जाहीर सूचना**

**(ॲम्बी व्हॅली सिटीला सूचना प्रसिद्ध करण्याच्या माध्यमातून सेवा)**

**१. तर, तक्रारदार - श्री. आशित विपिन संघवी आणि (रो हाऊस नंबर २५, क्लाउड ९, एन.आय.बी.एच. रोड, मोहम्मद वाडी, पुणे-४११००४८, महाराष्ट्र) यांनी २०१२ च्या ग्राहक तक्रार क्रमांक १२५ मध्ये २०२४ चा एक अंमलबजावणी अर्ज क्रमांक ३३० हा वकील सुश्री फिजा चोप्रा, वकील, डी-३१, पहिला मजला, निजामुद्दीन (पूर्व), नवी दिल्ली-११००१३, मोबाईल ८१३०६५३७३३ यांच्यामार्फत माननीय राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोग, नवी दिल्ली यांच्यासमोर दाखल केला आहे.**

**२. वर उल्लेख केलेल्या, ॲम्बी व्हॅली सिटीला अंमलबजावणी अर्जात न्याय कर्जदार म्हणून खटला दाखल करण्यात आला आहे आणि डिक्री धारकाद्वारे माननीय आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे की ॲम्बी व्हॅली सिटीच्या संचालकांनी १५.१२.२०२३ रोजीच्या (श्री. आशित विपिन संघवी विरुद्ध मेसर्स ॲम्बी व्हॅली लिमिटेड) आयोगाच्या अंतिम आदेशाचे पालन केले नाही आणि अंमलबजावणीची कार्यवाही आयोगासमोर आहे.**

**३. आणि, माननीय राष्ट्रीय आयोगाने ७.०४.२०२५ रोजीच्या त्यांच्या आदेशानुसार, इतर गोष्टींबरोबरच, २९.०५.२०२५ रोजी पुढील सुनावणीसाठी प्रकरण पुढे ढकलले आहे आणि सहा आठवड्यांच्या कालावधीत दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये, एक इंग्रजीत आणि दुसरा स्थानिक भाषेत प्रकाशित करून ॲम्बी व्हॅलीला पर्यायी सूचना देण्याचे निर्देश दिले आहेत.**

**४. त्यानुसार, लक्षात घ्या की निर्णय कर्जदार (ॲम्बी व्हॅली सिटी) यांना २९.०५.२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता सूचीबद्ध ग्राहक तक्रारीतील वरील अंमलबजावणी अर्जाच्या सुनावणीला उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, प्रत्यक्ष किंवा अधिकृत प्रतिनिधी / वकिलामार्फत, असे न केल्यास, माननीय राष्ट्रीय आयोगाकडून खटल्याची सुनावणी केली जाईल आणि एकतर्फी निर्णय घेतला जाईल.**

**नवी दिल्ली, दिनांक २३ एप्रिल, २०२५.**
**आदेशानुसार: राजेश नाथ - सहाय्यक निबंधक**

सत्यमेव जयते
IDEMI
Organised by Ministry of Micro, Small and Medium Enterprises, Govt. of India

**Government Certificate course on**
**Fire Safety & Industrial Safety**

Course Duration 2 Days | Timing 10.30 AM to 5 PM | Course Date: 3,4 May 2025

VENUE & REGISTRATION : IDEMI, SWATANTRYAVEER TATYA TOPE MARG, CHUNABHATTI, SION, PO. MUMBAI
email Id: training@idemi.org www.idemi.org. Ph. (022) 24050301/2/3/4
**After sucessful completion certificate will be issued**

**Contents: Fire Safety:** Life saving lessons from recent Fire incidents, Classification of Fire, Dealing with Fire and Smoke, Principles of Fire Fighting, Fire System Components, Fire Extinguisher Types, Correct process to call a Fire Standards, Compliance to Fire Safety Laws and NBC 2016, First Aid, Evacuation Drill, Fire Safety Audit and many more.

**Industrial Safety:** Safety terminology, Basic principles of Accident Prevention Unsafe Acts and Unsafe Conditions, Health and Safety Audits, Safety Documentation, Integrate Safety Management, Hazard identification and Risk Assessment.

Fees-4000/+18 % GST(Include lunch & tea)(fees are not refundable)
**For technical details, contact: 9869322672**
For Whom: Industries, Consultants, Engineering students & Other Interested candidates.
**Contact-8007765693,9403566219,8275181503,9869087617**
**Required : 2 passport photograph, Aadhar card xerox, education proof xerox**

**कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेड**
सीआयएन: L65921MH1994PLC173469
जीएसटीए: 27AAACD8981C1ZL
CAPRI LOANS

नोंदणीकृत पत्ता: कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेड (सीजीसीएल/कंपनी), 502, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई, महाराष्ट्र, भारत, पिनकोड – 400013.
टेलिफोन: 9891668999, ई–मेल: vinod.kumar42@capriglobal.in

**सोन्याच्या दागिन्यांच्या लिलावाची जाहीर सूचना**

ग्राहकांना आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येत आहे की कंपनीच्या खाली नमूद करण्यात आलेल्या शाखांमध्ये सोन्याचे दागिने तारण ठेवून ग्राहकांनी घेतलेले कर्ज थकीत झाले असून त्यांनी सदर दागिने सोडवून नेलेले नाहीत. वारंवार सूचना देऊन देखील कंपनीला सदर कर्जाचे पैसे न मिळाल्यामुळे कंपनी द्वारा सोन्याच्या दागिन्यांचा काटेकोरपणे "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे ते" अशा प्रकारे ऑनलाईन/सार्वजनिक पद्धतीने लिलाव करण्यात येईल. दिनांक 02 May 2025 रोजी सकाळी 10:00 वाजता या वेळेत gold.samil.in यांच्या ई-लिलाव व्यासपीठावर सदर लिलाव आयोजित करण्यात येईल. ज्यांना यात सहभागी व्हायचे आहे त्यांना त्यांच्या शाखेशी संपर्क साधण्याची विनंती करण्यात येत आहे. सदर तालुक्याचा/शाखेचा पत्ता आमच्या www.capriloans.in या वेबसाईटवर कळविण्यात आला आहे. जर कोणत्याही कारणास्तव लिलाव झाला नाही तर तो पुढील दिवशी त्याच नियम व अटींवर सुरू राहील. त्याचप्रमाणे, वरील तारखेला/नंतरच्या तारखांना पहिल्या पातळीचा लिलाव अयशस्वी झाल्यास, कंपनी कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेड यांना, कोणतीही अधिक सूचना न देता, त्याच नियम व अटींवर पुढील दुसऱ्या लिलावाच्या तारखांना किंवा पुढील तारखांना सार्वजनिक लिलावाद्वारा/ई-लिलावाद्वारा त्यांच्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर gold.samil.in येथे आयोजित करण्यासाठी पुढे ढकलण्याचा अधिकार असेल. कोणतीही माहिती न कळविता कर्जाचे कोणतेही खाते लिलावातून वगळण्याचा आणि कोणतीही पुर्व सूचना न देता लिलाव रद्द करण्याचा कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेड यांना अधिकार आहे. लिलावाच्या तारखेत कोणताही बदल झाल्यास सदर तारिख लिलावाच्या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल.

जिल्हानिहाय द्वितीय-स्तरीय लिलाव निश्चित करण्यात आलेल्या तारखांना सर्व नियोजित ठिकाणी सकाळी 10:00 वाजता या वेळेत आयोजित केले जातील.

**District:** PUNE **Auction Centre Address:** CAPRI LOAN SARSVATI NIVAS PUNE NASHIK HIGHWAY BLDG NUMBER 476 M.N.8259/546 MANCHAR (NEAR SBI BANK) AMBEGAON PUNE MAHARASHTRA - 410503 **Auction Date:** 06.05.2025
**MANCHAR-PUNE-MH:** L30100002150986, L30100003023096, L30100003479720, L30100003477256
**District:** RATNAGRI **Auction Centre Address:** CAPRI LOAN SHOP NO 1,2 CENTER 1 NEAR BANK OF INDIA KAVILTALI CHIPLUN MAHARASHTRA - 415605 **Auction Date:** 06.05.2025
**CHIPLUN-KAVILTALI-MH :** L30100000160014, L30100000430451

टीप: ग्राहक लिलाव तारीख (01 May 2025) च्या अगोदर सोन्याचे दागिने सोडवून घेऊ शकतात.
टीप: निविदाकारांना आपले आयडी/पॅन कार्ड नंबर/जीएसटी प्रमाणपत्र (नोंदणीकृत डीलर असल्यास) सादर करावे लागेल.
यशस्वी निवेदाकारांनी लिलावाची संपूर्ण रक्कम आरटीजीएस द्वारा हस्तांतरित करावी.

दिनांक: 29 April 2025 — करिता कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेड (सुवर्ण कर्ज)
ठिकाण: MAHARASHTRA

Jyothy labs
**ज्योती लॅब्स लिमिटेड**
सीआयएन : एल२४२४०एमएच१९९२पीएलसी१२८६५१
नोंदणी कार्यालय : उजाला हाऊस, राम कृष्ण मंदिर रोड, कोंडीविटा, अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०५९;
टेलि.: ०२२ ६६८९२८००; फॅक्स : ०२२ ६६८९२८०५; ईमेल : secretarial@jyothy.com; वेबसाइट : www.jyothylabs.com

**सूचना**

**कंपनीच्या समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि रक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफ) यांच्या डीमॅट खात्यात हस्तांतरण करणे**

ही सूचना, कंपनी कायदा २०१३ चे कलम १२४ (६) ज्याचे सहवाचन, वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या गुंतवणूकदार शिक्षण आणि रक्षण निधी प्राधिकरणाची (लेखांकन, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमावली २०१६ (सदर नियमावली) यासोबत केली जाते त्यानुसार देण्यात येत आहे. त्यानुसार ज्योती लॅब्स लिमिटेड [कंपनी] यांच्या ज्या भागधारकांनी मागील सलग सात (७) किंवा त्याहून जास्त वर्षे कंपनीच्या समभागावरील लाभांशाचे रोखीत रूपांतर केलेले नाही किंवा त्याबद्दल दावा किंवा मागणी केलेली नाही, त्यांचे सांविधिक हस्तांतरण केंद्र सरकारने स्थापन केलेल्या आयईपीएफ ॲथॉरिटि यांच्या डीमॅट खात्यामध्ये कंपनीला करावे लागते. सध्या या कंपनीमध्ये वित्तीय वर्ष २०१७-१८ (अंतिम लाभांश) पासून वित्तीय वर्ष २०२३-२४ या मागील सलग सात (७) वर्षांतील ठराविक भागधारकांनी ज्याची मागणी केलेली नाही / स्वीकारलेली नाही असा लाभांश साचलेला आहे. त्यापैकी वित्तीय वर्ष २०१७-१८ चा मागणी न केलेला / न स्वीकारलेला अंतिम लाभांश आयईपीएफ मध्ये दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा पर्यंत हस्तांतरीत करण्यात येईल.

या नियमावलीतील विविध आवश्यकतांनुसार आणि त्यांना धरून, कंपनीने ज्या संबंधित भागधारकांचे समभाग वरील नियमावलीनुसार आयईपीएफ ॲथॉरिटी यांच्या डीमॅट खात्यात हस्तांतरीत करण्यास पात्र झालेले आहेत, त्याविषयी योग्य ती कार्यवाही करण्यासाठी अशा भागधारकांना कंपनीला माहित असलेल्या त्यांच्या अंतिम पत्त्यावर, व्यक्तीशः पत्रे पाठवून कळविण्यात येणार आहे. जर कंपनीला, अशा संबंधित भागधारकांकडून दि. २७ ऑगस्ट, २०२५ पर्यंत काहीच प्रतिसाद मिळाला नाही तर, कंपनीला सदर नियमावलीत सांगितलेली आवश्यकता पूर्ण करण्यासाठी या शेअर्सचे नियमावलीतील कार्यपद्धतीनुसार, ठरविलेल्या तारखेला आयईपीएफ ॲथॉरिटी यांच्या डीमॅट खात्यात हस्तांतरण करावे लागणार आहे. विशेष बाब म्हणून कंपनीने, अशा भागधारकांचे जे शेअर्स आयईपीएफ ॲथॉरिटीच्या डीमॅट खात्यात हस्तांतरीत होण्यास योग्य आहेत, त्याचा संपूर्ण तपशील कंपनीच्या वेबसाईट http://www.jyothylabs.com येथे प्रदर्शित केलेला आहे. भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील वेबसाईट पहावी आणि त्यांच्या आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यात हस्तांतरण करण्यास योग्य झालेला रोखीत रूपांतर न केलेला लाभांश व शेअर्स यांची माहीती तपासून घ्यावी.

ज्या संबंधित शेअर्स धारकांनी त्यांचे शेअर्स फिजिकल स्वरूपात धारण केलेले आहेत आणि ज्यांचे शेअर्स आयईपीएफ ॲथॉरिटी यांच्या डीमॅट खात्यात हस्तांतरित करण्यास पात्र झाले आहेत, त्यांनी नोंद घ्यावी की, कंपनी त्यांनी धारण केलेल्या प्रत्येक शेअर प्रमाणपत्राचे आयईपीएफ ॲथॉरिटीच्या डीमॅट खात्यात हस्तांतरण करण्यासाठी नियमांनुसार, नवीन शेअर सर्टिफिकेट देणार आहे. यामुळे अशा भागधारकांच्या नावावर नोंदवलेले मूळ शेअर प्रमाणपत्र आपोआपच अपरिक्राम्य / हस्तांतरणास अपात्र ठरतील. तसेच या भागधारकांनी याबाबत लक्षात घ्यावे की, कंपनीने या संबंधी तिच्या वेबसाईटवर दिलेला तपशील हाच वरील नियमावलीनुसार नवीन शेअर प्रमाणपत्रे देण्यासाठीची आवश्यक ती सूचना आहे असे मानले जाईल. व ती प्रमाणपत्रे आयईपीएफ ॲथॉरिटीच्या डीमॅट खात्यात हस्तांतरण करण्यास योग्य मानली जातील. जर काही शेअर्स डिमटेरलाईज्ड स्वरूपात धारण केलेले असतील आणि ते हस्तांतरण करण्यास पात्र झाले असतील तर कंपनी असे शेअर आयईपीएफ ॲथॉरिटीच्या डीमॅट खात्याच्या नावे हस्तांतरीत करण्यासाठी संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांना डिलिव्हरी - इन्स्ट्रक्शन स्लीप देण्यात येईल.

अशा शेअरवर पुढे जर काही लाभांश दिला तर तो आयईपीएफ यांच्याकडे जमा केला जाईल आणि अशाप्रकारे दावा मागणी न केलेला/न दिलेला आणि/किंवा आयईपीएफ यांचेकडे हस्तांतरीत केलेला लाभांश आणि / किंवा शेअर्स याबाबत कंपनी विरोधात कोणताही दावा मान्य केला जाणार नाही. अशा आयईपीएफ कडे हस्तांतरीत केलेला लाभांश / शेअर्स बाबत ज्या भागधारकांना मागणी करावयाची असेल त्यांनी नियमाप्रमाणे आयईपीएफ यांचेकडे त्यांचा आयईपीएफ -५ फॉर्मद्वारे अर्ज करून करावी. सदर फॉर्म आयईपीएफ यांची वेबसाईट www.iepf.gov.in येथे उपलब्ध आहे.

जर भागधारकांना याविषयी आणि संबंधित नियमावली विषयी काही विचारणा करायची असेल तर त्यांनी कंपनीशी कंपनीच्या वरील दिलेल्या पत्त्यावर किंवा तिचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट-मेसर्स एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इन टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), सी-१०१, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई -४०० ०८३, टेलि. : ०२२ ४९१८६०००, फॅक्स : ०२२ ४९१८६०६० इमेल : iepf.shares@in.mpms.mufg.com, वेबसाईट: https://in.mpms.mufg.com/ येथे संपर्क साधावा.

ज्योती लॅब्स लिमिटेडकरिता
सही/-
श्रेयस त्रिवेदी
मुख्य - विधी आणि कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९ एप्रिल, २०२५

# औद्योगिक उत्पादन किंचित वाढून मार्चमध्ये ३ टक्क्यांवर

पीटीआय, नवी दिल्ली



देशाच्या औद्योगिक उत्पादनातील वाढीचा दर मार्चमध्ये ३ टक्क्यांवर पोहोचला आहे. आधीच्या फेब्रुवारी महिन्यातील २.७ टक्क्यांच्या तुलनेत तो किंचित वाढला असला तरी वार्षिक तुलनेत तो घसरला आहे.

दरम्यान, सरलेल्या २०२४-२५ आर्थिक वर्षात औद्योगिक उत्पादनात वाढीचा सरासरी दर ४ टक्के नोंदविण्यात आला आहे, जो आधीच्या आर्थिक वर्षात ५.९ टक्के होता. २०२४-२५ मध्ये नोंदवली गेलेली ४ टक्क्यांची सरासरी वाढ ही करोनापश्चात चार वर्षांतील सर्वात कमजोर वाढ आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने औद्योगिक उत्पादनाची आकडेवारी जाहीर केली आहे. यानुसार, यंदा फेब्रुवारीच्या तुलनेत मार्चमध्ये औद्योगिक उत्पादनात वाढ झाली असली तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात घट झाली आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ५.५ टक्के होता. निर्मिती, खाणकाम आणि ऊर्जा क्षेत्रांची वाईट कामगिरी यासाठी कारणीभूत ठरली आहे. दरम्यान, सरकारने फेब्रुवारीतील औद्योगिक उत्पादनातील वाढीचा सुधारित दर जाहीर केला असून, तो २.७ टक्के आहे. आधी हा दर २.९ टक्के अंदाजण्यात आला होता.

गेल्या वर्षी मार्च महिन्यातील १.३ टक्क्यांच्या खाणकाम क्षेत्राचा वाढीचा दर यंदा ०.४ टक्क्यांवर घसरला आहे. तसेच, वीजनिर्मिती क्षेत्राच्या वाढीचा दर गेल्या वर्षीच्या ८.६ टक्क्यांच्या तुलनेत यंदाच्या मार्चमध्ये ६.३ टक्क्यांवर ओसरला आहे.

# 'महिंद्र'ची छोट्या बसच्या बाजारपेठेत सशक्त दावेदारी

## एसएमएल इसुझूवर ताबा

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

**मुंबई:** महिंद्र अँड महिंद्रने एसएमएल इसुझू या कंपनीच्या अधिग्रहणासह छोट्या बस, ट्रकच्या बाजारपेठेत सशक्त दावेदारीसह, २१ टक्के हिस्सेदारी मिळविण्याचे पाऊल टाकले आहे. याचबरोबर कंपनी इलेक्ट्रिक आणि सीएनजी बस क्षेत्रातही प्रवेश करणार आहे.

याबाबत अधिकृत घोषणा करताना महिंद्र अँड महिंद्रने स्पष्ट केले की, एसएमएल इसुझूमधील ५८.९६ टक्के भागभांडवली हिस्सा कंपनी ताब्यात घेणार आहे. सुमितोमो आणि इसुझू या दोन्ही जपानी प्रवर्तकांचा संपूर्ण हिस्सा त्यामुळे महिंद्रकडे येईल. हा हिस्सा प्रति समभाग ६५० रुपये किमतीने एकूण ५५५ कोटी रुपयांच्या मोबदल्यात घेण्याचा करार झाला आहे. यानंतर खुल्या खरेदी प्रस्तावाद्वारे (ओपन ऑफर) एसएमएल इसुझूमधील अतिरिक्त २६ टक्के हिस्सा सार्वजनिक भागधारकांकडून घेतला जाणार आहे. कंपनी प्रति समभाग १,५५४.६० रुपये किमतीने एकूण ५८५ कोटी रुपयांना हा हिस्सा विकत घेणार आहे.

महिंद्र अँड महिंद्रचे कार्यकारी संचालक व मुख्याधिकारी (वाहन व कृषी क्षेत्र) राजेश जेजुरीकर म्हणाले की, १९८३ साली स्थापित एसएमएल इसुझूकडून इलेक्ट्रिक बस, ट्रक विकसित केली जात आहेत. सीएनजी बस क्षेत्रातही तिचे अस्तित्व आहे. ३.५ टनांहून अधिक क्षमतेच्या वाणिज्य वाहन बाजारपेठेत प्रवेशासाठी याचा फायदा आम्हाला होईल. एसएमएल इसुझूचा छोट्या बसच्या बाजारपेठेत सध्या १६ टक्के हिस्सा आहे.

## परकीय निधीचा ओघ, रिलायन्समध्ये खरेदीमुळे

# 'सेन्सेक्स' हजार अंशांनी सबळ

### परकीयांचे गुंतवणूक-सातत्य



परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची निरंतर खरेदी हा बाजाराच्या सकारात्मकतेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. शुक्रवारच्या पडझडीतही त्यांनी २,९५२.३३ कोटी रुपये मूल्याचे समभाग खरेदी केले. अनुकूल जागतिक संकेत आणि देशांतर्गत अर्थव्यवस्थेसंबंधी दमदार आकडेवारीमुळे गेल्या आठवड्याभरात परदेशी गुंतवणूकदारांनी बाजारात १७,४२५ कोटी रुपये गुंतवले आहेत. आधीच्या १८ एप्रिलला संपलेल्या आठवड्यातही त्यांनी निव्वळ गुंतवणूक ही ८,५०० कोटी रुपयांची होती.



सेन्सेक्स: ८०,२१८.३७ ▲१,००५.८४ (+१.२७%)

निफ्टी: २४,३२८.५० ▲२८९.१५ (+१.२०%)

तेल $: ६६.७४ (▼०.१९%)

डॉलर ₹: ८५.०३ (▼३८ पैसे)

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

**मुंबई:** रिलायन्स इंडस्ट्रीज आणि खासगी बँकांमध्ये झालेली जोमदार खरेदी आणि परकीय गुंतवणूकदारांकडून सुरू राहिलेल्या निधीच्या ओघामुळे भांडवली बाजाराने सोमवारी उत्साही वळण घेतले. भारत-पाकिस्तान सीमेवरील तणावादरम्यान दोन दिवसांपासून सुरू असलेली घसरणपासून फारकत घेत, सेन्सेक्स १,००५ अंशांनी वधारला आणि त्याने ८०,००० च्या पातळीला पुन्हा गाठले.

सेन्सेक्स १,००५.८४ अंशांच्या वाढीसह ८०,२१८.३७ वर दिवसअखेर स्थिरावला. या निर्देशांकातील ३० पैकी २३ समभाग वाढीसह बंद झाले. दिवसभरात त्याने १,१०९.३५ अंशांच्या मुसंडीसह ८०,३२१.८८ चा उच्चांक गाठला होता. दुसरीकडे निफ्टी निर्देशांक २८९.१५ अंशांनी वधारून २४,३२८.५० वर बंद झाला. या निर्देशांकातीलही ५० पैकी ३९ समभागांचे भाव वधारले.

बाजार भांडवलाच्या दृष्टीने सर्वात मोठ्या असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभाग ५.२७ टक्क्यांच्या वाढीसह निर्देशांकातील सर्वात जास्त वाढणारा समभाग ठरला. तेल ते किरकोळ ते दूरसंचार या कंपनीची मार्च तिमाहीत सार्वत्रिक अंदाजापेक्षा सरस २.४ टक्क्यांची नफ्यात वाढ नोंदवणारी कामगिरी बाजाराच्या पसंतीस उतरली. एसएमएल इसुझूचे ५५५ कोटी रुपयांच्या मोबदल्यात अधिग्रहण जाहीर केल्यानंतर महिंद्र अँड महिंद्रच्या समभागात २.२९ टक्क्यांनी वाढ झाली. दुसरीकडे, एसएमएल इसुझू लिमिटेडचे समभाग मात्र १० टक्क्यांनी घसरले.

व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणारा बीएसई मिडकॅप १.३४ टक्के आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.३९ टक्क्यांनी वधारला. माहिती-तंत्रज्ञान (आयटी) वगळता सर्व प्रमुख क्षेत्रांनी या तेजीत भाग घेतला, ज्यामध्ये फार्मा, ऊर्जा आणि भांडवली क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग सर्वाधिक वाढ साधणारे ठरले.

## 'एसबीआय इन्कम प्लस आर्बिट्राज ॲक्टिव्ह एफओएफ' दाखल

**मुंबई:** देशातील सर्वात मोठे फंड घराणे असलेल्या एसबीआय म्युच्युअल फंडाने 'एसबीआय इन्कम प्लस आर्बिट्राज ॲक्टिव्ह एफओएफ' ही नवीन योजना गुंतवणुकीस खुली केली आहे.

मुदतमुक्त श्रेणीतील ही फंड ऑफ फंड स्वरूपाची योजना सक्रियपणे व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या रोखेसंलग्न (डेट) योजनांमध्ये त्याचबरोबर आर्बिट्राज म्युच्युअल फंड योजनांच्या युनिटसमध्ये गुंतवणूक करेल. नवीन फंड प्रस्तुती (एनएफओ) २३ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान गुंतवणुकीसाठी खुली असेल. गुंतवणूकदारांना नियमित उत्पन्न आणि भांडवलाची वाढ मिळवून देणे, हे या योजनेचे गुंतवणूक उद्दिष्ट आहे. योजनेत किमान प्राथमिक गुंतवणूक पाच हजार रुपये करता येईल. दररोज, साप्ताहिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक आणि वार्षिक पद्धतीने 'एसआयपी' करता येणार आहे. एप्रिल २०१९ पासून एसबीआय म्युच्युअल फंडात कार्यरत असलेले अर्धेंदू भट्टाचार्य हे योजनेचे निधी व्यवस्थापक आहेत. ते सध्या एसबीआय रिटायरमेंट बेनिफिट फंड - अॅग्रेसिव्ह प्लॅनसह अनेक फंडांच्या डेट भागाचे व्यवस्थापन सांभाळत आहेत.

## माझगांव डॉकच्या प्रमुखपदी कॅप्टन जगमोहन



**मुंबई:** भारतीय नौदलातून २५ वर्षांहून अधिक काळ सेवेनंतर निवृत्त कॅप्टन जगमोहन यांची माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडचे (एमडीएल) यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. २१ एप्रिल २०२५ पासून नवीन कार्यभार सांभाळला. या आधी ते गोवा शिपयार्ड लिमिटेडचे संचालक (उद्यम योजना व व्यवसाय विकास) म्हणून कार्यरत होते. त्या आधी गार्डन रिच शिपबिल्डर्स अँड इंजिनीयर्स लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक (डिझाइन) म्हणून ते कार्यरत होते. कोचीन विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठातून नौदल वास्तुरचनाकार पदवी मिळविलेले कॅप्टन जगमोहन यांनी आयआयटी दिल्ली व आयआयटी खडगपूरमधून पदव्युत्तर पदवी मिळविली आहे.

## रामराज कॉटनकडून नवीन मृथू पंचे

**मुंबई:** रामराज कॉटनने पंचे अर्थात टॉवेल्सची नवीन श्रेणी मृथू या नावाने आणली आहे. उत्तम दर्जाच्या १०० टक्के सुत आणि बांबूच्या मुलायम तंतूंच्या संयोगातून बनलेले मृथू टॉवेल्स हे आधुनिक जीवनशैलीला साजेसे तसेच पर्यावरणपूरक असल्याचा कंपनीचा दावा आहे. या टॉवेल्सच्या नवीन श्रेणीसाठी कंपनी अभिनेत्री मीनाक्षी चौधरी हिची सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती केली असून, तिचा सहभाग असलेली जाहिरात मोहिम लवकरच सुरू केली जाणार आहे.


लोकसत्ता क्लासिफाइड्स
सगळ्यांकरिता सर्वकाही

## मालमत्ताविषयक

*दाते लँड्स महाराष्ट्रात शेतजमिनी घेण्यासाठी शेतकरी दाखला बनवितात, कर्जतमधील सोसायटी प्लॉट, महाड येथील शेतजमिनी विकतो. सशुल्क सल्ला– 9076071568/ 9324371568/ 9076388458

0070964365-1

## सोसायटी नोटीस

**जाहीर सूचना**
(कोणताही पूर्वग्रह न ठेवता निविदा सूचना जारी)

**शुद्धिपत्रक**

**वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**
VASUNDHARA CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED.
नोंदणी क्रमांक : एनओबीएम/सिडको / एचएसजी /(टी.सी)/10562/डी.आर/2024-25

बी 10 टाईप, प्लॉट -1, इमारत क्र.01 ते 15, सेक्टर-4, राजीव गांधी स्टेडियम जवळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- 400 614.

दिनांक : 28/04/2025

**पुनर्विकासासाठी इच्छुक बांधकाम व्यावसायिक व विकासकांकडून प्रस्ताव मागवणे**

वसुंधरा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड आपल्या सोसायटीच्या पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिक व विकासकांकडून प्रस्ताव मागवीत आहोत. हा प्रकल्प 6164 चौरस मीटरच्या भूखंडावर असून एकूण 300 सदनिकांचा आहे. स्वारस्य दाखवणारे बांधकाम व्यावसायिक व विकासक यांनी त्यांचे प्रस्ताव तसेच पूर्ण झालेले व चालू प्रकल्पांची माहिती बंद लिफाफ्यात दिनांक 29/04/2025 ते 14/05/2025 रोजी पर्यंत सोसायटी कार्यालयामध्ये सादर करावी निविदा विक्रीस उपलब्ध. दिनांक 29 एप्रिल 2025 ते 14 मे 2025 निविदा जमा करण्याची शेवटची दिनांक 14 मे 2025 संध्याकाळी 7:00 वाजेपर्यंत

तपशीलवार माहिती व टेंडरची प्रत सोसायटीच्या कार्यालयालयातून मिळवता येईल. यासाठी ₹1,00,000/- [(एक लाख रुपये) (शुल्क ना परतावा)] फक्त डिमांड ड्राफ्ट (D D) द्वारे वसुंधरा को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेडच्या नावे स्वीकारले जाईल.

संपर्क क्र. : 9372897219 / 8692020861.
ई-मेल आयडी : vasundharachslbelapur24@gmail.com

कार्यालय वेळ : सोमवार ते शनिवार संध्याकाळी 06.00 ते 09.30 व रविवार सकाळी 11.00 ते दुपारी 02.30.

अध्यक्ष
दिपक गौतम बोले
सचिव
विनायक सुरेश चौगुले
खजिनदार
अजय दीपचंद चांगरा
वसुंधरा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड.

0070964430-1-1

**निविदा सूचना**
(पूर्वग्रह न ठेवता जारी)

**कॉस्मोपॉलिटन २ कोऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड.** रजि. क्रमांक एन.बी.ओ.एम / सिडको / एच.एस.जी (ओ. एच.) ७६८ / जे.टी.आर / १९९९-२०००. पुनीत पार्क, भूखंड क्र. १८२सी, सेक्टर-१७, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६, क्षेत्रफळ सुमारे ७१७८.८५ चौ. मी., पुनर्विकास / पुनर्बांधणी साठी सीलबंद निविदा प्रतिष्ठित, अनुभवी, तसेच आर्थिक दृष्ट्या सक्षम विकासका कडून अपेक्षित आहे. सोसायटी मध्ये १०९ निवासी गाळे, २७ रो हाऊस आणि २० दुकाने आहेत. तसेच समोर २० मीटर रुंद रस्ता आहे. सोसायटी मोक्याच्या ठिकाणी आहे. सदर भूखंड हा मे. सिडको ली. ने भाडेपट्टीवर सोसायटीला देण्यात आला आहे.

निविदा दस्तऐवज कॉस्मोपॉलिटन ॥ कोऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड. पुनीत पार्क, भूखंड क्र. १८२सी, सेक्टर-१७, नेरुळ, नवी मुंबेई - ४००७०६, च्या कार्यालयात उपलब्ध उपलब्ध असतील. दस्तऐवज किंमत रु. १,००,०००/- (परत न करता येणारी किंमत.) कॉस्मोपॉलिटन २ कोऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड च्या नावे डीडी / पे ऑर्डरद्वारे देण्यात यावी. निविदा दस्तऐवज विक्री सोसायटीच्या कार्यालयात दिनांक ३० एप्रिल २०२५ पासून १५ मे २०२५ पर्यंत दररोज खालील वेळेत असेल.

सकाळी १०:३० ते दुपारी १२:३० आणि संध्याकाळी ०५:३० ते ०८:३०.

**मा. अध्यक्ष / मा. सचिव,**
कॉस्मोपॉलिटन ॥ को ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड.
संपर्क :
+९१ - ९८३३४१२१४५ /९३२२४०६८६३

0070964336-1-1

## जाहिरातविषयक

"Keyon Media Pvt Ltd" अधिकृत जाहिरात एजन्सी न्यूजपेपर, Digital marketing, TV जाहिरात Discount दरात (Email-WhatsApp द्वारे स्वीकारतो) - 9653683498/ 9920992395.

0070945293-1

मुंबई, मुंबईबाहेरील सर्व पेपर्सला जाहिराती छापतो
पुण्यस्मरण जीवनसाथी Notice वाढदिवस PMC प्रॉपर्टी
TIME Advertising
लोकसत्ता सेवेसाठी ऑफिसला कधीही कुठूनही फोन करा
Landline: 02224466191 24468556/ 8976181891

0070963337-5-5

HIGHTECH, Experts, Quick Service (Sarvodaya Advertising) स्वस्त/ सर्वच वर्तमानपत्रामध्ये लीगल/ टेंडर/ सोसायटी शेअर सर्टीफिकेट/ एग्रीमेंट/ कंपनी शेअर/ पब्लिक नोटीसच्या प्रसिद्धीसाठी 9892797851/ 9322277986

0070962927-1

## भविष्यविषयक

☛## ४२ वर्षांचा अनुभव असलेले, सत्य व अचूक भविष्यकथन करणारे एकमेव ज्योतिषी श्री. विजय हजारी- विवाहसंबंध स्पेशालिस्ट (व्हॉट्सअपवरून भविष्यकथन शक्य). 9870335562.

0070948305-1

* पत्रिकेशिवाय तुमची समस्या सांगणार, आश्चर्यचकित व्हाल! विश्वास बसल्यास (पत्रिकावाचनासहित) गुणकारी उपायदेखील सुचविणार, (उपायांच्या फायद्याचे हजारपेक्षा अधिक खणखणीत अभिप्राय) * (दादासाहेब 7738180098)

0070941515-1

## पाहिजेत

औषध मालाची डिलिव्हरी करण्यास मुले पाहिजेत. किमान शिक्षण बारावी पास, चांगल्या पगारासह पीएफ, ईएसआईसी, बोनस सुविधा देण्यात येईल. अर्जासह भेटा- डि. विजय फार्मा प्रा. लि., ११, शिल्पीन सेंटर, वडाळा उद्योग भवनसमोर, जी.डी. अम्बेकर मार्ग, दादर- ईस्ट.

0070964195-1

संस्थेच्या दोन सभागृह २ वर्ष कॅटरिंग व डेकोरेशनकरिता अनुभवी कॅटरर्स पाहिजे. त्याबाबतचे छापील अर्ज दिनांक १/५/२०२५ ते १२/५/२०२५ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत संस्थेच्या कार्यालयात मिळतील. श्री संत सेना नाभिक समाज आणि श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, एस.व्ही. रोड, वांद्रे (प.), मुं. ५०. संपर्क- ९६१९८८२६१६/ ९३२२९९९८८१.

0070964173-1

महाराष्ट्रातील अग्रगण्य फार्मा कंपनीसाठी पाहिजे. ऑर्थोपेडिक हॉस्पिटल OT मध्ये ऑर्थो इंप्लांट सर्जरीसाठी डॉक्टर्सना असिस्ट करू शकणारा स्क्रबर व्यक्ती पाहिजे. OT मध्ये काम केलेला अनुभवी व्यक्तिस प्राधान्य. आकर्षक पगार, PF, ESIC, Bonus सारख्या सुविधा देण्यात येईल. मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर व छ. संभाजीनगर येथील लोकांनीच आपला बायोडेटा व्हॉटसॲप वर पाठवा: 9371088918 किंवा मेल करा: hr@dvijaypharma.com

0070964308-1

## पाहिजेत

संस्थेचे नाव: **BHARATIYA VIDYA BHAVAN (BHAVAN'S COLLEGE), ANDHERI**

**BHARATIYA VIDYA BHAVAN Private Aided/Private Sanstha** या व्यवस्थापनाच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये खाली नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (पवित्र प्रणाली मधून) अर्ज मागवण्यात येत आहेत.

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी / मान धन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | Biology (HS) | English | Post Graduate | Graduate | ३ |
| २ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | Chemistry (HS) | English | Post Graduate | Graduate | ३ |
| ३ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | Economics (HS) | English | Post Graduate | Graduate | १ |
| ४ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | English (HS) | — | Post Graduate | Graduate | १ |
| ५ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | Hindi (HS) | — | Post Graduate | Graduate | २ |
| ६ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | Physics (HS) | English | Post Graduate | Graduate | ४ |
| ७ | English | Higher Secondary Teacher Full Time | Consolidated Pay / High Sec (20,000) | Aided | French (HS) | — | Post Graduate | Graduate | १ |

आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशिल

अनु.जाती–०३ (१ महिला), विमाप्र–०१, इ.मा.व.–०२ (१ महिला), विजा(अ)–०२ (१ महिला), भज(ब)–०१, भज(ड)–०१, एसईबीसी–०२ (१ महिला), खुला–०३ (१ महिला).

१. अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) दिलेल्या उमेदवारांपैकी ज्यांनी पवित्र प्रणालीवर वैयक्तिक माहिती (profile)स्व प्रमाणित केलेली आहे असेच उमेदवार जाहिरातीनुसार अर्ज करु शकतील.
२. इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार जाहिरातीच्या अनुषंगाने पदासाठी पसंतीक्रम नमूद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३. इयत्ता ९ वी ते १० वी / इयत्ता ११ वी ते १२ वीच्या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) दिलेली असणे अनिवार्य आहे.
४. शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता, विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्र, इत्यादी साठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलसह https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये "उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना" या शीर्षकाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन व स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
५. व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शवलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

प्राचार्या

## पार्ट टाईम जॉब

Explore- New-Career Possibilities!! Exclusive for Retired, VRS, NRI, Homemaker. Age : 51+. Good Package+ Benefits+ Foreign Tours. Dattatreya Gawde : 9867769036.

0070953948-1

अर्धवेळ काम करिता नागरिक, रिटायर्ड गृहिणी, बँकर्स, शिक्षक, VRS, NRI सुवर्णसंधी. उत्तम पगार + मेडिकल+ इंसेंटिव+ विदेश प्रवास age ४०+ जगदीश जोशी 9869509133.

0070960648-1

WORK-ON-YOUR-TERMS. Earn & Grow with guidance. Retired, VRS, Professionals, Bankers. Age 45+. Excellent Income+ Incentives. Call: 9833898743.

0070962791-1

## कुरिअर सर्व्हिस

परदेशात पार्सल: अमेरिका, युरोप, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दुबई, सिंगापूर, खाद्यपदार्थ, कपडे, मिठाई, मसाले, डॉक्युमेंट घरपोच सर्व्हिस. निवांतकर 7666472015/ 9029026645.

0070964299-1

## वृद्धाश्रम

२४ तास डॉक्टर सेवा सई सेवा सेंटर वृद्ध, मतिमंद, बेडरिडन, पॅरालिसिस व्यक्तींना राहण्याची, उपचाराची सोय. मीरारोड/ पनवेल. संपर्क : 9769982672/ 9820922864.

0070954803-1

## यात्रासहल

देशपांडे ट्रॅव्हल्स
रेल्वे रिझर्व्हेशन ७५ दिवस अगोदर
9820962500
9819453043
चारधाम यात्रा
बद्रीनाथ-केदारनाथ यमुनोत्री-गंगोत्री हरिद्वार-ऋषिकेशसह 13 दिवस, 5, 15, 26 मे, 5, 16 जून, 34,500/- प्रत्येकी दिल्ली ते दिल्ली विमान प्रवास 46,500/-
वैष्णोदेवी-काश्मिर अमृतसरसह 2, 9, 16, 23 मे 35,500/- प्रत्येकी रेल्वे प्रवास 3 टायर एसी (13 दिवस) 51,500/- प्रत्येकी विमान प्रवास (येताजाता) (10 दिवस)
अयोध्या-वाराणसी प्रयागराजसह 6 दिवस 27, 31 जुलै, 4, 8, 12, 16 ऑगस्ट, डिलक्स 3 टायर एसी 13,500/- प्रत्येकी इकॉनॉमिक नॉन-एसी 9,500/-
अमृतसर-डलहौसी धरमशाला-खजियारसह 8 दिवस, 5, 17, 23, 29 मे, 3 टायर एसी, 24,500/- प्रत्येकी
सिमला-कुलू-मनाली चंदीगडसह 10 दिवस, 17, 25 मे, 3 टायर एसी राजधानी, 31,500/- प्रत्येकी
लेह-लडाख कारगिल-काश्मिरसह 14 दिवस, 24, 31 मे, 7 जून, 3 टायर एसी, 45,501/- प्रत्येकी
अष्टविनायक-जेजुरी प्रतिबालाजी-आळंदीसह दर शुक्रवारी, इकॉनॉमिक 3,151/- स्वतंत्र रुम 3,951/-, एसी बस व एसी रुम 5,551/-
पंढरपूर-तुळजापूर गाणगापूर-अक्कलकोट दर गुरुवारी, इकॉनॉमिक 3,351/-, स्वतंत्र रुम 4,151/-, एसी बस, नॉन-एसी रुम 5,551/-
गणपतीपुळे-पावस मार्लेश्वर-डेरवण-रत्नागिरी दर गुरुवारी, इकॉनॉमिक 4,151/- एसी बस, नॉन-एसी रुम 5,551/-
कोल्हापूर-ज्योतिबा नरसोबाची वाडी-पन्हाळा कन्हेरी मठ-बाळू मामासह स्वतंत्र रुम 5,551/- 8, 15, 22 मे, 5 जून
गोवा-गणपतीपुळेसह 5 दिवस, 4, 11, 18, 25 मे, 1, 8 जून एसी बस, नॉन-एसी रुम 7,551/- प्रत्येकी
www.deshpandetours.com

0070961391-13-1

दत्त त्रिमूर्ती टूर्स * तारकर्ली-मालवण- कुणकेश्वर- देवगड * सिमला- कुल्लू- मनाली ५ जून * चारधाम यात्रा १२ जून * वैष्णोदेवी- अमृतसर- शिवखोरी ६ जुलै * लेह- लडाख- पेंगॉग लेक १२/ २० जुलै * (वैयक्तिक टूर्स) म्हैसूर- ऊटी * नैनीताल- मसुरी * दार्जिलिंग- सिक्कीम * महाबळेश्वर- पाचगणी. * 9821756942/ 9702056942.

0070964435-1

## ॲडमिशन

A.S.P.M.
Shri Bapusaheb D. D.Vispute College of Education, New Panvel
NAAC Accredited 2nd Cycle B+ Grade
ADMISSION OPEN 2025-2026
OFFERED COURSES
NATIONAL INSTITUTE OF OPEN SCHOOLING (NIOS) Recognize Study Center - Ministry of Education, Government of India
10th & 12th Arts, Commerce & Science (Open learning Mode) | Medium - Hindi & English
BACHELOR OF EDUCATION (B.ED.) (University of Mumbai) Duration: 2 Year
MASTER OF EDUCATION (M.ED.) (University of Mumbai) Duration: 2 Year
DIPLOMA IN SCHOOL MANAGEMENT (D.S.M.) (YCMOU) Duration: 1 Year
BACHELOR OF LIBRARY INFO. SCIENCE (B.LIB.I.SC.) (YCMOU) Duration: 1 Year
AACHARYA CHANAKYA KAUSHALYA VIKAS KENDRA
NO FEES, LEARN FREE DURATION: 6 MONTHS
1. Domestic Data Entry Operator
2. Guest Service Associate (Front Office)
www.visputeeducation.info
CONTACT FOR INFO.
88793 38833
70217 26246
99217 09207

0070964303-1-1

## शैक्षणिक

सुवर्णसंधी! 1 वर्षात BA व्हा. 10वी/12वी पास- नापासना प्रवेश. सरकारमान्य समकक्ष पदवी. - डॉ. कानडे, बावधन, पुणे (11 ते 5) 9890344036/ 9890976469

0090374605-2

हमखास पास "खर्डीकर क्लासेस" ७वी नापास...? डायरेक्ट १०वी, ११वी नापास...? डायरेक्ट १२वी. रेग्युलर/ डिस्टन्स BA, B.Com., B.Sc. ॲडमिशन सुरू. डोंबिवली- 9820627580/ 9820904646.

0070961433-1

## नावात बदल

I Have Changed My Old Name Kailas Ganpat Nimbalkar to New Name kailas Ganpatrao Nimbalkar as per my Aadhaar card.

0070964287-1

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


## जाहिरात

शासकीय विधि महाविद्यालय, मुंबई येथे "पाच व तीनवर्षीय अभ्यासक्रमांसाठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात घड्याळी तत्त्वावर प्राध्यापक (CHB Professor)" पात्र व अनुभवी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.१०.०५.२०२५ हा आहे. याबाबतची सविस्तर सूचना ही www.glcmumbai.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९.०४.२०२५
स्थळ : मुंबई

डॉ. अस्मिता वैद्य
प्राचार्य

डीजीआयपीआर- २०२५-२६/४१६

**भारत सरकार**
**संरक्षण मंत्रालय**
संरक्षण इस्टेट अधिकारी यांचे कार्यालय
मुंबई सर्कल, कुलाबा,
मुंबई–४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२–२२१५३२३२ (टेलिफॅक्स)

फाईल क्र. जीईएन/नवीन/६४/प्रकल्प/एक्स/९३ दिनांक: २४.०४.२०२५

**ई-लिलाव सूचना**

संरक्षण इस्टेट अधिकारी, मुंबई परिमंडळ, इच्छुक बोलीदारांना दि. १९.०५.२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. ते दुपारी १३.०० वाजेदरम्यान सरकारी ई–लिलाव प्रणालीची वेबसाइट www.eauction.gov.in यावर प्रकल्पाअंतर्गत ३४ उभ्या झाडांची विल्हेवाट लावण्यासाठी मुंबईतील आयएनएस हमला मार्वे मालाड (प.) येथील उच्च सुरक्षा परिमिती भिंतीचे पाडणे आणि पुनर्बांधणी यासाठीच्या ई-लिलावात उपस्थित राहण्याचे आमंत्रण देत आहे. कागदपत्रे सादर करण्याची/देयक भरणे सुरू होण्याची तारीख ०१.०५.२०२५ आहे आणि कागदपत्रे सादर करण्याची/देयक भरण्याची शेवटची तारीख १३.०५.२०२५ आहे. दि. ३०.०४.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता झाडे दाखवली जातील. आवश्यक अटी आणि शर्ती, आवश्यक कागदपत्रांची यादी, ई–लिलाव अर्ज इत्यादी सरकारी ई–लिलाव प्रणालीची वेबसाइट www.eauction.gov.in च्या ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केले जातील किंवा कार्यालयीन वेळेत संरक्षण संपदा कार्यालय, मुंबई सर्कल, कुलाबा मुंबई येथे पाहता/मिळवता येतील.

सही/–
(हर्षा एच.ई., आयडीईएस)
संरक्षण इस्टेट अधिकारी
मुंबई परिमंडळ

**डहाणू नगर परिषद**
दुसरा मजला, कुमार कॉर्नर, मल्याण (प.), ता. डहाणू, जि. पालघर-४०१६०२, दूरध्वनी : ०२५२८-२२४४६२
Web site : www.dahanumc.com Email-dmc.dahanu@gmail.com

जा.क्र./डनप/न.र.वि./२५१/२०२५-२६, दिनांक : २८.०४.२०२५

**शुद्धिपत्रक**

जावक क्र. डनप/न.र.वि./२७४/२०२५-२६, दि. २५.०४.२०२५ अन्वये डहाणू नगर परिषद हद्दीतील ३० वर्षावरील इमारतीचे सर्वेक्षण करून संरचनात्मक परीक्षण (Structural Audit) करून देण्याचे आहे. तरी इच्छुक पदवी/पदव्युत्तर अर्हताधारक (Be Civil with minimum Three year's experience in Structural engineering field or M-Tech/M.E. in structure, with minimum One year experience) यांनी योग्य त्या प्रमाणपत्रासह अर्ज दाखल करण्याच्या दि. २८.०४.२०२५ ते दि. १२.०४.२०२५ ऐवजी दि. २८.०४.२०२५ ते दि. १२.०५.२०२५ असे वाचण्यात यावे.

सही/-
(अक्षय गुडधे)
नियोजन प्राधिकारी
तथा
मुख्याधिकारी
डहाणू नगर परिषद

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा संदर्भ क्र. | एम.जी.सी./एफ/५९६५ दिनांक :- ०१.०४.२०२५ |
| निविदा आय.डी. | 2024 MCGM 1173375 |
| खाते | जल अभियंता खाते |
| उपविभाग | उप जल अभियंता (बांधकामे) |
| विषय | (HE-C-ES-IMP-35)- परिमंडल-५ एम/पूर्व व एम/पश्चिम विभागातील विविध ठिकाणी पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी विविध व्यासांच्या जल वाहिन्या पुरविणे टाकणे आणि बदलणे. (२०२४-२५) |
| निविदा छाननी शुल्क | रु. २७,५०० + १८% जी.एस.टी. |
| कामाची अंदाजित रक्कम | रु. १६,२८,१४,६८५/- |
| इसारा रक्कम (ई.एम.डी.) (अंदाजित रकमेच्या १% रक्कम ऑनलाइन पद्धतीने महाटेंडर पोर्टलवर भरणे) | रु. १६,२८,२००/- |
| ई-निविदेचा विक्री दिनांक व वेळ | दिनांक २९.०५.२०२५ पासून वेळ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ई-निविदा विक्रीचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक २०.०५.२०२५ पर्यंत वेळ दुपारी १६.०० वाजेपर्यंत |
| निविदा पाकीट 'अ', 'ब' आणि 'क' सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ (ऑनलाइन) व इसारा रक्कम पावती | दिनांक २०.०५.२०२५ पर्यंत वेळ दुपारी १६.०० वाजेपर्यंत |
| निविदा पूर्व बैठक | दिनांक ०६.०५.२०२५ रोजी वेळ दुपारी १५.०० वाजता. जल अभियंता यांचे कार्यालय, इंजिनीअरिंग हब बिल्डिंग, पहिला मजला, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८. |
| निविदा पाकीट 'अ' उघडण्याचा दिनांक वेळ | दिनांक २२.०५.२०२५ वेळ दुपारी १२.०० वाजेनंतर |
| निविदा पाकीट 'ब' उघडण्याचा दिनांक वेळ | दिनांक २२.०५.२०२५ वेळ दुपारी १६.०० वाजेनंतर |
| निविदा पाकीट 'क' उघडण्याचा दिनांक वेळ | दिनांक ०३.०६.२०२५ वेळ दुपारी १२.०० वाजेनंतर |
| संपर्क अधिकारी | श्री. राजेंद्र रुपचंद बर्वे, कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) पु.उ. |
| दुरध्वनी (कार्यालयीन) | (०२२) २५१३२६३९ |
| मोबाइल क्रमांक | ८७७९२९४०९४ |
| ई-मेल पत्ता | eewwconstes.he@mcgm.gov.in |
| संकेतस्थळ | https://mahatenders.gov.in |
| संपर्क कार्यालय आणि निविदा उघडण्याचे ठिकाण | कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय, १ला माळा, लालबहादूर शास्त्री मार्ग, कामा लेन, ए.ई.ओ.सी. यार्ड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०००८६, २५१३२६३९. |
| सदर निविदा दस्ताऐवज अहस्तांतरणीय आहे. | |
| कुठलाही निविदा अर्ज स्वीकारण्याचा किंवा कुठलाही अर्ज नाकारण्याचा किंवा उपरोक्त संदर्भाधीन विषयाबाबतचे सर्व निविदा अर्ज कुठलेही कारण नमूद न करता नाकारण्याचा अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राखीव राहील. | |

पीआरओ/ २४७/एडीव्ही/ २०२५-२६

सही/-
जल अभियंता

आठवड्याचा एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळा.

# सूर्यवंशीचा शतकी झंझावात

## राजस्थान रॉयल्सचा गुजरात टायटन्सवर एकतर्फी विजय

वृत्तसंस्था, जयपूर

**युवा फलंदाज** वैभव सूर्यवंशीच्या (३८ चेंडूंत १०१ धावा) शतकी झंझावातामुळे राजस्थान रॉयल्स संघाने सोमवारी झालेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यात गुजरात टायटन्स संघावर आठ गडी व २५ चेंडू राखून एकतर्फी विजय मिळवला.

गुजरातने दिलेल्या २१० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या राजस्थान संघाने आक्रमक सुरुवात केली. सलामीवीर यशस्वी जैस्वाल (४० चेंडूंत ७० धावा) व १४ वर्षीय सूर्यवंशीने गुजरातच्या गोलंदाजांना स्थिरावू दिले नाही. यशस्वीने सूर्यवंशीला खेळण्यास प्रोत्साहन अधिकाधिक स्ट्राईक देण्याचा प्रयत्न केला. सूर्यवंशीनेही या संधीचा फायदा घेत मैदानाच्या चौफेर फटकेबाजी केली. मोहम्मद सिराज, ईशांत शर्मा, प्रसिध कृष्णा व वॉशिंग्टन सुंदरसारख्या भारताचे प्रतिनिधित्व केलेल्या गोलंदाजांना सूर्यवंशीने आपल्या खेळीदरम्यान दबावाखाली ठेवले. त्याने अवघ्या ३५ चेंडूंत आपले शतक पूर्ण करीत सर्वांचे लक्ष वेधले. यानंतर कृष्णाने त्याला बाद करीत गुजरातचा अडसर दूर केला. मात्र, तोवर उशीर झाला होता. या डावखुऱ्या फलंदाजाने आपल्या खेळीदरम्यान तब्बल ११ षटकार व सात चौकार लगावले. यशस्वी व सूर्यवंशी यांनी पहिल्या गड्यासाठी १६६ धावांची भागीदारी रचली. यानंतर मैदानात आलेला नितीश राणा (४) माघारी परतला. मग, रियान परागने (नाबाद ३५) जैस्वालच्या साथीत संघाला १५.५ षटकांत २ बाद २१२ धावांपर्यंत पोहोचवत विजय मिळवून दिला.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या गुजरात संघाने कर्णधार शुभमन गिल (८४) व जोस बटलरच्या (नाबाद ५०) खेळाच्या जोरावर २० षटकांत ४ बाद २०९ धावसंख्येपर्यंत मजल मारली. सलामीवीर साई सुदर्शन (३९) व गिल यांनी पहिल्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी रचली. गिल बाद झाल्यानंतर बटलरने सूत्रे आपल्या हातात घेत संघाच्या धावसंख्येत भर घालणे सुरुच ठेवले. गिलने आपल्या खेळीत पाच चौकार व चार षटकार लगावले. राजस्थानकडून महीश थिकसाना (२/३५) याने चांगली गोलंदाजी केली.



### गुणतालिका

| संघ | सा. | वि. | प. | रद्द | गुण | नि. धा. |
|---|---|---|---|---|---|---|
| बंगळूरु | १० | ७ | ३ | - | १४ | ०.५२१ |
| मुंबई | १० | ६ | ४ | - | १२ | ०.८८९ |
| गुजरात | ९ | ६ | ३ | - | १२ | ०.७४८ |
| दिल्ली | ९ | ६ | ३ | - | १२ | ०.४८२ |
| पंजाब | ९ | ५ | ३ | १ | ११ | ०.१७७ |
| लखनऊ | १० | ५ | ५ | - | १० | -०.३२५ |
| कोलकाता | ९ | ३ | ५ | १ | ७ | ०.२१२ |
| राजस्थान | १० | ३ | ७ | - | ६ | -०.३४९ |
| हैदराबाद | ९ | ३ | ६ | - | ६ | -१.१०३ |
| चेन्नई | ९ | २ | ७ | - | ४ | -१.३०२ |

(सा = सामने, वि = विजय, प = पराभव, नि. धा. = निव्वळ धावगती)

### ‘आयपीएल’मधील सर्वात युवा शतकवीर

बिहारच्या वैभव सूर्यवंशीने (१४ वर्ष ३२ दिवस) ‘आयपीएल’मध्ये इतिहास रचताना शतक झळकावणारा सर्वात युवा क्रिकेटपटू ठरला. त्याने अवघ्या ३५ चेंडूत शतक झळकावले. ‘आयपीएल’मधील हे दुसरे सर्वात जलद शतक ठरले. ‘आयपीएल’च्या सर्वात वेगवान शतकांचा विक्रम वेस्ट इंडिजचा माजी फलंदाज ख्रिस गेलच्या नावे आहे. त्याने २०१३ मध्ये पुणे वॉरियर्सविरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुकडून खेळताना ३० चेंडूत शतक झळकावले होते. युसूफ पठानने २०१० मध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध राजस्थान रॉयल्ससाठी ३७ चेंडूंत शतकी खेळी केली होती.

### संक्षिप्त धावफलक

गुजरात टायटन्स : २० षटकांत ४ बाद २०९ (शुभमन गिल ८४, जोस बटलर नाबाद ५०, साई सुदर्शन ३९; महीश थिकसाना २/३५)
पराभूत वि. राजस्थान रॉयल्स : १५.५ षटकांत २ बाद २१२ (वैभव सूर्यवंशी १०१, यशस्वी जैस्वाल नाबाद ७०, रियान पराग नाबाद ३२; रशीद खान १/२४).

## ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्येही भागीदारी महत्त्वाची -कोहली

**नवी दिल्ली :** भारताचा मधल्या फळीतला फलंदाज माजी कर्णधार विराट कोहलीने ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये भागीदारीचे महत्त्व विसरत चालल्याबद्दल खंत व्यक्त केली. एखाद्या भागीदारीशिवाय संघाचा डाव उभा राहू शकत नाही, असे कोहली म्हणाला.

ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये आक्रमक फलंदाजीला महत्त्व असले, तरी भागीदारीचे महत्त्व विसरून चालणार नाही. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध विराट कोहली आणि कृणाल पंड्या यांच्यामध्ये चौथ्या गड्यासाठी झालेली ११९ धावांची भागीदारी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या विजयात निर्णायक ठरली. बंगळूरु संघ ३ बाद २६ अशा अडचणीत आल्यानंतर या जोडीच्या भागीदारीने बंगळूरु संघाने विजय नोंदवला.

‘‘क्रिकेटमध्ये लोक भागीदारीचे महत्त्व विसरू लागले आहेत. पण, एकेरी-दुहेरी धावा काढून धावफलक हलता ठेवत डाव सुरू राहील याची खात्री करतो आणि नंतर खेळात बदल करतो. कृणालनेही चांगली फलंदाजी केली. मी एका बाजूवर ठाम असताना दुसऱ्या बाजूने त्याने प्रसंगानुरूप चांगले स्वातंत्र्य घेत फटके मारले,’’ असेही कोहलीने सांगितले.

## आर्सेनलसमोर सेंट-जर्मेनचे आव्हान

### चॅम्पियन्स लीगच्या उपांत्य लढतींचा थरार आजपासून

एपी, लंडन

**यंदाच्या चॅम्पियन्स** लीग फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीसाठी आर्सेनल विरुद्ध पॅरिस सेंट-जर्मेन आणि बार्सिलोना विरुद्ध इंटर मिलान हे संघ मैदानात उतरतील तेव्हा ऐतिहासिक आठवणींना उजाळा मिळेल यात शंका नाही. उपांत्य फेरीचे परतीचे सामने हे ७ व ८ मे रोजी होतील. तर, अंतिम सामना १ जूनला पार पडेल.

पंधरा वर्षांपूर्वी बार्सिलोना आणि इंटर मिलान यांच्यात सामना झाला होता. तेव्हा बार्सिलोनाचा आजचा प्रमुख खेळाडू लामिने यमाल तीन वर्षांचा होता आणि लिओनेल मेसी हा यशाच्या शिखराजवळ पोहचला होता. आता पुन्हा एकदा हे दोन संघ चॅम्पियन्स लीगच्या उपांत्य फेरीत एकमेकांसमोर येत आहे. दोन्ही संघांतील गुणवत्ता सारखीच आणि दोघांचेही उद्दिष्ट विजयाचे त्यामुळे एक सर्वोत्तम सामना बघायला मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बार्सिलोना संघ २०१८-१९च्या हंगामानंतर प्रथमच चॅम्पियन्स लीगच्या उपांत्य फेरीपर्यंत पोहचला आहे. सर्वोत्तम आक्रमण हे या नव्या संघाचे वैशिष्ट्य असून, तीच त्यांची नवी ओळख बनली आहे. यमाल, राफिन्हा, लेवांडोवस्की असे प्रमुख आक्रमक सध्या चांगले भरात आहेत. बार्सिलोना संघाने आठ सामन्यांत २८ गोल केले आणि बाद फेरीत बेन्फिका व बोरुसिया डॉर्टमंड यांना नमवताना आणखी नऊ गोल केले.

बार्सिलोनाचा प्रतिस्पर्धी इंटर मिलानही तगडा संघ आहे. यंदाच्या स्पर्धेत पहिल्या टप्प्यात आठ सामन्यांपैकी त्यांनी केवळ एका सामन्यात पराभव पत्करला आहे. इंटरने यापूर्वी २०१० मध्ये बार्सिलोनालाच हरवून आपली आगेकूच कायम राखली आणि अंतिम सामन्यात बायर्न म्युनिकवर विजय मिळवून तिसरे विजेतेपद मिळवले होते. तीच कामगिरी आता या संघासाठी एक प्रेरक म्हणून मानली जात आहे.





### पॅरिस सेंट-जर्मेनचा कस

आर्सेनल आणि पॅरिस सेंट-जर्मेन हा सामना दोन नव्या संघातील वाटतो. हे दोन्ही संघ चॅम्पियन्स लीगमध्ये आतापर्यंत केवळ तीन वेळा एकमेकांसमोर आले आहेत. विशेष म्हणजे तीनही सामने साखळीतील होती. बाद फेरीत प्रथमच हे दोन संघ समोरासमोर येत आहेत. आर्सेनलने उपांत्यपूर्व फेरीत दोन्ही सामन्यांत रेयाल माद्रिदवर विजय मिळवून आपली चमक दाखवली आहे. हीच कामगिरी पुढे कायम राखण्यासाठी आर्सेनल निश्चित उत्सुक असेल. त्याच वेळी प्रतिस्पर्धी सेंट-जर्मेन संघ लागोपाठ दुसऱ्या इंग्लिश प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविण्यासाठी सज्ज आहे. दोन्ही संघांना प्रथमच युरोपियन चॅम्पियन बनण्याचा ध्यास आहे, त्यामुळे पुढे जाण्यासाठी दोन्ही संघ सर्वोत्तम प्रयत्न करतील.

## भारतीय महिला संघाची दक्षिण आफ्रिकेशी गाठ

**कोलंबो :** श्रीलंकेविरुद्ध एकतर्फी विजय मिळवल्यानंतर भारतीय महिला संघ मंगळवारी तिरंगी क्रिकेट मालिकेतील आपल्या दुसऱ्या लढतीत दक्षिण आफ्रिकेचा सामना करेल. या सामन्यात भारताचा प्रयत्न आपली विजयी लय कायम राखण्याचा असेल.



भारताने श्रीलंकेचा नऊ गडी राखून पराभव करत एकदिवसीय सामन्यांमध्ये सलग सातव्या विजयाची नोंद केली. या सामन्यात संघाने तिन्ही विभागांत चमकदार कामगिरी केली. स्नेह राणा, दीप्ती शर्मा आणि श्री चरणी यांनी श्रीलंकेला कमी धावसंख्येवर रोखले, तर प्रतिका रावल, स्मृती मनधाना आणि हरलीन देओल यांनी फलंदाजीत योगदान दिले. संघाच्या क्षेत्ररक्षकांनीही यादरम्यान चमकदार कामगिरी केली. भारतीय संघ या प्रारूपात मार्च २०२२ पासून दक्षिण आफ्रिकेकडून पराभूत झालेला नाही.

- वेळ : सकाळी १० वा.
- थेट प्रक्षेपण : फॅनकोड ॲप.

## चेंबूर क्रीडा केंद्र, होतकरू मित्र मंडळ संघांचे विजय

**ठाणे :** श्री मावळी मंडळ संस्थेच्या वतीने आयोजित ७२ व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत महिला गटात ओम वर्तक नगर स्पोर्ट्स क्लब, होतकरू मित्र मंडळ संघांनी विजय मिळवले तर, पुरुष गटात चेंबूर क्रीडा केंद्र, शिवशंकर क्रीडा मंडळ आणि वीर परशुराम कबड्डी संघांनी आपली आगेकूच कायम राखली.

महिला गटातील पहिल्या सामन्यात ठाण्याच्या ओम वर्तक नगर स्पोर्ट्स क्लब संघाने मुंबई उपनगरच्या स्वराज्य स्पोर्ट्स क्लब संघाचा अतिशय अटीतटीच्या झालेल्या सामन्यात ४०-३४ असा सहा गुणांनी पराभव केला. याच गटातील दुसऱ्या सामन्यात ठाण्याच्या होतकरू मित्र मंडळाने चिपळूणच्या स्वराज्य स्पोर्ट्स अकादमी संघाचा ३१-२१ असा १० गुणांनी पराभव केला.

पुरुष गटातील सामन्यात मुंबई उपनगरच्या चेंबूर क्रीडा केंद्र संघाने ठाण्याच्या आत्माराम क्रीडा मंडळाचा ३२-२२ असा १० गुणांनी पराभव करीत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या सामन्यात मुंबई उपनगरच्या वीर पशुराम कबड्डी संघाने ठाण्याच्या उजाला क्रीडा मंडळाचा २६-२४ असा दोन गुणांनी पराभव केला.

## अरविंद चिदम्बरम तिसऱ्या स्थानी

**वारसॉ:** भारताच्या अरविंद चिदम्बरम ग्रँड बुद्धिबळ दौऱ्यात पदार्पण करताना दुसऱ्याच दिवशी माजी जागतिक विजेत्या बुल्गारियाच्या वेस्लिन टोपालोवला नमविले. तर, अन्य दोन डाव बरोबरीत सोडवत सुपरबेट जलद आणि अतिजलद स्पर्धेत तिसऱ्या स्थानावर आहे.

अरविंदने टोपालोवविरुद्ध काळ्या मोहऱ्यांसह खेळताना विजय मिळवला. फ्रान्सचा अलिरेझा फिरूझा आणि रशीयाचा व्लादिमिर फेदोसीव हे दोघेही आठ गुणांसह संयुक्तपणे शीर्षस्थानी आहे. अरविंदचे सात गुण आहेत. अमेरिकेचा लेव्हॉन ॲरोनियन, रोमानियाचा डियाक बोगडन डियानेल आणि पोलंडचा यान-क्रिस्टोफ डुडा सहा गुणांसह संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे. भारताचा आर. प्रज्ञानंद, फ्रान्सचा मॅक्सिम-व्हॅचिएर लाग्रेव आणि रोमानियाचा डेव्हिड गेवरिलेस्क्यू यांचे पाच गुण आहेत. जलद गटाच्या तीन फेऱ्या शिल्लक असून टोपालोव चार गुणांसह अखेरच्या स्थानी आहे.

## भारताचे २१ बॉक्सिंगपटू अंतिम फेरीत

**अम्मान (जॉर्डन) :** कुमार आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपली आगेकूच कायम राखली असून, सोमवारी १७ वर्षांखालील गटातून सहा मुली आणि एका मुलाने अंतिम फेरी गाठली. भारताची या स्पर्धेत ४३ पदके निश्चित असून, यातील २१ खेळाडू सुवर्णपदकासाठी लढणार आहेत.

अहाना शर्मा (५० किलो) हिने किर्गिझस्तानच्या अकमरल अमानताइवावर पहिल्याच फेरीत विजय मिळवला. अहानाच्या ठोशांनी निष्प्रभ झालेली अकमरल काही मिनिटांतच गारद झाली.


**जाहीर प्रकटन**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, शिवाजीनगर, पुणे- ४११००५ या संस्थेची सन २०२५ ते २०३० करिता संचालक मंडळ निवडणूक मतदान केंद्र जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, शिवाजीनगर, पुणे-४११००५ या संस्थेच्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२४-२५ ते २०२९-३० निवडणूकी करिताचे मतदान दिनांक ०३.०५.२०२५ रोजी सकाळी ९.०० ते सायं. ४.०० वा. या वेळेत घेण्यात येणार असून सदर संस्थेचे मतदान घेण्यासाठी ०४ मतदान केंद्र निश्चित केलेली आहेत. सबब या जाहिर प्रकटनाव्दारे संस्थेच्या अंतिम मतदार यादीतील सर्व मतदारांना कळविण्यात येते की, त्यांना ज्या मतदान केंद्रावर मतदान करता येणार आहे. त्याची मतदार संख्या निहाय व मतदान केंद्रनिहाय यादी खालील तक्त्यात नमूद केलेली असून त्यांनी खालील नमूद मतदान केंद्रावर मतदान करावे.

| मतदान केंद्र क्र. | जिल्हा | ज्या इमारतीमध्ये मतदान केंद्र आहे त्या इमारतीचे नाव | मतदान केंद्रा अंतर्गत येणाऱ्या समाविष्ट गावांची नावे | मतदान केंद्रावरील एकूण मतदार संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | एस.एस. सी बोर्ड पुणे विभागीय मंडळ कार्यालय, शिवाजीनगर, पुणे | एस.एस. सी बोर्ड पुणे विभागीय मंडळ कार्यालय, शिवाजीनगर, पुणे राज्य मंडळ व पुणे विभागीय मंडळ | १२४ |
| २ | नाशिक | एस.एस. सी बोर्ड नाशिक विभागीय मंडळ कार्यालय | एस.एस. सी बोर्ड नाशिक विभागीय मंडळ कार्यालय, आडगाव, नाशिक | ४९ |
| ३ | कोल्हापूर | एस.एस. सी बोर्ड कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालय | एस.एस. सी बोर्ड कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालय, राजेंद्रनगर, कोल्हापूर, कोकण व कोल्हापूर | ४७ |
| ४ | मुंबई | एस.एस. सी बोर्ड मुंबई विभागीय मंडळ कार्यालय, नवी मुंबई | एस.एस. सी बोर्ड मुंबई विभागीय मंडळ कार्यालय, नवी मुंबई, वाशी मुंबई | ८६ |

**टिप** - मतदाराने मतदान केंद्रावर आपली ओळख पटविण्यासाठी मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी निश्चित केलेली १ ते १७ पैकी एक फोटो ओळखपत्र सादर करणे आवश्यक असून ओळखपत्रांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, कारखान्याच्या नोटीस बोर्डावर पहाणेसाठी उपलब्ध आहे. मतमोजणी दिनांकः ०४/०५/२०२५ मतमोजणी वेळः सकाळी ९.०० ते मतमोजणी संपेपर्यंत मतमोजणी ठिकाणः एस.एस. सी बोर्ड पुणे विभागीय मंडळ कार्यालय, शिवाजीनगर, पुणे

सही/-
**(बी. एल. साबळे) निवडणूक निर्णय अधिकारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, शिवाजीनगर, पुणे-०५**

**NASHIK HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD**
**(MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY)** म्हाडा MHADA

Executive Engineer/N.H.A.D.B/MHADA invites digitally signed & unconditional online Tenders from prospective Bidders for the following works.

| E-Tender Notice No. | Name of Work | Estimated cost of the work | Floors |
|---|---|---|---|
| 05 of 2025-26 | Construction of 138 T/s LIG & 31 Shops on S.No. 105/2, Chunchale, Nashik | ₹24,48,64,152/- | G+6 |
| 06 of 2025-26 | Construction of 10 T/s LIG & 20T/s MIG on Land with S.No. 44/6/2, Panchak, Nashik | ₹8,51,41,743/- | G+5 |
| 07 of 2025-26 | Construction of 14 T/s LIG I & 14 T/s LIG II on S.No. 203/A, Mhasrul, Nashik. (2nd Call) | ₹5,56,11,352/- | G+7 |
| 08 of 2025-26 | M & R office building, Griha Nirman Bhavan, Gadkari Chowk, Nashik. Proposed Lift Structure & Electric Meter Room. (2nd Call) | ₹15,12,319/- | - |
| 09 of 2025-26 | Supplying, Erecting, Testing and Commissioning of Lift for Grihnirman bhavan office building, Gadkari Chowk Nashik (MHADA office) (G+4 Floor) | ₹ 16,51,812/- | - |

Detailed information of downloading and uploading are available on https://mahatenders.gov.inandhttps://www.mhada.gov.in/en/tenders For any information & help for the uploading & downloading e-Tender, the bidder may contact 180030702232 or contact 0253-2229248 for any online Technical problem in Office timings.

**Executive Engineer**
**Nashik Housing & Area Development Board**
**Nashik Division**

IDBI BANK

**आयडीबीआय बँक लिमिटेड**
सीआयएन: L65190MH2004GOI148838
नोंदणीकृत कार्यालय-आयडीबीआय टॉवर, डब्ल्यूटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई-४०००५, दूरध्वनी:(०२२) ६६५५३४०६ / ६६५५३४०७ ईमेल आयडी: idbiequity@idbi.co.in / वेबसाइट: www.idbibank.in

**३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरीक्षित आर्थिक निकाल**

आयडीबीआय बँक लिमिटेडच्या लेखापरीक्षण समितीच्या शिफारशींच्या आधारे, संचालक मंडळाच्या २८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीत, सेबी (एलओडीआर) नियमावली, २०१५ च्या नियम ३३ नुसार ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी बँकेचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल (स्वतंत्र आणि एकत्रित दोन्ही) मंजूर केले आहेत.

वरील आर्थिक निकाल ऑडिटर्सच्या अहवालासह बँकेच्या वेबसाइटवर https://www.idbibank.in/pdf/financialresulats/Financial-Results-March-2025.pdf वर उपलब्ध आहेत तसेच खाली दिलेला क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करून देखील ते पाहता येतील :

स्थान: मुंबई
तारीख: २८ एप्रिल २०२५

आयडीबीआय बँक लिमिटेडसाठी
ज्योती बिजू नायर
कंपनी सचिव

कॅनरा बँक
भारत सरकारचा उपक्रम
Canara Bank
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

वसुली आणि कायदेशीर विभाग: मुंबई दक्षिण प्रादेशिक कार्यालय, कॅनरा बँक, कफ परेड, मेकर टॉवर, ई विंग, १४ वा मजला, मुंबई मेल: rorecoverymums@canarabank.com वेबसाइट: www.canarabank.com

**स्थावर मालमत्तेची विक्री**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) ची तरतुद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

सूचना याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेची, ज्याचा ताबा कॅनरा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती **दि. ३०.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी १.३० वाजेपर्यंत** ऑनलाइन ई-लिलावाद्वारे, खाली नमूद केलेल्या आमच्या विविध शाखांमधून देय रकमेच्या वसुलीसाठी ‘‘जसे आहे, जिथे आहे’’ आणि ‘‘जसे आहे, जे आहे’’ या तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

इसारा ठेव अनामत दि. २९.०५.२०२५ रोजी किंवा **त्यापूर्वी, दुपारी ४.०० वाजेपर्यंत** जमा केले जाईल. दि. २९.०५.२०२५ रोजी किंवा **त्यापूर्वी सायं. ५.०० वाजेपर्यंत** सेवा प्रदात्याकडे सादर करावयाच्या ईएमडी आणि इतर कागदपत्रांची माहिती. **दि. २८.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत** अधिकृत अधिकाऱ्याची पूर्व अपॉइंटमेंट घेऊन मालमत्तेची तपासणी करता येईल.

| अ. क्र. | कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणाऱ्यांचे नाव | थकबाकी | सुरक्षिततेचे तपशील/ क्षेत्रफळ चौ. फूटात (ताब्याची स्थिती) | आरक्षित किंमत (आर.पी.) / इसारा ठेव अनामत (ईएमडी) | कॅनरा बँक खात्याची माहिती / शाखेचे नाव आणि संपर्क तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार- मेसर्स गोल्डिस एंटरप्रायझेस मालकः श्री. पराग वामन राऊत जामीनदारः श्रीमती नंदा डब्ल्यू. राऊत गहाण ठेवणारेः श्रीमती नंदा डब्ल्यू. राऊत** | रु. ३३,३०,४५३.१७ (रुपये तेहतीस लाख तीस हजार चारशे त्रेपन्न आणि सतरा पैसे फक्त) **दि. ३१.१०.२०२४** रोजीनुसार अद्ययावत व्याज आणि इतर देय शुल्कांसहित. | फ्लॅट क्र. २०, २रा मजला बी विंग, इमारतीचे नावः साधना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट क्र. ८२-८३, टीपीएस- ६, सीटीएस क्र. १६१०/११, विलेपार्ले, दौलतनगर, रिलीफ रोड, दिवंगत रवींद्र म्हात्रे चौकाजवळ, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र- ४०००५४. मालमत्तेच्या चतुःसीमा: **उत्तर**: शायनिंग स्टार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.; **दक्षिण**: साने गुरुजी रोड; **पूर्व**: चाळ; **पश्चिम**: सी विंग. सेरसाई सिक्यु. इंट. आयडी: ४००००५४८८१३४; मालमत्ता आयडी: २००००५४८०७९५ **मालमत्ता धारकाचे नावः श्रीमती नंदा डब्ल्यू राऊत क्षेत्रफळः ४९८ चौ. फूट चटई क्षेत्र (किंवा) ५७६ चौ. फूट बीयूए** (ताबा प्रतिकात्मक) | रु. १,५९,००,०००/- रु. १५,९०,०००/- | **कॅनरा बँक सांताक्रूझ पश्चिम II शाखा खाते क्र. २०९२७२४३४, आयएफएससी कोडः सीएनआरबी००१५०६०/ कॅनरा बँक व्यवस्थापक सांताक्रूझ पश्चिम II** ८६५५९६३३१२/ ८८४७८२०६४०/ ९४९१४५७३९१ |
| २ | **कर्जदारः मेसर्स एव्हसॉन अलायन्स इंक. त्यांच्या मालकी हक्काच्या माध्यमातून, श्री प्रसन्न करुणाकर शेट्टी, जामीनदारः श्री प्रसन्न कुमार शेट्टी आणि श्री विरींद्र मालोनी गहाण ठेवणारेः श्री. विरींद्र मालोनी, मेसर्स कोकोनट बे एक्सपोर्ट यांचे मालक** | रु. ३,५५,७९,२५२.३२ (रुपये तीन कोटी पंचावन्न लाख एकोणऐंशी हजार दोनशे बावन्न आणि बत्तीस पैसे फक्त) **दि. ३०.०९.२०२४** रोजीनुसार अद्ययावत व्याज आणि इतर देय शुल्कांसहित. | औद्योगिक गाला क्र. २०८, २रा मजला, इमारत क्र. ए ते झेड, औद्योगिक परिसर सहकारी संस्था मर्यादित, फर्ग्युसन रोड, लोअर परळ, मुंबई ४०००१३ दस्तऐवजीकृत बिल्ट-अप क्षेत्र १०८० चौरस फूट + ४३२ चौरस फूट (मेझानाइन क्षेत्राच्या ४०%), म्हणजेच एकूण बिल्ट-अप क्षेत्र १५१२.०० चौरस फूट, मेसर्स कोकोनट बे एक्सपोर्ट यांचे मालक श्री. विरींद्र मालोनी यांच्या नावावर नोंदवलेले. खालीलप्रमाणे सीमाबद्धः **उत्तर**: ए ते झेड गेट क्र. ६; **दक्षिण**: ए ते झेड गेट क्र. १; **पूर्व**: पिरामल टॉवर; **पश्चिम**: ए ते झेड गेट क्र. ४ सेरसाई सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी- ४०००६७६५५२४५; सेरसाई ॲसेट आयडी- २०००६८७१८३६२ **मालकाचे नावः श्री. विरींद्र मालोनी, मेसर्स कोकोनट बे एक्सपोर्ट यांचे मालक क्षेत्रफळः बांधकाम क्षेत्र १०८० चौरस फूट + ४३२ चौरस फूट (मेझानाइन क्षेत्राच्या ४०%), म्हणजेच एकूण बिल्ट अप क्षेत्र १५१२.०० चौरस फूट** (ताबा प्रतिकात्मक) | रु. ३,६२,८८,०००/- रु. ३६,२८,८००/- | कॅनरा बँक मुंबई वरळी शाखा खाता क्र. २०९२७२४३४, आयएफएससी कोडः सीएनआरबी०००११३/ व्यवस्थापक कॅनरा बँक मुंबई वरळी शाखा ८६५५९६३१७५ /९०६५५१६५८५/ ८२१०९३९०९२/ ९४९१४५७३९१ |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://baanknet.in/ द्वारे प्रदान केलेल्या ई-लिलावाच्या लिंकचा संदर्भ घ्या. **ए.** लिलाव/बोली फक्त **https://baanknet.in/** या वेबसाइटद्वारे "ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक बोली"द्वारेच घेतली जाईल. ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी बोलीदारांना तपशीलवार अटींसाठी वेबसाइट पाहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. **बी.** विक्री सूचनेत नमूद केलेल्या तारखांना अधिकृत अधिकाऱ्यांची पूर्व भेट घेऊन मालमत्तेची तपासणी करता येते. **सी.** मालमत्ता अशा किमतीला विकली जाईल, जी आरक्षित किमतीपेक्षा जास्त असेल, आणि सहभागी बोलीदार लिलाव प्रक्रियेदरम्यान त्यांच्या प्रस्तावामध्ये आणखी सुधारणा करू शकतात, **अ. क्र. १ साठी रु.१०,०००/- आणि अ. क्र. २ साठी रु.३०,०००/-** च्या पटीत. **डी.** आरक्षित किमतीच्या १०% ईएमडी रक्कम अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, शाखेच्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करायची आहे किंवा **दि. २९.०५.२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी आरटीजीएस / एनईएफटी / निधी हस्तांतरणाद्वारे कॅनरा बँकेच्या खात्यात जमा करावी लागेल. **दि. २९.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी सेवा प्रदात्याकडे सादर करावयाच्या ईएमडी आणि इतर कागदपत्रांची माहिती. **ई.** ईएमडी रक्कम भरल्यानंतर, इच्छुक बोलीदारांनी खालील कागदपत्रांची/ तपशीलांची एक प्रत **दि. २९.०५.२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** कॅनरा बँकेच्या शाखेत व्यक्तीशः किंवा ईमेलद्वारे सादर करावी. **१.** ईएमडी रकमेसाठी डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर. जर आरटीजीएस/एनईएफटीद्वारे पैसे भरले असतील तर त्याची पोचपावती यूटीआर क्रमांकासह. २. पॅन कार्ड, ओळखपत्राच्या प्रती. तथापि, यशस्वी बोलीदाराने ही कागदपत्रे बोलीच्या रकमेच्या २५% शिल्लक रकमेचा भरणा करताना बँकेकडे मूळ स्वरूपात सादर केली पाहिजेत. **एफ.** इच्छुक बोलीदारांनी **मेसर्स पीएसबी अलायन्स (BAANKNET) https://baanknet.in/** या पोर्टलवर त्यांची नावे नोंदणी करावीत आणि त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवावा. संभाव्य बोलीदार मेसर्स पीएसबी अलायन्स (BAANKNET) या सेवा प्रदात्याकडून ई-लिलावाबाबत ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. संपर्क क्र. ८२९१२२०२२०, support.baanknet@psballiance.com; https://baanknet.in/. **जी.** अयशस्वी बोलीदाराने जमा केलेला ईएमडी त्यांना बोली प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २४ तासांनंतर आणि कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत परत केला जाईल. ईएमडीवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. **एच.** वर नमूद केल्याप्रमाणे लिलाव आरक्षित किमतीने सुरू होईल. बोलीदारांना त्यांच्या प्रस्ताव **अ. क्र. १ साठी रु. १०,०००/- आणि अ. क्र. २ साठी रु.३०,०००/-** च्या पटीत सुधाराव्या लागतील. ‘ऑनलाइन’ लिलाव बंद झाल्यावर सर्वाधिक बोली (आरक्षित किमतीपेक्षा जास्त) सादर करणाऱ्या बोलीला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले जाईल. यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्री निश्चित केली जाईल, सुरक्षित धनकोने त्याची पुष्टी केल्यानंतर. **आय.** यशस्वी बोलीदाराने यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केल्यानंतर लगेचच विक्री किमतीच्या २५% (आधीच भरलेल्या ईएमडीसह) आणि सुरक्षित धनकोने विक्रीची पुष्टी केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत उर्वरित रक्कम जमा करावी. जर यशस्वी बोलीदाराने विक्री किमतीची रक्कम भरली नाही, तर त्याने केलेली ठेव अधिकृत अधिकारी कोणत्याही विक्री किमतीशिवाय जप्त करेल, त्याने केलेली ठेव अधिकृत अधिकारी कोणत्याही सूचनेशिवाय जप्त करेल आणि मालमत्ता त्वरित पुन्हा विक्रीसाठी ठेवली जाईल. **जे.** रु.५०.०० लाख (रुपये पन्नास लाख फक्त) आणि त्याहून अधिक विक्री रकमेसाठी, यशस्वी बोलीदाराला विक्री रकमेवर १% दराने टीडीएस कापून बँकेच्या टीडीएस प्रमाणपत्राची मूळ पावती सादर करावी लागेल. **के.** वाहतुकीचे सर्व शुल्क, मुद्रांक शुल्क/जीएसटी नोंदणी शुल्क, इत्यादी, जसे लागू आहे, फक्त यशस्वी बोलीदारानेच वहन केले जातील. **एल.** बँकेच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. यशस्वी बोलीदाराला सर्व सोसायटी देणी, नगरपालिका कर/पंचायत कर/वीज/पाणी शुल्क/इतर शुल्क, शुल्क आणि कर भरावे लागतील, ज्यामध्ये विषय मालमत्तेच्या संदर्भात आणि/किंवा प्रभावित करणारे थकबाकी असल्यास, समाविष्ट आहे. **एम.** अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता ई-लिलाव पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा किंवा अटी आणि शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवतात. **एन.** जर असे बोलीदार असतील ज्यांना इंटरनेटची सुविधा नाही परंतु ई-लिलावात सहभागी होण्यास इच्छुक असतील, तर ते कॅनरा बँक, मुंबई सर्कल ऑफिस किंवा प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क साधू शकतात, जे एक सुविधा केंद्र म्हणून आवश्यक व्यवस्था करतील. **ओ.** अधिक माहितीसाठी, कॅनरा बँक, वसुली आणि कायदेशीर विभाग, २रा मजला, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, सर्कल ऑफिस, मुंबई यांच्याशी संपर्क साधा. संपर्क क्र. ०२२-२६७२८४३२ आणि कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत किंवा सेवा प्रदात्या, मेसर्स पीएसबी अलायन्स (BAANKNET) यांच्याशी संपर्क साधता येईल., संपर्क क्र. ८२९१२२०२२०, support.baanknet@psballiance.com; https://baanknet.in/

दिनांकः २९.०४.२०२५
ठिकाणः मुंबई

सही/-
अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

# फलंदाजीत सुधारणा अपेक्षित!

## दिल्ली कॅपिटल्स - कोलकाता नाइट रायडर्स आज एकमेकांसमोर

**नवी दिल्ली :** दिल्ली कॅपिटल्स संघासमोर इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सचे आव्हान असणार आहे. यावेळी दिल्लीचा प्रयत्न सामन्याच्या मधल्या षटकांत फलंदाजांची कामगिरी उंचावण्यावर असेल.

दिल्लीला गेल्या चारपैकी दोन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. यामध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुकडून मिळालेल्या पराभवाचाही समावेश आहे. त्यामुळे 'प्लेऑफ'मधील आपले स्थान निश्चित करायचे झाल्यास आगामी सामन्यांमध्ये कामगिरी उंचवावी लागेल. दुसरीकडे, कोलकाताचे केवळ सात गुण आहेत. कोलकाताला गेल्या तीन सामन्यांत विजय मिळवता आलेला नाही व यातील एक सामना रद्द झाला. त्यामुळे दिल्लीविरुद्ध त्यांना विजय मिळवण्याशिवाय पर्याय नाही. या सामन्यात पराभूत झाल्यास त्यांची 'प्लेऑफ'मध्ये पोहोचण्याची वाट आणखी बिकट होईल. दिल्लीसाठी अभिषेक पोरेलने आक्रमक फलंदाजी केली आहे. मात्र, पुनरागमन करणाऱ्या फॅफ ड्युप्लेसिसला धिम्या खेळपट्टीवर अडचण निर्माण झाली. केएल राहुल सध्याच्या हंगामात दिल्लीसाठी सर्वात यशस्वी फलंदाज राहिला आहे. मात्र, बंगळूरुविरुद्ध त्याला फिरकीपटूंविरुद्ध धावा करण्यात अपयश आले.

- वेळ : सायं. ७.३० वा.
- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

# इंडोनेशियाविरुद्ध कामगिरी उंचावण्याचा भारताचा प्रयत्न

**शियामेन (चीन) :** स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखण्यासाठी भारतीय संघाला सुदीरमन चषक बॅडमिंटन स्पर्धेत इंडोनेशियाविरुद्ध विजय मिळवणे अनिवार्य झाले आहे. भारताला पहिल्या सामन्यात डेन्मार्ककडून १-४ अशा पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे बाद फेरी गाठण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना फटका बसला. 'ड' गटातून केवळ दोन संघ पुढच्या फेरीत जाणार असल्याने भारतासाठी हा सामना महत्त्वाचा आहे. भारत इंडोनेशियाकडून पराभूत झाल्यास इंग्लंडविरुद्धच्या अखेरच्या सामन्याला फारसे महत्त्व राहणार नाही.

लक्ष्य सेन, एचएस प्रणॉय आणि पीव्ही सिंधू यांच्या खराब लयीमुळे भारताच्या अडचणी वाढल्या आहेत. महिला एकेरीत इंडोनेशियाची आघाडीची खेळाडू ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंग बाहेर पडल्याने सिंधूचा सामना पुत्री कुसुमा वर्दानीशी होईल. इंडोनेशियाकडे चांगले दुहेरी खेळाडू आहेत.







हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय** : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय** : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय** : एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय** : प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर* (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.